CMYK

सोलापूर

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

लातूर | गुरुवार, २६ मार्च २०२६ | वर्ष ४ थे अंक १८ | पाने १२ | किंमत रु. ६/- | ■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.

dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com

# कोणाच्या बापालाही सोडणार नाही : फडणवीस

## अजितदादांचा घातपात असेल तर आकाश पाताळ एक करू

### अर्थसंकल्पीय अधिवेशनाचे सूप वाजले

**मुंबई, दि. २५ मार्च -**

राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा बुधवारी शेवटचा दिवस होता. शेवटच्या दिवशी दोन्ही सभागृहांत कामकाजाचा तुफान धडाका सुरू होता. आज विधानसभेने भारतीय न्याय संहिता महाराष्ट्र सुधारणा विधेयकावर आपली मोहोर उमटवली. त्यानंतर अंतिम आठवडा प्रस्ताव सादर झाला. या प्रस्तावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी उत्तर दिले. अजित पवार यांच्या विमान अपघात कनार्टकला झिरो ऋखठ नोंदवण्याचा अधिकारच नाही, असे मुख्यमंत्री म्हणाले. तर झिरो एफआयआर कुठेही नोंदवता येऊ शकतो, असे रोहित पवार यांनी मुख्यमंत्री फडणवीसांना सांगितले. तसेच आपण या प्रकरणात लक्ष घालावे अशी विनंतीही केली. महाराष्ट्र विधानसभेचे पुढील अधिवेशन सोमवार दिनांक २२ जून २०२६ रोजी विधान भवन मुंबई येथे घेण्यात येणार आहे.

विधानसभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी त्यांनी सविस्तर माहिती देत तपासाचे तपशीलही मांडले. आमदार रोहित पवार यांच्या भूमिकेवर देखील फडणवीस यांनी सविस्तर उत्तर देत आपण अपघाताच्या चौकशीच्या विरोधात नसल्याचे स्पष्ट केले आहे. तसेच यात कोणाच्या बापालाही सोडणार नसल्याचे आश्वासन त्यांनी रोहित पवारांना दिले आहे. ते म्हणाले, एक अत्यंत महत्त्वाचा आणि संवेदनशील मुद्दा सन्माननीय रोहित पवार आणि इतरही अनेकांनी हा मांडला आहे. मी सुरुवातीला याची वस्तुस्थिती मांडतो. दिनांक २८ जानेवारी २०२६ रोजी बारामती विमानतळ येथे धावपट्टी लगत विमानाचा अपघात झाला आणि या दुर्घटनेत अजितदादा पवार यांच्यासह ५ जणांचा मृत्यू झाला. यासंदर्भात केंद्र सरकारने जी काही एसओपी आहे त्यांची कारवाई सुरू केली. राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडे देखील आपण चौकशी दिली आहे. सीआयडी याचा तपास एसपी दर्जाच्या अधिकाऱ्याकडे देण्यात आला आहे.



**सातारा एसपींच्या निलंबनाचा निलम गोऱ्हेंचा आदेश रद्द**

सातारा जिल्हा परिषद निवडणुकीतील वादानंतर एसपी तुषार दोशींच्या निलंबनावरून सत्ताधारी शिवसेना आणि भाजपमध्ये तीव्र मतभेद समोर आले आहेत. उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी दिलेले निलंबनाचे आदेश सभापती राम शिंदे यांनी 'अधिकार कक्षेबाहेरचे' ठरवत रद्द केले आणि त्याऐवजी चौकशीचे निर्देश दिले. या निर्णयावर मंत्री शंभुराजे देसाई, उदय सामंत आणि शशिकांत शिंदे यांनी जोरदार आक्षेप घेतल्याने सभागृहात मोठा गदारोळ झाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कायदेशीर पेच मांडल्यानंतर सभापतींनी घेतलेल्या या भूमिकेमुळे शिवसेनेने नाराजी व्यक्त केली आहे. या गोंधळामुळे विधानपरिषदेचे कामकाज अर्धा तास तहकूब करावे लागले.

### भारतीय न्याय संहिता महाराष्ट्र सुधारणा विधेयक २०२६ विधानसभेत बहुमताने मंजूर

भारतीय न्याय संहिता महाराष्ट्र सुधारणा विधेयक २०२६ आज विधानसभेत बहुमताने मंजूर करण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हे विधेयक मांडले. शक्ती कायद्यात आता बलात्कारित स्त्री सोबतच सिड हल्ल्यातील स्त्रीची ओळख पटू नये त्यासोबतच समाज माध्यमांवर महिलांसोबतचे अश्लील चित्रण, छायाचित्रे, एआय वापरून त्यांची बनावट चित्रे अथवा चित्रफिती तयार करून प्रसारित करणे यावर बंदी घालण्याची तरतूद या विधेयकात आहे.

**नदी प्रदूषण रोखण्याचा मंत्री पंकजा मुंडेंचा निर्धार**

राज्यातील नद्यांमधील वाढते प्रदूषण रोखण्यासाठी व ठोस उपाययोजना करण्यासाठी स्वतंत्र नदी पुनरुजीवन प्राधिकरण स्थापन करण्याचा निर्णय अंतिम टप्प्यात आहे. या प्राधिकरणामार्फत केवळ नदी प्रदूषण आणि पुनरुजीवनावर लक्ष केंद्रित केले जाईल, अशी माहिती पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांनी दिली. चंद्रपूरमधील इरई व झरपट या दोन्ही नद्यांच्या प्रदूषणाचा मुद्दा लक्षात घेऊन या नद्यांवर प्राधान्याने काम केले जाईल. प्राधिकरण स्थापन झाल्यानंतर पहिल्याच टप्प्यात या नद्यांचा समावेश केला जाईल.

### भारतीय न्याय संहिता महाराष्ट्र सुधारणा विधेयक २०२६ विधानसभेत बहुमताने मंजूर

भारतीय न्याय संहिता महाराष्ट्र सुधारणा विधेयक २०२६ आज विधानसभेत बहुमताने मंजूर करण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हे विधेयक मांडले. शक्ती कायद्यात आता बलात्कारित स्त्री सोबतच सिड हल्ल्यातील स्त्रीची ओळख पटू नये त्यासोबतच समाज माध्यमांवर महिलांसोबतचे अश्लील चित्रण, छायाचित्रे, एआय वापरून त्यांची बनावट चित्रे अथवा चित्रफिती तयार करून प्रसारित करणे यावर बंदी घालण्याची तरतूद या विधेयकात आहे.

### प्रत्येक नागरिकाला मोफत उपचार देणे ही सरकारची जबाबदारी : आरोग्य मंत्री

राज्यातील नागरिकांना सर्व सार्वजनिक आरोग्य सेवा मोफत देण्याचा निर्णय आधीच घेण्यात आला आहे. कोणत्याही केसपेपरसाठी शुल्क न आकारता. तसेच प्रत्येक नागरिकाला मोफत उपचार देणे ही सार्वजनिक आरोग्य विभागाची जबाबदारी आहे. ही सेवा सध्या सुरू असून पुढेही सुरू राहील. त्यामुळे कोणतीही चिंता करण्याची गरज नाही, असे राज्याचे आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी सांगितले.







10 YEAR WARRANTY | BAJAJ SECURE • AMC • ROAD SIDE ASSISTANCE | 72198 21111 | SHRIRAM Finance | IDFC FIRST Bank ALWAYS YOU FIRST | BAJAJ AUTO CREDIT | L&T Finance | TATA CAPITAL Two Wheeler Loans

*नियम आणि अटी लागू. बचत 31 मार्च 2026 पर्यंत उपलब्ध. दाखवलेली एकूण बचत ही कॅशबॅकची बचत, शून्य प्रोसेसिंग फी आणि 5 मोफत सर्व्हिसेस (3 स्टँडर्ड मोफत सर्व्हिसेस आणि 2 अतिरिक्त मोफत सर्व्हिसेस) यांची बेरिज आहे. मोफत सर्व्हिसेसची बचत शेड्यूल्ड लेबर शुल्कानुसार. लागू ऑफर्स मॉडेल्स/राज्यानुसार बदलू शकतात. शून्य पीएफवरील बचत फायनान्सर आधारावर स्थानांनुसार बदलू शकते. अर्थपुरवठा पूर्णपणे फायनान्सरच्या विवेकानुसार. साहसी दृश्ये एक्सपर्ट्सकडून, प्रोफेशनल सुपरवीजन अंतर्गत, नियंत्रित आणि बंद वातावरणात, सामान्य लोक किंवा सार्वजनिक रस्त्यांपासून दूर जागेत केली आहेत. या साहसी दृश्यांचं अनुकरण करू नये आणि नेहमी वाहतूक व सुरक्षिततेचे नियम पाळावे. पल्सार 125 ऑफर ही निऑन आणि कार्बन फायबर मॉडेल्सवर. पल्सर N160 USD सिंगल सीट व्हेरिएंटवर ई–कॉम ऑफर, संबंधित ई–कॉम भागीदाराच्या अटींवर अवलंबून. ई–कॉम ऑफर भागीदारांनुसार बदलू शकतात.

**Authorised Dealers For Bajaj Auto Ltd.: Solapur • Station Road** AHERKAR BAJAJ 9689899840 • **Hotgi Road** AHERKAR BAJAJ 8956 069 355 • **Akkalkot Road** AHERKAR BAJAJ 8956 320 060 • **Pandharpur** PANDURANG BAJAJ 8600024805 • **Jeur** SHIVRATNA BAJAJ 9922044676 • **Barshi** AHERKAR BAJAJ 8308004007.

# विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या पूजा नोंदणीस उत्स्फूर्त प्रतिसाद

## ●संकेतस्थळावर जर्मनी, कॅनडा, नेपाळ, चीन आदी २० देशविदेशातून १७ हजार व्ह्यूज नोंदविले

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २५ मार्च-**

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती, पंढरपूर यांच्या वतीने भाविकांना अधिक सुलभ व पारदर्शक सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने श्री विठ्ठल व श्री रुक्मिणी मातेच्या विविध पूजांसाठी ऑनलाईन नोंदणी प्रणाली सुरू करण्यात आली आहे. दि. १ एप्रिल ते ३१ जुलै या कालावधीतील पूजांसाठीची ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया दि. २५ मार्च २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजल्यापासून सुरू करण्यात आली असून या उपक्रमास भाविकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे.



मंदिर समितीच्या अधिकृत संकेतस्थळामार्फत भाविकांना घरबसल्या पूजेची नोंदणी करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. दि. १ एप्रिल ते ३१ जुलै या कालावधीतील सण, उत्सव व गर्दीचे दिवस वगळून इतर दिवशीच्या श्रींच्या नित्यपूजा, पाद्यपूजा व महानैवेद्य सहभाग योजना तसेच माहे एप्रिल मधील तुळशी अर्चन पूजा ऑनलाइन नोंदणीसाठी भाविकांना उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. त्यामध्ये सर्व पूजांची नोंदणी अल्पावधीत पूर्ण झाली आहे. यामध्ये श्री विठ्ठल नित्यपूजा (१४८), श्री रुक्मिणीमाता नित्यपूजा (१५०), पाद्यपूजा (३५४), तुळशी अर्चन पूजा( १०४०) तसेच महानैवेद्य सहभाग योजना (१४५) अशा सर्व पूजांसाठी भाविकांनी मोठ्या उत्साहाने नोंदणी केली आहे.

श्री विठ्ठल व श्री रुक्मिणीमातेच्या नित्यपूजेसाठी अनुक्रमे रु.२५०००/-, रू.११०००/- तसेच पाद्यपूजेसाठी रू.५०००/- व तुळशी अर्चन पूजेसाठी रू.२१००/- तसेच महानैवेद्य सहभाग योजनेसाठी रू.७०००/- इतके देणगी मुल्य आहे. यामधून सुमारे ८८ लक्ष इतके देणगीमूल्य जमा झाले आहे.

या ऑनलाईन प्रणालीमुळे मंदिर समितीच्या सेवांमध्ये सुलभता, पारदर्शकता आणि कार्यक्षमतेत वाढ झाली असून भाविकांना अधिक सोयीस्कर पद्धतीने सेवा उपलब्ध होत आहेत. भाविकांचा वाढता प्रतिसाद लक्षात घेता भविष्यातही अशा तंत्रज्ञानाधारित सुविधा अधिक प्रभावीपणे राबविण्याचा मंदिर समितीचा मानस असल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगितले.

मंदिर समितीच्या अधिकृत संकेतस्थळावरून युनायटेड स्टेट्स, युनायटेड किंगडम, युनायटेड अरब अमिराती, जर्मनी, कॅनडा, नायजेरिया, सिंगापूर, ऑस्ट्रेलिया, नेदरलँड, नेपाळ, हंगेरी, नॉर्वे, काँगो (किन्शासा), फ्रान्स, कुवेत, स्वीडन, चीन, श्रीलंका आदी सुमारे २० देशांमधून संकेतस्थळास भेटी (व्ह्यूज) प्राप्त झालेल्या असून देश-विदेशातून १७ हजार व्ह्यूज नोंदविण्यात आले आहेत.

सदर ऑनलाईन प्रणालीद्वारे नोंदणी झालेल्या पूजांबाबतचा संपूर्ण डेटा, संबंधित लोकेशन माहिती, आयपी अॅड्रेस, फेल्ड (अयशस्वी) नोंदणीचा तपशील तसेच इतर अनुषंगिक तांत्रिक माहिती मंदिर समितीकडे उपलब्ध असून त्याची संगणकीय नोंद सुरक्षित स्वरूपात ठेवण्यात आलेली आहे.



# एअर चीफ मार्शल पी.व्ही. नाईक यांची श्री सिद्धेश्वर मंदिरास भेट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ मार्च-**

भारतीय वायुसेनेचे माजी प्रमुख एअर चीफ मार्शल प्रदीप वसंत नाईक (निवृत्त) यांनी सोलापूर भेटीदरम्यान श्री सिद्धेश्वर मंदिरास भेट देत श्री सिद्धेश्वर महाराजांचे दर्शन घेतले.

यावेळी श्री सिद्धेश्वर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष धर्मराज कडादी यांच्या हस्ते त्यांचा सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. याप्रसंगी त्यांनी मंदिरातील धार्मिक वातावरणाबद्दल समाधान व्यक्त करत सोलापूरवासीयांच्या आदरातिथ्याचे कौतुक केले. त्यांच्या सोलापूर दौऱ्यात जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने तहसीलदार नदाफ यांच्या हस्ते हॉटेल बालाजी सरोवर येथेही त्यांचा सत्कार करण्यात आला. एअर चीफ मार्शल प्रदीप नाईक हे सैनिक स्कूल साताराचे माजी विद्यार्थी असून, त्यांनी भारतीय वायुसेनेचे २२ वे प्रमुख म्हणून कार्य केले आहे. त्यांच्या उल्लेखनीय सेवेसाठी त्यांना विविध उच्च सन्मानांनी गौरविण्यात आले आहे. त्यांनी १९६९ साली भारतीय वायुसेनेत प्रवेश केला आणि आपल्या चार दशकांच्या सेवाकाळात विविध महत्त्वाच्या आणि जबाबदारीच्या पदांवर कार्य केले. ते एक कुशल फायटर पायलट असून त्यांनी मिग-२१ आणि मिग-२३ सारख्या लढाऊ विमानांचे उड्डाण केले आहे. यावेळी सैनिक स्कूल सातारा माजी विद्यार्थी संघटना - सोलापूर चॅप्टरचे चेअरमन गंगाधर थळंगे, संजय बुरगुटे, सुधीर नगरकर, किरण कुलकर्णी, डॉ. रविराज गायकवाड, राजश्री थळंगे आणि अमृता थळंगे उपस्थित होते.

# शिक्षणाधिकारी कार्यालयासमोर ठिय्या

## शिक्षण विभागातील प्रलंबित कामे न झाल्याने संताप उसळला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ मार्च-**

शिक्षण विभागातील दफ्तर दिरंगाई आणि प्रलंबित कामांच्या निषेधार्थ शिक्षक भारती संघटनेच्यावतीन माध्यमिक शिक्षणाधिकारी कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करण्यात आले. यावेळी माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप हे आंदोलनावेळी अनुपस्थित असल्याने संतप्त पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या दालनासमोरच ठिय्या आंदोलन केले. यामुळे कार्यालय परिसरात काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते.

दरम्यान, यापूर्वी दि. २४ फेब्रुवारी २०२६ रोजी शिक्षणाधिकारी (माध्यमिक), सोलापूर यांच्या कार्यालयात शिक्षक भारतीच्या प्रलंबित मागण्यांवर सहविचार बैठक झाली होती. त्या बैठकीत १५ दिवसांत सर्व प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र, एक महिना उलटूनही अनेक विषय प्रलंबितच राहिल्याने शिक्षक भारतीने आंदोलनाचा मार्ग स्वीकारला. माध्यमिक उपशिक्षणाधिकारी विठ्ठल ढेपे यांनी शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांच्याशी संपर्क साधून संघटनेची प्रलंबित कामे उद्या दुपारपर्यंत पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर संघटनेने आजचे आंदोलन तात्पुरते स्थगित केले.

या आंदोलनात संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुजितकुमार काटमोरे, जिल्हा प्रवक्ते विजयकुमार गुंड, उच्च माध्यमिक विभागाचे जिल्हाध्यक्ष शाहू बाबर, आश्रम शाळा विभागाचे जिल्हाध्यक्ष विकास धसाडे, जिल्हा सचिव सुरेश कणमुसे, उपाध्यक्ष रियाज अहमद अत्तार उपस्थित होते.



# प्रभाग २३ च्या मंजूर लेआउटमध्ये मूलभूत सुविधांचा अभाव

- **पूर्तता न करणाऱ्या विकासकांवर कारवाई करण्यावर चर्चा**
- **धोरणात्मक निर्णयासाठी कार्यवाहीचे महापौर कोंड्याल यांचे आदेश**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५ मार्च**

सोलापूर महानगरपालिकेच्या प्रभाग क्र. २३ मधील अंतिम मंजूर लेआउट असलेल्या सुमारे १० ते १५ सोसायट्यांमध्ये आजतागायत मूलभूत नागरी सुविधा उपलब्ध नसल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे.

अशा विकासकांवर कारवाई कशी करता येईल या संदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्याचे आदेश महापौर विनायक कोंड्याल यांनी दिले आहेत. महापालिका अंदाजपत्रक आढावा बैठकीत झालेल्या चर्चेत उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, नगरसेवक सत्यजित वाघमोडे, दीपक जमादार, राजशेखर पाटील यांनी याकडे लक्ष वेधले. लेआउटना नगर रचना विभागाकडून अंतिम मंजुरी मिळालेली असतानाही परिसरात रस्ते, पथदिवे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था तसेच ड्रेनेज सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या नाहीत. प्लॉट खरेदी करताना या सर्व सुविधा देण्याचे आश्वासन विकासकांकडून देण्यात आले होते.



मात्र प्रत्यक्षात कोणतीही सुविधा उपलब्ध नसल्यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.या संदर्भात मूळ मालक व त्यांच्या प्रतिनिधींशी वारंवार संपर्क साधण्याचा प्रयत्न करूनही कोणताही प्रतिसाद मिळत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. महानगरपालिकेकडे सर्व प्रकारचे कर नियमितपणे भरले जात असतानाही नागरिकांना मूलभूत सुविधांपासून वंचित राहावे लागत असल्याने हा प्रकार अधिकच गंभीर ठरत आहे.महापालिका आयुक्तांनी संबंधित विभागांना तातडीने निर्देश देऊन प्रभाग क्र. २३ मधील सर्व मंजूर लेआउटमध्ये आवश्यक त्या नागरी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, तसेच संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी नगरसेवक सत्यजित वाघमोडे यांनी केली आहे. दरम्यान, महापौर विनायक कोंड्याल यांनी हा विषय गांभीर्याने घेतला आहे. सोलापूर शहरात अशी प्रकरणे मोठ्या संख्येने आहेत. त्यामुळे दिशाभूल करून सुविधा न देणाऱ्या अशा विकासकांवर कायदेशीर कारवाई करावी, असे आदेश महापौर विनायक कोंड्याल यांनी प्रशासनाला दिले.

# रेशन दुकानातून केरोसीन देण्याच्या हालचाली वाढल्या

## ●पुरवठा सचिवांनी घेतली 'व्हिसी'; टँकर ठेकेदारांबरोबर बोलणी अंतीम टप्प्यात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ मार्च-**

जिल्ह्यातील गॅस एजन्सी समोर गर्दी होऊ लागल्याचे निदर्शनास येत आहे तर जिल्ह्याच्या अनेक भागात गॅस टंचाई वाढू लागल्याने शासन स्तरावरही याची दखल घेण्यात आली असून, यासाठी आता गॅस बरोबर रॉकेल पुरवठाही होणार असल्याचे संकेत आहेत. तर रॉकेल नियोजनासाठी पुरवठा विभागाच्या सचिवांनी पुरवठा अधिकाऱ्यांची व्हिसी नुकतीच घेतली असून, सोलापूरच्या सध्य स्थितीची पूर्ण माहिती मागविली आहे. दरम्यान, रेशन दुकानातून केरोसीन देण्याच्या वरिष्ठ पातळीवरून हालचालींना वेग वाढला असून, सर्वच जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना रॉकेल टँकर वाहतुकीचे नियोजन करण्याचे आदेश दिले आहेत. यामुळे जिल्हा पुरवठा विभागाने रॉकेल वाहतूक करणाऱ्या ठेकेदारांशी चर्चा करून काही टँकर फायनल केल्याचे समजते तर काही जणांशी बोलणीही सुरू असल्याचे सांगण्यात आले.

जिल्हा प्रशासनाने २३ मार्च रोजी स्पष्ट आदेश देवूनही शहर-जिल्ह्याच्या काही ठिकाणी गॅस एजन्सी समोर सिलेंडरसाठी मोठी लाईन व गर्दी होत असल्याचे दिसून आलेले आहे. या गॅस कंपन्यांनी गॅस एजन्सी समोर गर्दी होणार नाही, तेथून गॅस सिलेंडरचा पुरवठा होणार नाही; त्याप्रमाणेच अवैध गॅस सिलेंडर विक्री होऊ नये, याबाबतच्या सूचना जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिल्या आहेत. तरीही रोजच गॅस टंचाईची वृत्ते येवू लागली आहेत. यामुळे आता भविष्यात रॉकेल वाटपाचेही नियोजन जिल्हा पुरवठा विभागाकडून सुरू झाले आहे. शासन स्तरावरून कुठल्याही क्षणी रॉकेल घेवून जावा; असे आदेश येताच दुसऱ्याच दिवशी शहर-जिल्ह्यातील बुकींग केलेल्या टँकरद्वारे रॉकेल आणून सर्वसामान्य नागरिकांना वाटपही केले जाणार आहे. याबाबत जिल्हा पुरवठा विभाग दक्ष आणि सज्जही असल्याची माहिती मिळाली.



सध्या जिल्ह्यातील शिधापत्रिकाधारकांकडे स्टोव्हची उपलब्धता व वापर याबाबत पुरवठा विभागाने केलेल्या सर्वेक्षणाचा अहवालही राज्य शासनाकडे सादर करण्यात आला आहे. ग्रामीण भागातील सुमारे ३ लाख २० हजार शिधापत्रिकाधारकांकडे स्टोव्ह उपलब्ध असल्याचा अहवाल जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी पाठवला आहे. तर शहरातील नागरिकांचा स्टोव्ह वापर अत्यंत नगण्य असल्याचे शहर अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे यांनी आपल्या अहवालात नमूद केले आहे.सोलापुरातील नागरिकांकडे स्टोव्हची उपलब्धता किती आहे. प्रत्यक्षात किती जण त्याचा वापर करतात, याचा सविस्तर सर्व्हे पुरवठा विभागाकडून करण्यात आला होता. जिल्ह्यात सध्या ११ लाख ८८ हजार घरगुती गॅस ग्राहक आहेत तर १० हजार ८०० व्यावसायिक गॅस ग्राहक आहेत. आता काही असले तरी रॉकेल आल्यास स्टोव्ह बनविणाऱ्यांना मात्र पुन्हा चांगले दिवस येणार आहेत. पेट्रोल पंपातून केरोसीन वितरित करता येईल का, याबाबत राज्याच्या पुरवठा विभागाने चाचपणी केली होती. मात्र, बहुतांश पुरवठा अधिका-यांनी रेशन दुकानांमार्फत केरोसीन पुरवठा करण्याची सूचना मांडली. त्यानुसार सोलापुरातील सर्व रेशन दुकानांतून शिधापत्रिकाधारकांना केरोसीन वाटप करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे

प्रती शिधापत्रिकेमागे किती लिटर केरोसीन मिळणार आणि त्याचा दर काय असेल, याबाबतची माहिती अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही. या संदर्भात पुढील बैठकीत अंतिम निर्णय घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या जाणार असल्याचेही मुख्य सचिवांनी स्पष्ट केले आहे.

# दक्षिण पं.स.कडून एक वर्षानंतरही नागरिकांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष

- **बीडीओंचे कामचुकार कर्मचाऱ्यांकडे दुर्लक्ष**
- **पदाधिकाऱ्यांनी अंकुश ठेवण्याची गरज**

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. २५ मार्च-**

ग्रामसेवक, विस्तार अधिकारी व इतर कर्मचाऱ्यांविरोधात तक्रार केल्यानंतर दक्षिण पंचायत समितीकडून वर्षानंतरही दखल घेण्यात येत नसल्याने अधिकाऱ्यांचा सावळागोंधळ सुरू असल्याचे दिसून येते. दक्षिणचे गटविकास अधिकारी मनोज राऊत बैठक व अन्य कारणाने कार्यालयात दर्शन दुर्मिळ होत असल्याने नागरीकांमधून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. याकडे नूतन सभापती व उपसभापती लक्ष देऊन कामचुकार अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे. मनोज राऊत यांनी दक्षिण पंचायत समितीचा पदभार स्वीकारून सहा महिने झाले.

या काळात व त्यापूर्वी नागरीकांनी प्रशासनाच्या दिरंगाईबद्दल पंचायत समितीकडे तक्रार केली. शिवाय ग्राम सेवक कामकाज, विस्तार अधिकारी चौकशी, विकासनिधी भ्रष्टाचार, बोगस बिल, औजार वाटप, विविध योजनांचा लाभ गैरव्यवहार तसेच कर्मचारी बदली व पदभार संदर्भात तक्रार करून एक वर्ष संपला. तरी ढिम प्रशासनाकडून त्या तक्रारीसंदर्भात वारंवार पाठपुरावा केल्यानंतर पत्रव्यवहार व कारवाई करण्याऐवजी उडवाउडवीची उत्तरे देऊन चालढकल करण्यात येत आहे. अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या गैरवर्तन व नागरीकांच्या तक्रारीबद्दल गटविकास अधिकारी राऊत यांच्याकडे विचारणा केल्यानंतर विस्तार अधिकाऱ्यांकडे बोट दाखवित आहेत. त्यामुळे नागरीकांच्या तक्रारींना केराची टोपली दाखवून भ्रष्टाचार करणार्यावर कारवाई करण्याऐवजी त्यांची पाठराखण करण्यात येत असल्याचे दिसून येते.

**बीडीओ दर्शन दुर्मिळ**

दक्षिणचे बीडीओ मनोज राऊत वारंवार कार्यालयात गैरहजर असतात. वरीष्ठांच्या बैठका व अन्य शासकीय कारण सांगून कार्यालयाला येण्याचे टाळत असल्याची चर्चा सुरू आहे. ग्रामीणमधील विविध योजनांचे लाभार्थी व नागरीक बीडीओंच्या भेटीसाठी आले असता त्यांचे दर्शन दुर्मिळ असल्याचे सांगण्यात येते.

**पदाधिकाऱ्यांनी अंकुश ठेवण्याची गरज**

चार वर्षांपासून प्रशासक असल्याने कर्मचारी व अधिकारी कामचुकार बनले आहेत. बैठकांचे कारण सांगून कार्यालयाला दांडी मारण्याचे प्रमाण वाढत आहे. शिवाय नागरीकांच्या तक्रारीकडे दुर्लक्ष करून पंचायत समितीकडून बिनदिक्कत बिल काढणे व साहीत्य वाटप करे सुरूच आहे. त्यामुळे नूतन पदाधिकाऱ्यांनी कामचुकार अधिकारी व कर्मचाऱ्यांवर अंकुश ठेवण्याची गरज आहे.

**मार्च अखेरमुळे बिल काढण्याकडे लक्ष देण्याची गरज**

अनेक ग्रामसेवकांची निधी खर्च करण्यासाठी निकृष्ट कामे करून टक्केवारीसाठी बोगस बिल काढण्यासाठी धडपड सुरू असते. त्यामुळे पदाधिकाऱ्यांनी कामांची पडताळणी करून व गुणवत्ता पाहूनच बिल मंजूर करण्यासाठी बीडीओंना आदेश देण्याची मागणी करण्यात येत आहे.

# सोलापूर जिल्हा परिषदेत विभागनिहाय आढावा बैठकांचा सपाटा

## अध्यक्ष-उपाध्यक्षांनी घेतला विविध विभागांच्या कामकाजाचा आढावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५ मार्च-**

जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य आणि उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांनी पदभार स्वीकारल्यानंतर प्रशासनिक कामकाजाला वेग देत विभागनिहाय आढावा बैठकींचा धडाका लावला आहे. पदभार स्वीकारल्यानंतर अल्पावधीतच विविध विभागांच्या कामकाजाचा सखोल अभ्यास करण्यासाठी त्यांनी नियोजनबद्ध पद्धतीने बैठका घेण्यास सुरुवात केली आहे.

याच पार्श्वभूमीवर जिल्हा परिषदेच्या एकूण सोळा विभागांचा दोन दिवसांचा आढावा घेण्याचे नियोजन करण्यात आले असून, त्याअंतर्गत बुधवारी पहिल्या टप्प्यात मॅरेथॉन बैठक पार पडली. या बैठकीत सकाळच्या सत्रात सामान्य प्रशासन, महिला व बालकल्याण, बांधकाम विभाग, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, उमेद अभियान तसेच लघु पाटबंधारे विभागाच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला.



बैठकीदरम्यान संबंधित विभागांतील विविध योजनांची अंमलबजावणी, निधी वितरण, प्रलंबित कामे आणि गुणवत्तेचे निकष यांचा तपशीलवार ऊहापोह करण्यात आला. विशेषतः महिला व बालकल्याण विभागा अंतर्गत बचत गटांच्या कार्यप्रणालीचा आढावा घेण्यात आला. ग्रामीण भागातील महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी बचत गटांची भूमिका अधिक परिणामकारक कशी होईल, याबाबत सूचना देण्यात आल्या.

कुपोषण निर्मूलन हा महत्त्वाचा मुद्दा ठळकपणे चर्चिला गेला. बालकांमधील कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी अंगणवाडी सेवा, पोषण आहार वितरण आणि आरोग्य तपासणी यंत्रणा अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले.

| | |
|---|---|
| ग्रामपंचायत विभाग | सकाळी १०.०० ते ११.०० |
| पाणी, स्वच्छता विभाग | सकाळी ११.०० ते १२.०० |
| अर्थ विभाग | दुपारी १२.०० ते १.०० |
| शिक्षण (प्राथमिक) | दुपारी १.०० ते २.०० |
| शिक्षण (माध्यमिक व योजना) | दुपारी २.३० ते ३.३० |
| आरोग्य विभाग | दुपारी ३.३० ते ४.३० |
| ग्रामीण पाणी पुरवठा | सायं. ४.३० ते ५.३० |

लघु पाटबंधारे विभागाच्या आढाव्यात बंधाऱ्यांच्या उभारणीबाबत विशेष चर्चा झाली. जलसंधारण आणि शेतीसाठी पाण्याची उपलब्धता वाढविण्याच्या दृष्टीने अशा प्रकल्पांची परिणामकारक अंमलबजावणी करण्यावर भर देण्यात आला. याशिवाय बांधकाम विभागाच्या कामकाजात गुणवत्ता, वेळेत पूर्णता आणि पारदर्शकता यांना प्राधान्य देण्याचे निर्देश देण्यात आले.

दरम्यान, उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांनी पदभार स्वीकारल्यानंतर प्रत्यक्ष क्षेत्रभेटींचाही धडाका लावला आहे. त्यांनी जिल्हा परिषद शाळा तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रांना भेट देऊन सेवा सुविधांची पाहणी केली आहे. तथापि, या घाईगडबडीने घेतल्या जाणाऱ्या बैठकींबाबत काही राजकीय व प्रशासकीय वर्तुळात प्रश्नचिन्हही उपस्थित केले जात आहे. येत्या दोन दिवसांत जिल्हा परिषदेच्या चार विषय समित्यांच्या सभापतींची निवड होणार आहे. त्यानंतर संबंधित विभागांचे अधिकार व जबाबदाऱ्या सभापतींमध्ये वाटप होणार आहेत. अशा परिस्थितीत, सभापतींची नियुक्ती होण्यापूर्वीच सर्व विभागांचा आढावा घेण्याची घाई का केली जात आहे, असा सवाल उपस्थित होत आहे. प्रशासनिक दृष्टिकोनातून पाहता, अध्यक्ष व उपाध्यक्ष यांनी सर्व विभागांची प्राथमिक माहिती आत्मसात करून पुढील धोरणात्मक निर्णय प्रक्रियेसाठी तयारी सुरू केली असल्याचेही या कृतीतून दिसून येते. अध्यक्षांकडे लघु पाटबंधारे, ग्राम पंचायत, पाणी व स्वच्छता आणि ग्रामीण पाणीपुरवठा हे विभाग येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे, तर उपाध्यक्षांना अर्थ व बांधकाम समितीची जबाबदारी मिळण्याची शक्यता आहे.

**जिल्हा परिषदेत आज मेगा रिव्ह्यू :** जिल्हा परिषद सोलापूरमध्ये नवनियुक्त अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या नेतृत्वाखाली गुरुवार, दि. २६ मार्च २०२६ रोजी सर्व विभागांचा आढावा घेण्यात येणार आहे. ही महत्त्वपूर्ण बैठक मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या दालनात पार पडणार असून, प्रशासनातील कामकाजाला गती देण्याच्या दृष्टीने ही बैठक निर्णायक मानली जात आहे. सामान्य प्रशासन विभागाकडून याबाबत आदेश जारी करण्यात आले असून, ग्रामपंचायत, पाणी व स्वच्छता, अर्थ, शिक्षण (प्राथमिक व माध्यमिक), आरोग्य तसेच ग्रामीण पाणी पुरवठा या प्रमुख विभागांना त्यांच्या अधिनस्त अधिकारी व कर्मचाऱ्यांसह उपस्थित राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.या बैठकीत प्रत्येक विभागाने आपल्या कामकाजाची अद्ययावत माहिती सादर करणे अनिवार्य असून, पॉवरपॉईंट प्रेझेंटेशनद्वारे सादरीकरण करण्याच्या स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे प्रशासनातील प्रलंबित कामे, अडचणी आणि प्रगतीचा सखोल आढावा घेतला जाणार आहे.प्रशासनातील कार्यक्षमता वाढवणे, प्रलंबित प्रश्न सोडवणे आणि विकासकामांना गती देणे या उद्देशाने आयोजित करण्यात आलेली ही बैठक अत्यंत महत्त्वाची मानली जात असून, सर्व विभागांच्या कामगिरीवर याचा थेट परिणाम होण्याची शक्यता आहे.

CMYK

सोलापूर

# तरुण भारत

SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | गुरुवार, २६ मार्च २०२६

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

**आज श्रीरामनवमी**



## विचारपुष्प



नि भारतीय संस्कृतीचे, राष्ट्रीय अस्मितेचे आणि 'मर्यादा पुरुषोत्तमाचे' सर्वोच्च प्रतीक प्रभू श्रीरामाला आपण मानले आहे. राम केवळ धार्मिक दैवत नसून ते 'राष्ट्राचे आदर्श' आहेत, ज्यांनी धर्माचे पालन, उच्च चारित्र्य आणि कर्तव्यपरायणतेचा आदर्श घालून दिला, ज्यामुळे राष्ट्र एकसंध राहू शकते. श्रीरामाचे चरित्र हे हिंदू राष्ट्राच्या पुनरुत्थानासाठी आणि समाज संघटनेसाठी एक शाश्वत प्रेरणास्रोत आहे.

**- श्रीगुरुजी**
रा. स्व. संघाचे द्वितीय सरसंघचालक

# 'शक्ती' अधिक कठोर

## 'एआय'द्वारे बदनामी करणाऱ्यांची खैर नाही | ॲसिड हल्ला पीडितांची ओळख उघड करण्यासही बंदी

◆ **मुंबई, २५ मार्च**



राज्यातील महिलांच्या सुरक्षेसाठी अत्यंत कळीच्या ठरणाऱ्या 'शक्ती' कायद्याची व्याप्ती आता अधिक विस्तारली असून तो अधिक कडक करण्यात आला आहे. महिलांचे अश्लील चित्रण किंवा एआयच्या माध्यमातून तयार केलेली बनावट चित्रे समाज माध्यमांवर प्रसारित करणे आता कायद्याने गुन्हा ठरणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मांडलेले या संदर्भातील दुरुस्ती विधेयक आज विधानसभेत एकमताने मंजूर करण्यात आले.

केंद्र सरकारने लागू केलेल्या भारतीय न्याय संहितेमुळे 'शक्ती' कायद्याच्या मंजुरीची प्रक्रिया काही काळ लांबणीवर पडली होती. केंद्र सरकारने काही तांत्रिक दुरुस्त्या सुचवल्या होत्या. त्यानुसार, भारतीय न्याय संहितेत तरतूद नसलेल्या परंतु राज्यासाठी आवश्यक असलेल्या महत्त्वाच्या कलमांचा अंतर्भाव करून हे सुधारित विधेयक आज सभागृहात मांडण्यात आले. (तभा वृत्तसेवा)

### बदनामी रोखण्यासाठी कठोर पावले

**या नवीन दुरुस्तीनुसार, केवळ बलात्कारित महिलाच नव्हे तर ॲसिड हल्ल्यातील पीडित महिलेची ओळख पटेल असे कोणतेही कृत्य किंवा माहिती उघड करण्यास बंदी घालण्यात आली आहे. तसेच, सोशल मीडियाचा वापर करून महिलांचे अश्लील फोटो किंवा व्हिडिओ व्हायरल करणे आणि एआय तंत्रज्ञानाचा गैरवापर करून कोणाचीही प्रतिमा मलिन करणाऱ्यांवर आता कायद्याचा बडगा उगारला जाणार आहे.**

# पुण्यात महसूल घोटाळ्याचा भंडाफोड

**४२४ प्रकरणांत अनियमितता**

- दोषींवर निलंबनासह कठोर कारवाईचा आदेश
- राज्यभर तपास मोहीम आणि सहा महिन्यांत अहवाल

◆ **मुंबई, २५ मार्च**

पुणे जिल्ह्यात महसूल विभागातील मोठ्या अनियमिततेचा भंडाफोड झाला असून, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमातील कलम १५५ चा गैरवापर करून अनेक बेकायदेशीर आदेश पारित झाल्याचे समोर आले आहे. या प्रकरणाची राज्य सरकारने गंभीर दखल घेतली असून, दोषींवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधान परिषदेत दिले.

नाशिक विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखालील समितीने केलेल्या तपासात तब्बल ३८,०२७ प्रकरणांची प्राथमिक छाननी करण्यात आली. त्यापैकी कागदपत्रे उपलब्ध असलेल्या २,३३७ प्रकरणांमधून ४२४ प्रकरणांत गंभीर अनियमितता आढळून आली. या प्रकरणांचे 'अ', 'ब' आणि 'क' अशा तीन गटांत वर्गीकरण करण्यात आले आहे.



यातील 'अ' गटातील १३ अतिगंभीर प्रकरणांमध्ये संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर निलंबनासह फौजदारी कारवाईचा प्रस्ताव आहे. तसेच ३० पेक्षा अधिक प्रकरणांत अनियमितता करणाऱ्या अधिकाऱ्यांनाही तातडीने निलंबित करण्याची शिफारस करण्यात आली आहे.

'ब' गटातील प्रकरणांमध्ये जबाबदार अधिकाऱ्यांची पुणे विभागाबाहेर बदली करून त्यांना अकार्यकारी पदांवर नेमले जाणार आहे. याशिवाय, अशा प्रकारच्या अनियमितता इतर विभागांतही झाल्या आहेत का, यासाठी राज्यभर तपास मोहीम राबविण्यात येणार असून, त्यासाठी स्वतंत्र समित्या स्थापन केल्या जाणार आहेत.

भविष्यात अशा प्रकारांचा पुनरावृत्ती टाळण्यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमात सुधारणा करण्याचे विधेयक आगामी पावसाळी अधिवेशनात मांडले जाणार असल्याची माहितीही बावनकुळे यांनी दिली. (तभा वृत्तसेवा)

### मालमत्तांचे मूळ दस्तऐवज पुनर्स्थापित करणार

**बाधितांना न्याय देण्यासाठी सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला असून, सर्व बेकायदेशीर प्रकरणांचे वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत 'सुओ-मोटो' पुनरावलोकन करण्यात येणार आहे. पुढील सहा महिन्यांत संबंधित मालमत्तांचे मूळ दस्तऐवज पुनर्स्थापित केले जाणार आहेत.**



महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी बुधवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी राज्यपालांनी पंतप्रधानांना छत्रपती शिवाजी महाराज यांची प्रतिमा भेट दिली

## पश्चिम बंगालमध्ये सापडले ८४ बॉम्ब

◆ **दक्षिण २४ परगणा, २५ मार्च**

पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणुकीची चाहूल लागलेली असताना दक्षिण २४ परगणा जिल्ह्यात शोध मोहिमेदरम्यान पोलिसांना ८४ बॉम्ब सापडले असून ते जप्त करण्यात आले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, या मोहिमेदरम्यान एका तलावातून एक रायफल जप्त करण्यात आली. इतक्या मोठ्या प्रमाणात स्फोटके सापडल्याने पोलिसांनी तपास अधिक वेगाने सुरू केला. या प्रकरणी संबंधित पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सुरू आहे. यंदाच्या निवडणुकीत मतदार संख्येतही बदल दिसून आला आहे. मतदार यादीच्या छाननीनंतर अनेक नावे वगळण्यात आली असून मोठ्या प्रमाणात मतदारांची नावे अद्याप तपासणीखाली आहेत. (वृत्तसंस्था)

# भोंदूगिरीला स्थान नाही : मुख्यमंत्री

## जादूटोणाविरोधी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याचा निर्धार

राज्यात अंधश्रद्धा आणि भोंदूगिरीविरोधात कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिला. अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना त्यांनी श्रद्धा आणि अंधश्रद्धा यातील सूक्ष्म फरक अधोरेखित करत समाजाने विवेकाने वागण्याचे आवाहन त्यांनी केले.



फडणवीस म्हणाले की, श्रद्धा ही सकारात्मकता आणि प्रामाणिकतेवर आधारित असते, तर अंधश्रद्धेमुळे विवेक हरवतो. भोंदूगिरीमुळे समाजाचे नुकसान होत असून अशा प्रवृत्तींचा कायमचा बंदोबस्त करण्यासाठी सरकार कटिबद्ध आहे. संबंधित प्रकरणात मोठ्या प्रमाणात माहिती समोर येत असून, सर्व बाजूंनी चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

राज्याच्या संत परंपरेचा उल्लेख करत त्यांनी संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत एकनाथ महाराज यांसारख्या संतांनी अंधश्रद्धेविरोधात दिलेल्या शिकवणीची आठवण करून दिली.

### तर पाकिस्तानी दहशतवाद्यांना टाचण्यांनी संपवून टाकलं असतं

**जादू टोणा करून जर समस्या संपल्या असत्या तर या भोंदू खरातला आपण डोनाल्ड ट्रम्पचा सुरक्षा सल्लागार म्हणून नेमला असता मग युद्ध जे आहे ते आपण ड्रोन ऐवजी लिंबू मिरचीने लढलो असतो आणि मग पाकिस्तानच्या दहशतवाद्यांना इथे बसूनच टाचण्यानी संपवून टाकलं असतं आणि मग सीमेवर सैनिक पाठवण्याची आवश्यकता पडली नसती, असे फटकारे मुख्यमंत्र्यांनी हाणले.**

## महत्त्वाचे

### देशात इंधनाचा मुबलक साठा

**नवी दिल्ली :** संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असताना, केंद्र सरकारने बुधवारी पश्चिम आशियातील परिस्थिती आणि त्याचा भारतावर होणाऱ्या परिणामावर चर्चा करण्यासाठी सर्वपक्षीय बैठक घेतली. देशात कच्चे तेल, एलपीजी आणि नैसर्गिक वायूचा मुबलक साठा असून, होर्मुझ जलमार्गातून बहुतांश तेल टँकर आणि जहाजे भारताकडे रवाना झाल्याची माहिती सरकारने दिली. देशाची ऊर्जा सुरक्षा परिस्थिती स्थिर आणि नियंत्रणात असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेत झालेल्या सर्वपक्षीय बैठकीत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर, अर्थमंत्री निर्मला सीतारामन, संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू, पेट्रोलियम मंत्री हरदीप पुरी उपस्थित होते. बैठकीला तृणमूल काँग्रेसचे नेते वगळता काँग्रेस, समाजवादी पक्षासह सर्व विरोधी पक्षाचे नेते उपस्थित होते.

## दस्त नोंदणीतील गैरव्यवहार रोखण्यासाठी कायद्यात बदल

**मुंबई :** राज्यातील दस्त नोंदणी प्रक्रिया अधिक पारदर्शक करण्यासाठी आणि मुद्रांक शुल्कातील गैरव्यवहारांना चाप लावण्यासाठी केंद्र सरकार लवकरच कायद्यात महत्त्वपूर्ण बदल करणार आहे. यामुळे बनावट कागदपत्रांच्या आधारे होणारी मालमत्तांची विक्री आणि



फसवणुकीचे प्रकार रोखणे शक्य होईल, अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज विधानसभेत दिली. रत्नाकर गुट्टे यांनी यासंदर्भात लक्षवेधी सूचना मांडली होती. त्यावर झालेल्या चर्चेदरम्यान योगेश सागर यांनी मुंबईतील एका प्रकरणाकडे सभागृहाचे लक्ष वेधले. जुहू येथील एका पारशी कुटुंबाची मालमत्ता बनावट कागदपत्रे तयार करून परस्पर विकली गेल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. सध्याच्या नोंदणी कायद्यातील पळवाटांचा आधार घेऊन अनेक ठिकाणी भूमाफिया सक्रिय झाले आहेत.

# पीएनजी असलेल्या भागात सिलेंडर नाही

## केंद्र सरकारचा निर्णय; गॅस वाहिनी जोडणीसाठी तीन महिन्यांची मुदत

◆ **नवी दिल्ली, २५ मार्च**

देशातील ऊर्जा साखळीत सुधारणा करण्याच्या उद्देशाने ज्या भागात पाईपद्वारे नैसर्गिक वायू (पीएनजी) उपलब्ध आहे, अशा ठिकाणी घरगुती गॅस ग्राहकांनी पीएनजी जोडणी घेणे आता अनिवार्य करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. पीएनजीची सुविधा उपलब्ध असूनही ज्या कुटुंबांनी ही जोडणी घेतलेली नाही, त्यांचा एलपीजी सिलेंडरचा पुरवठा तीन महिन्यांनंतर कायमचा खंडित केला जाईल, असा आदेश केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने जारी केला आहे.

एकाच इंधनावरील अवलंबित्व कमी करण्याच्या उद्देशाने जारी केलेल्या एका नवीन आदेशानुसार, जिथे पाईपद्वारे नैसर्गिक वायूची जोडणी उपलब्ध आहे, तिथे ग्राहकांनी पाईपद्वारे नैसर्गिक वायूचा वापर सुरू न केल्यास घरांना होणारा स्वयंपाकाच्या एलपीजी गॅसचा पुरवठा बंद केला जाईल. पश्चिम आशियातील युद्धामुळे प्रमुख स्रोतांकडून होणारा पुरवठा विस्कळीत झाल्याने भारत एलपीजीच्या तुटवड्याचा सामना करत असताना, सरकार घरगुती आणि व्यावसायिक वापरकर्त्यांना पीएनजी वापरण्यासाठी प्रोत्साहित करत आहे. एकाच प्रकारच्या इंधनावर अवलंबून न राहता इंधन विविधीकरण करणे हा यामागचा मुख्य हेतू आहे. (वृत्तसंस्था)

# बाजारात तेजीचे सत्र कायम; निफ्टी २३,३०० च्या वर

◆ **पुणे, २५ मार्च**

भारतीय शेअर बाजारात बुधवारी सलग दुसऱ्या दिवशी तेजीचे वातावरण पाहायला मिळाले. निफ्टीने २३,३०० चा टप्पा ओलांडला असून सर्वच क्षेत्रांतील शेअर्समध्ये झालेल्या जोरदार खरेदीमुळे गुंतवणूकदारांना मोठा दिलासा मिळाला आहे.



अमेरिका आणि इराणमधील तणाव निवळण्याची शक्यता निर्माण झाल्याने जागतिक स्तरावर सकारात्मक संकेत मिळाले. याचा परिणाम म्हणून भारतीय बाजार सुरुवातीपासूनच नफ्यात होता. व्यवहारादरम्यान निफ्टीने २३,४६५.३५ या उच्चांकी पातळीला स्पर्श केला होता, मात्र शेवटच्या तासात झालेल्या नफावसुलीमुळे ही वाढ काहीशी मर्यादित राहिली. दिवसअखेर सेन्सेक्स १,२०५ अंकांनी (१.६३ टक्के) वधारून ७५,२७३.४५ वर बंद झाला. तर निफ्टी ३९४.०५ अंकांनी (१.७२ टक्के) वाढून २३,३०६.४५ वर स्थिरावला.

**गुंतवणूकदारांच्या संपत्तीत मोठी भर**

बाजार वाढल्याने बीएसई सूचीबद्ध कंपन्यांचे एकूण बाजार भांडवल ७.८२ लाख कोटी रुपयांनी वाढून ४३०.९९ लाख कोटी रुपयांवर पोहोचले.

मंगळवारी हे भांडवल ४२३.१६ लाख कोटी रुपये होते. मध्यम आणि लघु श्रेणीतील शेअर्सनी सलग दुसऱ्या दिवशी उत्तम कामगिरी केली. मिडकॅप निर्देशांक २.३ टक्क्यांनी तर स्मॉलकॅप निर्देशांक २.६ टक्क्यांनी वधारला.

बुधवारी बाजारातील सर्वच क्षेत्रीय निर्देशांक वाढीसह बंद झाले. यामध्ये प्रामुख्याने ग्राहक उपयोगी वस्तू, रिअल्टी आणि सरकारी बँकांच्या शेअर्समध्ये मोठी वाढ दिसून आली. बाजारातील तेजीच्या तुलनेत रुपयाची स्थिती मात्र चिंताजनक राहिली. परदेशी गुंतवणूकदारांनी सातत्याने पैसे काढून घेतल्याने रुपया ९३.९७ या ऐतिहासिक नीचांकी स्तरावर पोहोचला.

गेल्या काही दिवसांतील घसरणीनंतर निफ्टीने आता १० दिवसांच्या सरासरीचा टप्पा ओलांडला आहे, जे बाजाराच्या मजबुतीचे लक्षण मानले जात आहे. येत्या काळात २३,०६० ही निफ्टीसाठी महत्त्वाची आधारभूत पातळी असेल. (वृत्तसंस्था)

# १०० नवीन विमानतळ निर्माण करणार

## उडान २ योजनेला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी

◆ **नवी दिल्ली, २५ मार्च**

प्रादेशिक हवाई संपर्क सुविधा आणखी मजबूत करण्यासाठी महत्वाकांक्षी अशा उडान २ योजनेला केंद्र सरकारने मंजुरी दिली. या योजनेत देशात १०० नवीन विमानतळ आणि २०० हेलिपॅड उभे केले जाणार आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी नवीन संसद भवनात झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निणंय घेण्यात आला. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यानी नंतर या निर्णयांची माहिती दिली. सुधारित उडाण योजना २०२५ २६ ते २०३५ ३६ अशा दहा वर्षासाठी राहणार असून यासाठी २८८४० कोटी रुपयांची अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे. उडान २ योजनेत छोट्या शहरांना जोडले जाणार असून यामुळे या शहरातील आर्थिक घडामोडी, व्यापार, उद्योग आणि पर्यटन याला चालना मिळणार आहे.

उडान दोन योजनेचा शुभारंभ ऑक्टोबर महिन्यात केला जाणार असून यामुळे टायर २ आणि टायर ३ शहरातील नागरिकांना कमी खर्चात विमानप्रवासाचा आनंद लुटता येणार आहे. गेल्या ९ वर्षात देशात ९५ विमानतळ आणि हेलिपॅड उभारण्यात आले असून विमानतळांवरुन नव्या ६६३ हवाई मार्गांना मंजुरी देण्यात आली आहे. एका विमानतळासाठी १०० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून याशिवाय १२१५९ कोटी रुपयांची अर्थसंकल्पीय तरतूदही करण्यात आली आहे. (तभा वृत्तसेवा)

### २०० हेलिपॅड विकसित करणार

**या योजनेत २०० हेलिपॅडही विकसित केले जाणार असून त्यासाठी ३६६१ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. उडान योजनेत विमान कंपन्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी १००४३ कोटी रुपयांची अतिरिक्त तरतूद करण्यात आली आहे.**



# रशियाकडून सहा कोटी बॅरल तेल खरेदी

◆ **नवी दिल्ली, २५ मार्च**

आखाती देशातील युद्धस्थितीच्या पृष्ठभूमीवर भारताने रशियाकडून तब्बल सहा कोटी बॅरल तेलाची खरेदी केली आहे. एप्रिल महिन्यात या तेलाचा पुरवठा होणार आहे.

अमेरिका-इस्रायल आणि इराणमध्ये युद्ध सुरू असल्याने होर्मूझच्या सामुद्रधुनीतील जल वाहतूक ठप्प झाली आहे. अमेरिकेने रशियन तेल खरेदीसाठी ३० दिवसांची मुभा दिली आहे. एप्रिलच्या पहिल्या पंधरवड्यात ही मुदत संपणार आहे. त्यामुळे भारताने रशियन तेलाची खरेदी वाढविली आहे. वाढलेल्या मागणीमुळे रशियाने ब्रेंट क्रूडच्या तुलनेत ५ ते १५ डॉलर्स अधिकचा दर आकारण्यास सुरुवात केली आहे. यापूर्वी भारताला सवलतीच्या दरात तेल देण्यात येत होते. (वृत्तसंस्था)

# 'वंदे मातरम्'ला आव्हान देणारी याचिका फेटाळली

## भेदभावाची भीती निरर्थक; सुप्रीम कोर्टाने फटकारले

◆ **नवी दिल्ली, २५ मार्च**

राष्ट्रीय गीत वंदे मातरम् गाण्यासंदर्भात गृह मंत्रालयाने जानेवारी महिन्यात जारी केलेल्या परिपत्रकाविरुद्ध दाखल केलेली याचिका बुधवारी सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली. सार्वजनिक ठिकाणी आणि सार्वजनिक कार्यक्रमांसाठी जारी केलेल्या केंद्र सरकारच्या निर्देशात बंधनकारक, असा उल्लेख नाही. शिवाय निर्देशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी अद्याप नोटीस किंवा कारवाई करण्यात आलेली नसताना केंद्र सरकारच्या निर्णयावर आक्षेप घेणे चुकीचे आहे. तुमची भेदभावाची भीती निरर्थक आहे, अशा शब्दांत न्यायासनाने याचिकाकर्त्याला फटकारले.



एका खासगी शाळेचे संचालक मोहम्मद सईद नूरी यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सरन्यायाधीश सूर्य कांत, न्या. जॉयमाल्या बागची आणि न्या. विपुल एम पंचोली यांच्या न्यायासनाने सुनावणी घेतली. याचिकाकर्त्याचे वकील संजय हेगडे यांनी युक्तिवादात वंदे मातरम् गीत सक्तीचे करण्याचा निर्णय भेदभावाला प्रोत्साहन देणारा असल्याचे म्हटले. यावर सरन्यायाधीश म्हणाले, गृह मंत्रालयाच्या परिपत्रकात वंदे मातरम् न गायल्यास शिक्षेची तरतूद नाही. आम्हाला ती नोटीस दाखवा ज्यात तुम्हाला राष्ट्रीय गीत गाण्यासाठी भाग पाडले गेले. तुम्ही एक शाळा चालवता, ती मान्यताप्राप्त आहे की नाही हे देखील आम्हाला माहीत नाही. यावर याचिकाकर्त्याचे वकील म्हणाले, परिपत्रक काढण्याचा उद्देश राष्ट्रगीतासोबत लोकांना वंदे मातरम् गाण्यास भाग पाडणे हाच असल्याचे दिसते. यावर न्या. बागची म्हणाल्या, तुमच्या विरोधात कोणती कारवाई झाली, नोटीस आली, तर तुम्ही पुन्हा न्यायालयात येऊ शकता. सध्या ही याचिका भेदभावाच्या एका अस्पष्ट भीतीशिवाय दुसरे काहीही नसल्याने आम्ही फेटाळत आहे. (वृत्तसंस्था)

### दिशानिर्देश केवळ एक प्रोटोकॉल

**हेगडे यांनी युक्तिवाद करताना सांगितले, लोकांचा धर्म कोणताही असो, त्यांना राष्ट्रीय गीत गाण्याची सक्ती केली जाऊ नये. संबंधित परिपत्रक सामाजिक बंधन लादणारे आहे. यावर न्यायासन म्हणाले, राष्ट्रीय गीत न गायल्यास दंडाची काही तरतूद आहे का, यावर हेगडे म्हणाले, वंदे मातरम गायनात व्यत्यय आणल्यास दंडाची तरतूद करण्यात आली आहे. यावर न्यायासनाने स्पष्ट केले की, केंद्र सरकारचा दिशानिर्देश केवळ एक प्रोटोकॉल आहेत.**

### परिपत्रकात काय आहे दिशा-निर्देश

- **सरकारी कार्यक्रम, शाळा किंवा इतर औपचारिक आयोजनांमध्ये 'वंदे मातरम' वाजवले जाईल. यावेळी प्रत्येक व्यक्तीने उभे राहणे अनिवार्य असेल.**
- **'वंदे मातरम' आणि 'जन गण मन' एकत्र गायले किंवा वाजवले गेले, तर आधी वंदे मातरम गायले जाईल. यावेळी सावधान मुद्रेत उभे राहावे लागेल.**
- **नवीन नियमांनुसार, राष्ट्रीय गीताचे सर्व ६ अंतरे गायले जातील, ज्यांची एकूण वेळ ३ मिनिटे १० सेकंद आहे.**
- **१० पानांच्या सविस्तर आदेशात राष्ट्रीय गीत गायनावेळी व्यत्यय आणल्यास दंडाची तरतूद करण्यात आली.**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख...

# ...असे 'डबल ढोलकी' शोधून काढा!

समजा, १०० मीटर धावण्याची शर्यत आहे. काही धावपटूंकडे उत्तम प्रशिक्षण आहे. जोरात धावण्याकरिता मदत करणारे चांगले जोडे आहेत. उलट, शर्यतीतील काही जण अनवाणी आहेत. शिवाय त्यांना नीट जेवणही मिळालेले नाही. अशा वेळी या सर्वांना सरसकट एका रेषेत उभे करणे अन्यायकारक ठरेल आणि म्हणून ज्यांच्याकडे आवश्यक सोयी नाहीत, त्यांना शर्यतीत थोडे पुढे उभे करणे म्हणजे सोप्या भाषेत 'आरक्षण'! भारताच्या सामाजिक आणि घटनात्मक संरचनेत अशा वर्गांसाठी लागू करण्यात आलेले आरक्षण हे केवळ आर्थिक सबलीकरणाचे साधन नसून, ते शतकानुशतके सोसलेल्या सामाजिक विषमतेच्या जखमेवरील फुंकर आहे. त्यांची ती जखम बरी व्हावी म्हणून त्यांना दिलेला मदतीचा हात आहे. मात्र, स्वार्थासाठी धर्मांतर करूनही आपल्या मूळ जातीच्या आरक्षणाचे फायदे लाटणारे डबल ढोलकी बडविणारे लोकही आहेतच. अशा लोकांचे पराक्रम पाहता, सर्वोच्च न्यायालयाने नुकताच दिलेला निकाल अत्यंत महत्त्वाचा आणि दिशादर्शक असा आहे. न्यायालयाने अगदी स्पष्ट केले आहे की, एखादी व्यक्ती ख्रिश्चन धर्म स्वीकारत असेल आणि त्याचे सक्रिय पालन करीत असेल, तर ती व्यक्ती 'अनुसूचित जाती' प्रवर्गाचे लाभ घेण्यास पात्र ठरत नाही. तसा हा निर्णय अगदीच नवा नाही. ही १९५० च्या घटनात्मक आदेशाची केलेली योग्य आणि परखड मांडणी आहे. उशिरा का असेना, पण आता त्याबाबतची स्पष्ट व्याख्या समोर आल्याने अशा प्रकारावर आळा बसेल, अशी आशा करू या.

या वादाच्या मुळाशी गेल्यास, संविधानातील (अनुसूचित जाती) आदेश १९५० च्या कलम ३ मध्ये अत्यंत स्पष्टपणे नमूद केले आहे की, हिंदू, शीख किंवा बौद्ध धर्माव्यतिरिक्त इतर कोणत्याही धर्माचा स्वीकार करणारी व्यक्ती अनुसूचित जातीची मानली जाणार नाही. घटनेत ही तरतूद अतिशय विचारपूर्वक करण्यात आली होती. अनुसूचित जातीचा दर्जा हा प्रामुख्याने 'अस्पृश्यता' या तत्कालीन कुप्रथेमुळे निर्माण झालेल्या सामाजिक मागासलेपणावर आधारित होता. जेव्हा एखादी व्यक्ती ख्रिश्चन किंवा इस्लामसारखा धर्म स्वीकारते तेव्हा, ती व्यक्ती सैद्धांतिकदृष्ट्या अशा धर्मात प्रवेश करते जिथे 'जातिव्यवस्था' किंवा 'अस्पृश्यता' जवळजवळ नाही. किमान तसा दावा केला जातो. त्यामुळे धर्मांतर केल्यानंतर त्या व्यक्तीवरचा अस्पृश्यतेचा शिक्का आपसूकच पुसला जातो, असेच मानले पाहिजे. सर्वोच्च न्यायालयानेही नेमक्या याच तांत्रिक आणि घटनात्मक मुद्यावर बोट ठेवले आहे. न्यायालयाने स्पष्ट केले की, ख्रिश्चन धर्म स्वीकारल्यानंतर संबंधित व्यक्तीला अनुसूचित जातीचे फायदे किंवा 'अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत' संरक्षण मिळू शकत नाही. त्यामुळे आता याबाबत शंका घेण्याचे काही कारण नाही.

आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाच्या निकालाला कायम ठेवताना, सर्वोच्च न्यायालयाने दिलेला हा आदेश एका विशिष्ट प्रकरणावर आधारित आहे. जिथे, ख्रिश्चन धर्म स्वीकारून पाद्री म्हणून काम करणाऱ्या व्यक्तीने अनुसूचित जातीच्या सवलतींवरही दावा केला होता. तो न्यायालयाने फेटाळला. या निकालामुळे एक मोठा कायदेशीर संभ्रम दूर झाला आहे. न्यायालयाने म्हटले आहे की, एखादी व्यक्ती स्वेच्छेने धर्मांतर करीत असेल, तर त्या धर्माच्या नियमानुसार आणि सामाजिक चौकटीत त्याला राहावे लागेल. ख्रिस्ती धर्मात अधिकृतपणे 'जातिव्यवस्था' अस्तित्वात नसल्यामुळे, तिथल्या अनुयायांना हिंदू धर्मातील सामाजिक उतरंडीवर आधारित आरक्षण मागण्याचा कोणताही नैतिक किंवा कायदेशीर अधिकार उरत नाही. या मुद्याकडे लक्ष वेधले जाण्यास थोडा उशीर झाला खरा. कारण अनेक दशकांपासून अनेक धर्मांतरित व्यक्ती दुहेरी लाभ घेत आहेत. आपल्या आसपास ते स्पष्टपणे दिसतेही. अनेक पाद्रींची नावे बघितली तरी ते स्पष्ट होते. त्यामुळे तशा तक्रारी येतच होत्या. एकीकडे अल्पसंख्यक म्हणून मिळणाऱ्या सवलती आणि दुसरीकडे अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र वापरून मिळणारे आरक्षणही, अशा दुहेरी लाभांमुळे खऱ्या अर्थाने गरजू असलेल्या आणि मूळ धर्मात राहिलेल्या अनुसूचित जातिबांधवांवर अन्याय होत आहे, हेही समजून घेतले पाहिजे. ख्रिश्चन धर्मात जाऊन आपले नाव बदलणे, त्या धर्मानुसार प्रार्थना करणे, आपण पुरोगामी झालो आहोत, असा प्रचार करणे आणि वरून ज्या धर्मातील अनुसूचित जातीतून आलो, त्या जातीच्या आरक्षणाचा आणि अन्य सुविधांचा लाभही घेत राहणे, हा दुटप्पीपणा समाजात अनेकांच्या बाबतीत घडताना दिसतो. आम्ही ख्रिश्चन झालो असलो तरी आमच्या शाळा सोडल्याच्या दाखल्यावर अजूनही आमची हिंदू धर्मातील जात लिहिलेली आहे आणि त्यामुळे आम्ही त्याचा लाभ घेत आहोत, असा त्यांचा युक्तिवाद...!, जो खऱ्या अनुसूचित समुदायांतील व्यक्तींवर अन्याय करणारा ठरतो.

ख्रिश्चन धर्माचा प्रचार करताना, हा धर्म समतावादी आहे आणि तेथे उच्च-नीच भेदभाव नाही, असा दावा त्यांच्याकडून केला जातो. तसे ते खरे नाहीच. कारण 'कन्व्हर्टेड' ख्रिश्चनांना मूळ ख्रिश्चन न मानणे हाही एक प्रकारे भेदभावच आहे! तरीही या धर्मात भेदभाव नाही असे आपण गृहीत धरले, तर धर्मांतरित व्यक्तीने पुन्हा जातीच्या आधारावर आरक्षणाची मागणी करणे हा त्यांच्या नवीन धर्माच्या शिकवणीचाही अपमानच ठरेल की नाही? म्हणजे तेथेही धर्मनिष्ठा नाहीच! आधीची निष्ठा सोडायची, पण सवलती सोडायच्या नाहीत, ही केवळ स्वार्थी सोय म्हणावी लागेल. आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाने आपल्या निरीक्षणात स्पष्टच म्हटले की, ख्रिस्ती धर्मात जातीय व्यवस्था अस्तित्वात नाही. जर तिथे जातच नाही, तर मग अनुसूचित जातीचा दाखला कशासाठी?

धर्मांतर हा ज्याचा त्याचा वैयक्तिक प्रश्न असू शकतो, परंतु जेव्हा सार्वजनिक संसाधने आणि घटनात्मक संरक्षणाचा सवाल येतो, तेव्हा नियमांचे पालन होणे अनिवार्य असते. हिंदू धर्मातील जुन्या विषमतावादी प्रथांमुळे वंचित वर्गांना आरक्षण द्यावे लागले. तो त्यांना सामाजिक न्याय देण्याचा मुद्दा आहे. आता जर कुणी स्वेच्छेने दुसरा धर्म स्वीकारत असेल, तर त्याने जुन्या ओळखीचे किंवा जातीचे फायदेही त्यागले पाहिजेत. सातत्याने उकळत राहिलेल्या लाभांवर तुळशीपत्र ठेवले पाहिजे. सर्वोच्च न्यायालयाच्या या स्पष्टीकरणानंतर आता चेंडू प्रशासनाच्या कोर्टात आहे. ज्या अनुसूचित जातीच्या हिंदूंनी ख्रिश्चन धर्म स्वीकारला आणि तरीही जे छुप्या पद्धतीने किंवा कागदोपत्री बदल न करता अनुसूचित जातीचे फायदे घेतच आहेत, अशा व्यक्तींना शोधले पाहिजे. ते अजिबात कठीण नाही. शोध घेतला की लाखोंच्या संख्येने असे दुटप्पी व स्वार्थी लोक समोर येतील. त्यासाठी सरकारने विशेष मोहीम राबवून जात जात प्रमाणपत्रांची फेरतपासणी करायला हवी. विशेषतः धर्मांतराचे प्रमाण मोठे असलेल्या भागांत हे केले पाहिजे. जे लोक असे दुहेरी लाभ घेत आहेत, त्यांच्या अनुसूचित जातीच्या सवलती तत्काळ प्रभावाने रद्द केल्या पाहिजेत. शैक्षणिक संस्था आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये अशा उमेदवारांच्या धार्मिक स्थितीची कडक तपासणी होणे आवश्यक आहे.

आरक्षण ही काही 'गरिबी हटाव' योजना नाही. ती एक सामाजिक न्यायाची लढाई आहे. जोपर्यंत एखादी व्यक्ती आपल्या मूळ पारंपरिक धर्मात आहे, तोपर्यंतच तिला त्या संरक्षणाची गरज असते. एकदा का धर्मांतर झाले की, जुन्या सामाजिक ओळखीचे कायदेशीर अस्तित्व संपुष्टात येते, हे आता सर्वोच्च न्यायालयाने अधोरेखित केले आहे. त्यामुळे, खऱ्या अर्थाने अनुसूचित जातीच्या सवलतींचा लाभ हा केवळ अशाच व्यक्तींना मिळाला पाहिजे, ज्यांनी प्रतिकूल परिस्थितीतही आपल्या मूळ धर्माशी आणि संस्कृतीशी फारकत घेतलेली नाही. जे लोक धर्मांतर करून केवळ स्वतःच्या लाभासाठी जुन्या जातीचा सर्रास वापर करीत आहेत, त्यांना शोधून काढले पाहिजे, त्यांच्या सुविधा संपुष्टात आणल्या पाहिजेत. आरक्षणास पात्र असलेल्या लोकांमधून अशा डबल ढोलकीवाल्यांची संख्या कमी झाली तर ते मूळ धर्मातील वंचित वर्गांच्या फायद्याचे असेल आणि तोच खऱ्या अर्थाने संविधानाचाही सन्मान ठरेल.

## प्रासंगिक

# मन मंदिरातील राम

प्रसाद दत्तात्रेय पोफळी

सध्या सोशल मीडियाचे युग आहे. चोवीस तास माहितीचा भडिमार आणि क्षणाक्षणाला बदलणारे ट्रेंड्स यांच्या गराड्यात आपण जगत आहोत. अशा काळात रामायण काळातील, सत्ययुगातील रामचरित्राचे वर्तमान संदर्भात काय औचित्य? असा प्रश्न कधीकधी काही लोकांच्या मनात येतो.

''आजकाल ना कशातच राम राहिला नाही!'' कधी कधी उद्वेगाने आलेले निराशेचे असे उद्गार आपल्या कानावर अनेकदा पडतात. ''रामचंद्र कह गए सिया से ऐसा कलयुग आएगा, हंस चुगेगा दाना और कौआ मोती खायेगा'' एका गाण्यात प्रत्यक्ष श्रीरामांच्या तोंडी असलेल्या या ओळी आपल्याला प्रत्ययास येत आहेत असेही कधी कधी आपल्याला जाणवायला लागते. आणि आपण विचार करायला लागतो की खरंच आजकाल कशात रामच राहिला नाही!

असा विचार करीत असतानाच आज रामनवमीच्या दिवशी श्रीरामाच्या चरित्राचे, गीतरामायणाचे बोल आपल्या कानावर पडत असतात. आदर्श आणि व्यवहार यांचे द्वंद्व मनात सुरू असते. पण जर आपण श्रीरामांकडे केवळ एक दैवत म्हणून न पाहता एक आदर्श मनुष्य (मर्यादा पुरुषोत्तम) म्हणून पाहिले, तर या वर्तमान काळात जगताना तेच सर्वांत मोठे मार्गदर्शक ठरतात. समाजातील व्यवहार आणि मानवी मूल्ये यांचा आपल्या व्यावहारिक जीवनात ताळमेळ साधण्यासाठी श्रीरामाकडे देव म्हणून नव्हे तर माणूस म्हणून बघायला, त्यादृष्टीने त्यांचे चरित्र वाचायला शिकले पाहिजे.

**कर्तव्यदक्षता आणि नातेसंबंध** : श्रीरामाचे आपल्या पत्नीबद्दलचे, सीतेबद्दलचे प्रेम हे केवळ भावनिक नव्हते, तर ते स्त्री सन्मान आणि आदर यावर आधारलेले होते. आजच्या केवळ शारीरिक आकर्षणाच्या आणि भौतिक सुखाच्या पाठीमागे धावण्याच्या काळात जिथे नाती ठिसूळ होत आहेत, तिथे रामाचे एकपत्नीव्रत आणि सीतेची कठीण प्रसंगातही पत्नी म्हणून पतीला साथ देण्याची वृत्ती प्रेरणादायी आहे. पण असा राम आणि अशी सीता आपल्या युवा पिढीच्या मनात लहानपणापासून रुजविण्याचे काम आपण केले आहे का? आणि आजही करतो आहोत का ?

शक्ती, बुद्धी, युद्ध कौशल्य, पराक्रम या सर्व बाबींमध्ये सर्वश्रेष्ठ असलेला राम कैकैयीच्या सावत्रभावाने झालेल्या अन्यायाने पेटून उठत नाही. उलट यामुळे आपल्या पित्यावर ओढवलेल्या धर्मसंकटात त्यांना धीर देत, निर्माण झालेली परिस्थिती स्वीकारून वनवासाला जाण्याची तयारी करते.



त्याचप्रमाणे श्रीरामाच्या पादुका ठेवून राज्य करणारा भरत हे बंधुप्रेमाचे अत्युच्च शिखर आहे. १४ वर्षांचा वनवास संपवून राम जेव्हा अयोध्येला परत येतात तेव्हा आपल्या खांद्यावरचे मानवस्त्र जमिनीवर पसरवून रामचरणांसाठी पायघड्या घालणारा भरत रामाइतकाच महत्त्वाचा. पण भावाकडून अशी अपेक्षा करतानाच त्यासाठी आधी रामासारखी संतुलित, संयमित वृत्ती आपल्या मनात असायला हवी.

**लोकसंग्रह आणि नेतृत्व** : श्रीरामांनी अयोध्येच्या गादीवर बसून सत्ता गाजवली नाही तरीही बालपणी आणि किशोरावस्थेत अयोध्या नगरवासीयांच्या सोबतच्या त्यांच्या व्यवहाराने नगरवासीयांच्या मनात रामाप्रति आत्मीयतेची भावना निर्माण झाली होती. राम वनवासाला निघाले असताना त्यांच्या मागोमाग नगराच्या वेशीपर्यंत धावत जाणारे प्रजाजन हे त्या आत्मीयभावाचे दर्शन आहे. आज लोकनेत्याच्या मनात जनसामान्यांविषयी संवेदनशीलता आणि जनमानसात नेत्यांप्रति अशी आत्मीयता असावी असे वाटत असेल तर दोघांच्याही मनात राम असायलाच हवा ना !

मर्यादित साधनांतून उद्दिष्ट साध्य करण्याचे कौशल्य : आजच्या कॉर्पोरेट जगात आपण लीडरशिप आणि टीम मॅनेजमेंट शिकतो, पण रामाचे चरित्र हे याचा चालता-बोलता वस्तुपाठ आहे. राजमहालातून निघून वनवास स्वीकारणे म्हणजे खरे तर अडचणींचा डोंगरच समोर उभा होता. पण त्या वनवासातील काळात जागोजागी वनात वसलेल्या वनवासींना आपल्या आत्मीय व्यवहाराने आपल्यासोबत जोडून घेण्यासाठी त्याचा उपयोग करण्याचे आणि वनवासाला आपत्ती न समजता त्याचीच इष्टापत्ती करण्याचे व्यवहारचातुर्य रामांनी दाखविले. रामाचे संघटनकौशल्य, युद्धचातुर्य आणि नेतृत्वगुण तेव्हा दिसतात जेव्हा ते कोणत्याही मोठ्या सैन्याशिवाय, केवळ वनवासी आणि वानर टोळीच्या मदतीने बलाढ्य रावणाचा पराभव करतात. आजच्या भाषेत सांगायचे तर, मर्यादित संसाधनांचा प्रभावी वापर करून अशक्य ध्येय गाठणे हे रामाकडून शिकण्यासारखे आहे. सोशल मीडिया आणि आपली वैचारिक पातळी : सोशल मीडियावर आज अनेक विषयांच्या संदर्भात पोस्ट आणि प्रतिक्रियांचा पाऊस पडत असतो. जेवढी मने तेवढी मतमतांतरे तर असतातच. काही कायम असंतुष्ट लोकांच्या पोस्ट्स तर संताप आणणाऱ्या असतात. पण त्यावर व्यक्त होतानाही आजकाल बरेचदा आक्रस्ताळेपणा, अकांडतांडव बघायला मिळतो. त्या प्रतिक्रियांचा, भाषेचा स्तरही तितकाच खालावलेला असतो.

जगातील आनंदी देशांच्या क्रमवारीत आज भारत ११६ व्या क्रमांकावर आहे असे नुकतेच जाहीर झाले आहे. (ही तुलना करण्याचे आणि हे ठरविण्याचे त्यांचे मापदंड कितपत योग्य आहेत हा भाग वेगळा) पण आपण मागे का पडतो?

याचे एक मुख्य कारण म्हणजे, आपली रामकृपेवरची श्रद्धा, प्राप्त परिस्थितीत संतुष्ट राहण्याची वृत्ती, ती इष्टापत्तीच आहे असा मनात असलेला विश्वास डळमळीत झाला आहे. मग मंदिरात राम आला असला तरी आपल्या मनात राम राहिला नाही काय? असा प्रश्न सहजच मनात येतो.

**मंदिरे** : केवळ वास्तू नव्हे, तर ऊर्जा केंद्रे : आज आपण भव्य मंदिरे उभारत आहोत, पण ही मंदिरे केवळ गाभाऱ्यातील मूर्तींच्या दर्शनापुरती मर्यादित न राहता ती ऊर्जा केंद्रे व्हायला हवीत. तिथून सामाजिक समरसता, शिस्त आणि चारित्र्यनिर्मितीचा राम विचार मनामनात प्रसवला पाहिजे. जेव्हा समाज रामाच्या गुणांचे अनुकरण करतो, तेव्हाच खऱ्या अर्थाने मंदिराचे उद्दिष्ट साध्य होते.

''रामजन्मभूमीतील भव्य मंदिरात श्रीरामांची प्राण प्रतिष्ठापना झाली आता समाजात प्रत्येक मनमंदिरात रामाची प्रतिष्ठापना व्हायला हवी.'' २२ जानेवारी २०२४ ला राम जन्मभूमी अयोध्या येथे श्रीरामांच्या बालमूर्तीची प्राण प्रतिष्ठापना झाली त्यावेळी बोलताना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पू. सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी केलेले हे वक्तव्य आहे.

जेव्हा आपल्या मनात राम प्रतिष्ठापित होईल, तो नेहमी जागा राहील, आपल्या विचारांत आणि कृतीत उतरेल तेव्हाच समाजात संयम, नीतिमत्ता आणि आनंद नांदेल. या मर्यादा पुरुषोत्तम श्रीरामाची तुमच्या, माझ्या, सर्वांच्या मनामनात प्रतिष्ठापना व्हावी हीच या रामनवमी उत्सव निमित्ताने श्रीराम चरणी प्रार्थना!

९८२२५६९६४८

## दिल्ली वार्तापत्र

# नरेंद्र मोदी यांचा असाही विक्रम

श्यामकांत जहागीरदार

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधानपदावर विराजमान झाल्यापासून अनेक विक्रम केलेत. देशातील सर्वाधिक लोकप्रिय पंतप्रधान म्हणून मोदी ओळखले जातात. एकेकाळी क्रिकेटमध्ये सुनील गावस्कर आणि नंतर सचिन तेंडुलकर यांनी जेवढे विक्रम केलेत, तेवढे विक्रम मोदी यांनी राजकारणात आधी मुख्यमंत्री आणि नंतर पंतप्रधान म्हणून केलेत. २२ मार्चला मोदी यांनी सरकारप्रमुख म्हणून काम करण्याचा सिक्कीमचे तत्कालीन मुख्यमंत्री पवनकुमार चामलिंग यांचा ८९३० दिवसांचा विक्रम मोडत ८९३१ व्या दिवसामध्ये प्रवेश केला. चामलिंग यांनी ८९३० दिवस सिक्कीमचे मुख्यमंत्रिपद भूषवले, देशात सर्वाधिक काळ सरकारप्रमुख म्हणजे मुख्यमंत्रिपदावर राहण्याचा विक्रम चामलिंग यांच्या नावावर आहे. तो विक्रम आता कोणी मोडू शकेल, असे वाटत नाही.

गुजरातचे मुख्यमंत्री आणि देशाचे पंतप्रधान म्हणून मोदी यांनी ८९३१ दिवस काम करत सरकारप्रमुख म्हणून ८९३० दिवस काम करण्याचा सिक्कीमचे माजी मुख्यमंत्री चामलिंग यांचा विक्रम मोडला आहे. हा विक्रम मोडण्यासाठी मोदी यांना मुख्यमंत्री आणि पंतप्रधान अशा दोन्ही पदांवर काम करावे लागले. चामलिंग यांनी मुख्यमंत्री म्हणून एवढा प्रदीर्घ काळ काम करत देशात इतिहास घडवला. मोदी यांनी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून १४ वर्ष काम केले. ७ ऑक्टोबर २००१ ला मोदी यांनी पहिल्यांदा गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. त्यानंतर त्यांच्या नेतृत्वात भाजपाने गुजरात विधानसभेच्या सलग तीन निवडणुका बहुमताने जिंकल्या. सर्वाधिक काळ गुजरातचे मुख्यमंत्रिपद भूषवण्याचा विक्रम मोदी यांच्या नावावर आहे.

२०१४ मध्ये मोदी यांनी पहिल्यांदा देशाचे पंतप्रधान म्हणून शपथ घेतली. गुजरातप्रमाणेच सलग तीन लोकसभा निवडणुका मोदी यांनी भाजपाला जिंकून दिल्या. मोदी पहिल्यांदा मुख्यमंत्री झाले, तेव्हा ते गुजरातच्या मंत्रिमंडळात मंत्री तर सोडा पण गुजरात विधानसभेचे साधे आमदारही नव्हते. ते थेट मुख्यमंत्री झाले. असाच विक्रम मोदी यांनी देशाचे पंतप्रधान म्हणूनही केला. पंतप्रधान होण्याआधी मोदी केंद्रीय मंत्रिमंडळात कधीच नव्हते, एवढेच काय ते लोकसभा वा राज्यसभेचे खासदारही नव्हते. मोदी जसे थेट गुजरातचे मुख्यमंत्री झाले, तसेच थेट देशाचे पंतप्रधानही झाले. येत्या मे महिन्यात मोदी यांच्या पंतप्रधानपदाला १२ वर्ष पूर्ण होतील. तर मुख्यमंत्री आणि पंतप्रधान म्हणून त्यांची २६ वर्षांची कारकीर्द पूर्ण होईल. मुख्यमंत्री म्हणून प्रदीर्घ अनुभव असलेले मोदी देशातील एकमेव पंतप्रधान आहेत.



देशाचे पंतप्रधानपद सर्वाधिक काळ भूषवण्याचा दुसऱ्या क्रमांकाचा विक्रम मोदी यांच्या नावावर आहे. आतापर्यंत हा विक्रम इंदिरा गांधी यांच्या नावावर होता. ४०७७ दिवस इंदिरा गांधी यांनी देशाचे पंतप्रधानपद भूषवले. मोदी यांच्या पंतप्रधानपदाचे ४३१८ दिवस पूर्ण झाले आहेत, म्हणजे मोदी यांनी या पदावर सर्वाधिक काळ राहण्याचा इंदिरा गांधी यांचा दुसऱ्या क्रमांकाचा विक्रम मोडला. इंदिरा गांधी यांना सलग तीनदा पंतप्रधानपदाची शपथ घेता आली नव्हती. मोदी यांनी सलग तीनवेळा पंतप्रधानपदाची शपथ घेतली आहे.

देशाचे पंतप्रधानपद सर्वाधिक काळ भूषवण्याचा विक्रम पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या नावावर आहे. नेहरू ६१२६ दिवस देशाचे पंतप्रधान होते. पण सरकारप्रमुख म्हणून प्रदीर्घ काळ काम करत मोदी यांनी नेहरू यांनाही मागे टाकले आहे. डॉ. मनमोहनसिंग यांनी ३६५६दिवस देशाचे पंतप्रधानपद सांभाळले. अटलबिहारी वाजपेयी २२५६ दिवस देशाचे पंतप्रधान होते. राजीव गांधी फक्त १८५७ दिवस पंतप्रधानपदावर राहिले. देशात असे अनेक पंतप्रधान होऊन गेले, ज्यांना वर्षभरही पंतप्रधानपद सांभाळता आले नाही. काही पंतप्रधान तर संसदेचे तोंडही पाहू शकले नाहीत.

मुख्यमंत्रिपद आणि पंतप्रधानपद सर्वाधिक काळ सांभाळण्याचा विक्रमही मोदी यांच्या नावावर आहे. आतापर्यंत फार कमी असे नेते झाले, ज्यांनी मुख्यमंत्रिपद आणि पंतप्रधानपद अशी दोन्ही पदे सांभाळली. पण दीर्घकाळ ही दोन्ही पदे सांभाळण्याचा विक्रम फक्त मोदी यांच्या नावावरच आहे. तो आता कोणाला आणि कधीच मोडता येईल, असे वाटत नाही. क्रिकेटमधील विक्रम हे मोडण्यासाठीच असतात, त्यामुळे सुनील गावस्कर आणि सचिन तेंडुलकर यांनी केलेले विक्रम नंतरच्या अनेक क्रिकेटपटूंनी मोडले. पण मोदी यांनी राजकारणात केलेले विक्रम कोणी मोडू शकेल, असे वाटत नाही.

चामलिंग यांच्या खालोखाल दुसऱ्या क्रमांकावर ओडिशाचे तत्कालीन मुख्यमंत्री नवीन पटनायक आहेत. पटनायक ८८६५ दिवस ओडिशाचे मुख्यमंत्री होते. ज्योती बसू मुख्यमंत्रिपद सांभाळण्याच्या बाबतीत देशात तिसऱ्या क्रमांकावर आहेत. बसू यांनी ८५३८ दिवस पश्चिम बंगालचे मुख्यमंत्रिपद सांभाळले. अरुणाचल प्रदेशचे मुख्यमंत्री गेगांग अपांग हे यादीत चौथ्या क्रमांकावर आहे. ते ८२८६ दिवस अरुणाचल प्रदेशचे मुख्यमंत्री होते. मिझोरामचे मुख्यमंत्री लालथनवाला हे यादीत पाचव्या क्रमांकावर आहेत. ८०९६ दिवस त्यांनी मिझोरामचे मुख्यमंत्रिपद सांभाळले. हिमाचल प्रदेशचे वीरभद्रसिंह हे यादीत सहाव्या स्थानावर आहे. वीरभद्रसिंह यांनी ७६८३ दिवस हिमाचल प्रदेशचे मुख्यमंत्रिपद सांभाळले. माणिक सरकार ७३०३ दिवस त्रिपुराचे मुख्यमंत्री होते. नितीशकुमार यांनी ७१५४ दिवस बिहारचे मुख्यमंत्रिपद सांभाळले. देशात सर्वाधिक म्हणजे दहावेळा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेण्याचा विक्रम नितीशकुमार यांच्या नावावर आहे, जो अजूनपर्यंत कोणालाच मोडता आला नाही. नागालॅण्डचे नेफ्यू रियो या यादीत दहाव्या क्रमाकांवर आहे, त्यांनी ६९६५ दिवस नागालॅण्डचे मुख्यमंत्रिपद सांभाळले.

गंमत म्हणजे देशात सर्वाधिक काळ मुख्यमंत्रिपद भूषवणाऱ्या या यादीत काँग्रेस आणि भाजपाचा प्रत्येकी एक मुख्यमंत्री आहे. भाजपाचे नरेंद्र मोदी आणि काँग्रेसचे वीरभद्रसिंह हे ते भाग्यवान नेते आहेत. ईशान्य भारतातील पाच राज्यांतील मुख्यमंत्र्यांना हे भाग्य लाभले आहे. प्रादेशिक पक्षात बिजू जनता दलाचे नवीन पटनायक आणि जनता दल संयुक्तचे नितीशकुमार हे या मालिकेतील अन्य भाग्यवान नेते आहेत. या दहा नेत्यांच्या यादीत नवीन पटनायक हे एकमेव असे नेते आहेत, ज्यांचे वडील बिजू पटनायकही ओडिशाचे मुख्यमंत्री होते. या यादीत अन्य कोणताही असा नेता नाही, एकतर ज्याचे वडील मुख्यमंत्री होते वा ज्यांचा मुलगाही नंतर मुख्यमंत्री झाला. मोदी वगळता या यादीतील कोणताही नेता देशाचा पंतप्रधान होऊ शकला नाही. नाही म्हणायला एकदा ज्योती बसू यांच्या नावाची देशाच्या पंतप्रधानपदासाठी चर्चा झाली होती, पण ती फक्त चर्चाच होती. मोदी यांच्या नावावरचा आणखी एक विक्रम म्हणजे स्वतंत्र भारत जन्मलेले ते देशाचे एकमेव पंतप्रधान आहेत. आतापर्यंतच्या सर्व पंतप्रधानांचा जन्म स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वी झाला होता. त्यामुळे देशाच्या स्वातंत्र्याचा सूर्योदय पाहिलेले मोदी एकमेव पंतप्रधान आहेत. देशातील जनतेने पाहिलेल्या स्वप्नांची पूर्तता करणारेही मोदी देशातील एकमेव पंतप्रधान आहेत, मग ते स्वप्न अयोध्येतील रामजन्मभूमीवरील राममंदिराचे असो, जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देणारे घटनेतील ३७० कलम रद्द करण्याचे असो की महिलांना लोकसभा आणि विधानसभेत ३३ टक्के आरक्षण देणारे घटनादुरुस्ती विधेयक पारित करणारे असो. त्यामुळेच मोदींना विक्रमादित्य म्हणायला हरकत नाही.

९८८१७१७८१७

## वेध

नंदकिशोर काथवटे

# भोंदूगिरीचा विकृत चेहरा

महाराष्ट्रात गेल्या १३ वर्षांत भोंदूगिरीचे तब्बल २ हजार गुन्हे नोंदले गेले- ही केवळ आकडेवारी नाही, तर समाजाच्या विवेकबुद्धीवर उठलेला गंभीर प्रश्न आहे. मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, नागपूर ते छत्रपती संभाजीनगर अशा अनेक जिल्ह्यांत हे गुन्हे सातत्याने समोर येत आहेत. म्हणजेच हा प्रश्न एखाद्या गावापुरता किंवा दुर्गम भागापुरता मर्यादित नाही, तर शहरांपासून ग्रामीण भागापर्यंत अंधश्रद्धेची पकड तितकीच मजबूत आहे.

या प्रकरणांमधील सर्वांत वेदनादायक बाब म्हणजे महिलांचे होणारे शोषण. अनेक प्रकरणांत देवदर्शन, उपचार, वाईट शक्ती काढणे अशा नावाखाली महिलांवर अत्याचार झाले, त्यांचे मानसिक आणि शारीरिक शोषण झाले. भीती, लाज आणि सामाजिक दबावामुळे अनेक महिला तक्रार करण्यासही पुढे येत नाहीत. त्यामुळे प्रत्यक्षात घडणाऱ्या घटनांची संख्या ही नोंद झालेल्या गुन्ह्यांपेक्षा कितीतरी पटीने अधिक असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सरकारने अंधश्रद्धा विरोधी कायदा केला, त्यात सुधारणा केल्या, समित्या नेमल्या. पण या कायद्याची अंमलबजावणी अजूनही अपेक्षित पातळीवर दिसत नाही. अनेक वेळा पोलिस यंत्रणा तक्रार आल्याशिवाय हालचाल करत नाही. आणि जेव्हा तक्रार येते, तेव्हा तोपर्यंत मोठी फसवणूक किंवा अत्याचार घडून गेलेला असतो. कायद्याचा धाक निर्माण होण्याऐवजी, भोंदू बाबांची निर्भयता वाढत चालली आहे. पण या सगळ्यात केवळ भोंदू बाबांना दोष देऊन आपण मोकळे होऊ शकत नाही. कारण त्यांची दुकाने चालतात ती आपल्या विश्वासावर. आपणच त्यांच्या पायाशी नतमस्तक होतो, त्यांच्या प्रत्येक शब्दाला सत्य मानतो आणि आपल्या समस्या सोडवण्यासाठी विवेक बाजूला ठेवतो.

आजही अनेक लोक आजारांवर वैद्यकीय उपचाराऐवजी भोंदू बाबांकडे जातात. आर्थिक संकट, कौटुंबिक कलह किंवा वैयक्तिक अडचणी यावर झटपट उपाय मिळेल या आशेने लोक लाखो रुपये खर्च करतात. हा पैसा, हा विश्वास- सगळे काही एका भ्रमावर उभे असते. आणि जेव्हा हा भ्रम तुटतो, तेव्हा हातात उरते ती केवळ फसवणूक. श्रद्धा असावी, पण अंधश्रद्धा नसावी, ही साधी गोष्ट आपण विसरत चाललो आहोत. श्रद्धा माणसाला उभारी देते, पण अंधश्रद्धा त्याला गुलाम बनवते. आज समाजात श्रद्धेच्या नावाखाली अंधश्रद्धा वाढवली जात आहे. काही भोंदू बाबा तर थेट ईश्वरालाच आव्हान देत आहेत, मीच सर्वकाही करू शकतो असा दावा करत आहेत. आणि दुर्दैव म्हणजे, लोक त्यावर विश्वास ठेवत आहेत. महिलांच्या शोषणाच्या घटना, वेगवेगळ्या जिल्ह्यांतील गुन्ह्यांची वाढती संख्या आणि प्रशासनाची संथ भूमिका, या सगळ्यामुळे एक गोष्ट स्पष्ट होते की, हा प्रश्न केवळ कायद्याने सुटणार नाही. यासाठी समाजमन बदलणे अत्यावश्यक आहे. शिक्षण, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि प्रश्न विचारण्याची सवय हेच अंधश्रद्धेवरचे खरे औषध आहे. प्रत्येक व्यक्तीने स्वतःला विचारायला हवे की, आपण खरोखरच विवेकाने जगतोय का? की अजूनही भीती आणि अज्ञानाच्या आधारे निर्णय घेतोय? २ हजार गुन्ह्यांची ही आकडेवारी केवळ भूतकाळ नाही, ती एक इशारा आहे. जर आपण अजूनही जागे झालो नाही, तर उद्या ही संख्या आणखी वाढेल. आणि त्यासाठी दोष फक्त भोंदू बाबांचा नसेल, तर आपल्या अंधविश्वासाचाही असेल.

वेळ आली आहे डोळे उघडण्याची, आवाज उठवण्याची आणि अंधश्रद्धेच्या या साखळ्या तोडण्याची. नाहीतर चमत्कार या नावाखाली आपलीच फसवणूक होत राहील आणि आपण त्याला नियती समजत राहू. या परिस्थितीकडे केवळ सामाजिक प्रश्न म्हणून न पाहता, ती एक गंभीर मानसिकता बनत चालली आहे हेही लक्षात घ्यावे लागेल. अंधश्रद्धेच्या या विळख्यात अनेक कुटुंबांचे आयुष्य उद्ध्वस्त होत आहे. काही ठिकाणी घरातील सर्व निर्णय हे भोंदू बाबांच्या सांगण्यावर घेतले जातात. लग्न, शिक्षण, व्यवसाय, आजारपण यासारख्या महत्त्वाच्या गोष्टींचाही निर्णय विवेकाऐवजी अंधविश्वासावर आधारित घेतला जातो. परिणामी, चुकीचे निर्णय, आर्थिक नुकसान आणि मानसिक ताण यांचे दुष्परिणाम संपूर्ण कुटुंबाला भोगावे लागतात. ही केवळ व्यक्तीची चूक नसून, समाजातील चुकीच्या विचारसरणीची साखळी आहे जी एकामागून एक लोकांना अंधाराकडे ढकलत आहे. म्हणूनच आज गरज आहे ती सामूहिक जबाबदारीची. पालकांनी मुलांना लहानपणापासून वैज्ञानिक दृष्टिकोन देणे, शाळांनी विवेकवादी विचार शिकवणे आणि समाजातील जागरूक घटकांनी अशा प्रकारांविरोधात उघडपणे आवाज उठवणे आवश्यक आहे. माध्यमांनीही फक्त घटना मांडण्यापलीकडे जाऊन जनजागृतीची भूमिका पार पाडली पाहिजे. प्रत्येकाने ठरवले की मी अंधश्रद्धेला बळी पडणार नाही, तरच हा बदल शक्य आहे. कारण भोंदूगिरी थांबवण्याची खरी ताकद कायद्यापेक्षा समाजाच्या जागृतीत आहे आणि ती जागृती आता प्रत्येकाच्या मनात पेटण्याची वेळ आली आहे.

९९२२९९९५८८

### सर्वसामान्यांचे प्रतिनिधी श्रीराम

एक आदर्श राजा म्हणून सर्वप्रथम आपल्या डोळ्यासमोर प्रतिमा येते ती श्रीप्रभू रामाची. राजघराणात जन्म घेतल्यानंतरही श्रीराम सर्वसामान्यप्रमाणे जीवन जगले. हजारो वर्षांपासून ईश्वराचा विष्णूचा अवतार म्हणून समाज त्यांची पूजा करत आला आहे. मात्र संपूर्ण आयुष्यात त्यांनी कधीही चमत्काराचा आधार घेतला नाही. नेहमी चमत्कारांपेक्षा आदर्श कृतीवर भर दिला.

अयोध्येचे राजपद मिळवण्याची पात्रता व समाजमान्यता असूनही केवळ वडिलांची वचनपूर्ती व्हावी म्हणून त्यांनी राजसुखाचा त्याग करून आनंदाने वनवासी जीवन पत्करले. वनवास स्वीकारण्याचा श्रीरामाचा निर्णय व्यक्तिगत असला तरी पत्नी सीता व भाऊ लक्ष्मण यांनी स्वतःच्या इच्छेने सुखासीन जीवनाचा त्याग करून त्यांना साथ देण्याचा निर्णय घेतला. गंगा नदी ओलांडताना केवट या सामान्य नावाड्याला दिलेल्या वचनाची आठवण रावणावर विजय मिळवून अयोध्येला परत येताना श्रीरामांना होती. प्रत्यक्ष ऋषिमुनींनी ज्यांना विष्णू स्वरूप म्हणून वंदिले त्यांची श्रीरामांनी अत्यंत विनम्रतेने व श्रद्धेने सेवा केली. देव असूनही देवत्व न मिरवता अत्यंत साधेपणाने सर्वसामान्याप्रमाणे सर्व आदर्श नियम पाळले. सीतेचा शोध घेण्यासाठी हनुमंताच्या पुढाकाराने त्यांनी वनात राहणाऱ्या वन्य जमातीचा राजा सुग्रीवाशी मैत्री केली. वानरराज वालीच्या वधानंतर दोन गटांत एकता निर्माण केली व रावणासारख्या पराक्रमी राजाविरोधात तेवढीच बलशाली वानरसेना उभी केली. एका सर्वसामान्य माणसाप्रमाणे मानवी गुणांच्या आधारावर कुणालाही कमी न लेखता श्रीरामांनी मोठे कार्य व पराक्रम करून दाखवले. तुमच्या आमच्यासारख्या सामान्य लोकांकडे सुद्धा चमत्कार किंवा मोठे कार्य करण्याचे कुठलेही कौशल्य नसते. परंतु प्रेम, सचोटी, सत्य वचन व नैतिक वागणुकीतून आलेला आत्मविश्वास सामान्य माणसाला यशस्वी बनवतो. हे श्रीरामांनी दाखवून दिले. म्हणूनच, श्रीरामाचे चरित्र व कार्य केवळ कथांपुरते मर्यादित न ठेवता आपण ते आचरणात आणण्याचाही प्रयत्न केला पाहिजे.

**हेमांगी देशपांडे**/७३५०८२३७४२

## वाचक पत्रे

### श्रीरामरक्षा स्तोत्र : दिव्य आध्यात्मिक कवच!

श्रीरामरक्षा स्तोत्र हे बुधकौशिक ऋषींनी रचलेले आहे. हे केवळ स्तोत्र नसून एक दिव्य मंत्र आहे. याची सुरुवात ''श्रीरामरक्षा स्तोत्र मंत्रस्य'' या शब्दांनी होते. मंत्र म्हणजे एक ध्वनी, एक अक्षर, एक शब्द अथवा शब्दांचा समूह! ज्यावेळी ठरावीक लयीत आणि सुरात मंत्र जपला जातो, त्यावेळी त्या जपातून एक विशिष्ट शक्ती निर्माण होते. याकरिता श्रीरामरक्षा स्तोत्र एका विशिष्ट लयीत म्हणणे आवश्यक आहे.

श्रीरामरक्षा स्तोत्राचे श्रद्धेने पठन करणाऱ्या व्यक्तीभोवती सूक्ष्म स्तरावर एक संरक्षक कवच निर्माण होते, जे नकारात्मक शक्तींपासून रक्षण करते. या स्तोत्रात प्रभू श्रीरामांच्या गुणांचे अत्यंत सुंदर वर्णन केलेले आहे. पठन करताना हे गुण आपल्या अंगी यावेत असा भाव जागृत होतो आणि मन अधिक अंतर्मुख बनते. या स्तोत्रामध्ये श्री हनुमान हे आधारभूत रक्षक आणि आदर्श भक्त असल्याचे भावपूर्ण वर्णन आहे. सर्व शक्ती असूनही त्यांनी स्वतःला प्रभू श्रीरामांच्या चरणी समर्पित केले. अखंड रामनाम जप करून ते पूर्णतः राममय झाले. रामभक्ती कशी करावी, प्रभूंचे गुणगान कसे करावे आणि सेवा कशी करावी, हे श्री हनुमानांच्या उदाहरणातून श्रीराम रक्षा स्तोत्रातून शिकायला मिळते. श्रीरामरक्षा स्तोत्राचे नियमित पठन केल्याने शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक बळ प्राप्त होते. नकारात्मक ऊर्जा, भय आणि वाईट प्रवृत्तींवर विजय मिळवण्याची शक्ती मिळते. रामनामाच्या सतत उच्चाराने मन शांत होण्यास साहाय्य होते. मनात आणि घरात सकारात्मक ऊर्जा निर्माण होते. घरातील वातावरण पवित्र बनते आणि सुख-समृद्धी वाढते. श्रीरामरक्षा स्तोत्र हे केवळ स्तुतिपर नसून ते एक आध्यात्मिक कवच आहे. आजच्या युद्धजन्य आणि तणावपूर्ण परिस्थितीमुळे मनात भय निर्माण होते. भविष्याची चिंता निर्माण होते. अशावेळी मन स्थिर ठेवून येणाऱ्या परिस्थितीला शांततेने सामोरे जाऊन आनंदी राहण्यासाठी दररोज श्रीरामरक्षा स्तोत्र पठन करायला हवे.

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

### 'श्रद्धा ठरू नये कमजोरी' सर्वांसाठी उद्बोधक

२५ मार्चच्या अंकातील ''श्रद्धा ठरू नये कमजोरी'' हा अग्रलेख समाजातील सर्व स्तरातील व्यक्ती व व्यक्ती विशेषांसाठी उद्बोधक आहे. महाराष्ट्रासारख्या प्रगतिशील, पुरोगामी व अनेक संत प्रवृत्तींचे मार्गदर्शन लाभलेल्या प्रदेशात; मागील दशकात उघडकीस आलेल्या भोंदूंची संख्या मन हादरवून टाकणारी आहे. अंनिससारख्या अंधश्रद्धा निर्मूलनासाठी काम करणाऱ्या व्यक्ती व संस्था अनेक आहेत पण प्रत्यक्षात अंधश्रद्धा विचारात न घेता लोकांच्या श्रद्धांना हीन प्रकारच्या टीकेचे विषय बनविण्यामुळे अशा व्यक्ती व संस्था अपयशी ठरल्या आहेत. अंधश्रद्धेच्या नावाखाली हिंदू देवदेवता, परंपरांवर टीका करण्याचे बंद करून त्यांनी समाजातील भोंदू शोधून काढणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना संतांच्या शिकवणीने त्यांची मने तर्क प्रवृत्त, विवेकशील, संयमी व अंधानुकरण विरुद्ध बनविणे आवश्यक आहे.

**ॲड. प्रकाश देशपांडे**/पुणे. ७०५८९७५३७६

# श्रीराम नवमीच्या पूर्वसंध्येला श्रीराम जनकल्याण यज्ञ भक्तीभावात

## श्रीराम जन्मोत्सव समिती व अखिल भारत हिंदू बहुभाषिक पुरोहित संघमतर्फे आयोजन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५ मार्च-**

भारत हिंदूराष्ट्र म्हणून घोषित व्हावे याकरिता श्रीराम जन्मोत्सव समिती आणि अखिल भारत हिंदू बहुभाषिक पुरोहित संघमतर्फे बुधवारी डॉ. हेडगेवार पटांगण येथे १५१ कुंडीय श्रीराम जनकल्याण यज्ञ भक्तीभावात झाला.

प्रारंभी प्रभू श्रीराम, सीतामाता आणि श्री लक्ष्मण यांच्या मूर्तींची स्थापना आणि पूजन वेणुगोपाल जिल्हा पंतलु यांच्या पौरोहीत्याखाली करण्यात आली. यानंतर १५१ कुंडीय सामूहिक श्रीराम जनकल्याण यज्ञास प्रारंभ झाला. शेकडो भाविकांच्या उपस्थितीत हा होमहवन विधी झाला. होम हवन विधीनंतर श्रीराम सीतामाता आणि श्री लक्ष्मण यांच्या मूर्तींची पारंपारिक वाद्यांसह परिसरातून मिरवणूक काढण्यात आली. यावेळी मूर्तींचे दर्शन घेण्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा भाविकांनी मोठी गर्दी केली होती. मूर्तींची मिरवणूक पुन्हा डॉ. हेडगेवार पटांगण येथे आल्यानंतर भाविकांना प्रसादाचे वाटप करण्यात आले.यावेळी महापौर विनायक कोंड्याल, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा संघचालक सी. ए. सुनील इंगळे, निलेश भंडारी, शिवानंद कल्लूरकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक शिवाजी राऊत, समितीचे संस्थापक अध्यक्ष संजय साळुंखे, वेणूगोपाल जिल्हा पंतलु, संजय होमकर, अक्षय अंजीखाने, अमर बिराजदार, सागर अतनुरे, यतिराज होनमाने, उत्सव अध्यक्ष रामचंद्र कबाडे, कार्याध्यक्ष महेश जेऊर, उपाध्यक्ष लक्ष्मण सरवदे, सतीश पारेली, नागेश मंजेली, अमर गट्टी, सचिव आनंद शर्मा, मोहन जंगम, पिनू करपे, कल्याण करजगी, पूजा विधिप्रमुख श्रीनिवास जिल्हा पंतलु, सहसचिव चारुदत्त हुलजंतीवाले, प्रसाद भास्कर, विश्वनाथ बदलापुरे, होम हवन प्रमुख शिवराज दासी, धार्मिक विधी प्रमुख प्रविण मुसपेठ, कालिदास काळपगार, महादेव तुम्मा आदी उपस्थित होते.

### श्री सिताराम कल्याणोत्सव आणि हिंदू शौर्य पुरस्काराचे आज वितरण

श्रीराम नवमी निमित्त श्रीराम जन्मोत्सव समिती व अखिल भारतीय हिंदू बहुभाषिक पुरोहित संघमतर्फे गुरुवारी सायंकाळी ५.३० वाजता डॉ. हेडगेवार पटांगण येथे श्री सीताराम कल्याणोत्सव होणार असून यानंतर गोरक्षक मिलिंद एकबोटे आणि साध्वी सारिकाजी परमानंद यांना हिंदू शौर्य पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. या कार्यक्रमास हिंदू बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन श्रीराम जन्मोत्सव समिती व अखिल भारतीय हिंदू बहुभाषिक पुरोहित संघमतर्फे करण्यात आले आहे.



## डिजिटल अरेस्ट गुन्ह्यातील एकास अटक; २१ लाखांची फसवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५ मार्च-**

शहर सायबर पोलिस स्टेशनकडुन डिजिटल अरेस्ट मधील गुन्हयात सहभागी असणाऱ्या एका गुन्हेगारास अटक केली आहे.

याबाबतची हकीकत अशी, शहर सायबर पोलीस स्टेशन येथील तक्रारदार यांना २८ जुलै २०२५ रोजी सांयकाळी चार वाजण्याच्या सुमारास घरी असताना फसवणुकदाराने अनोळखी मोबाईलवरुन तक्रारदार यांना संपर्क साधुन मी टेलीकॉम डिपार्टमेंट मधून टेलिकॉम ऑफिसर बोलत आहे असे सांगितले. तुमचा मोबाईल क्रमांकाचा मिसयुज झालेला असुन, तुमच्या विरोधात कुलाबा पोलीस स्टेशन मुबई येथे गुन्हा दाखल झाला आहे. या गुन्हयाचा तपास कुलाबा पोलीस स्टेशन मुंबई येथील पोलीस सब इन्स्पेक्टर विजय खन्ना हे करीत आहेत असे सांगितले. पुन्हा तक्रारदार यांना अनोळखी मो. क्र. +९१७२०७८८५९८ यावरून चॉटसअप कॉल करुन मी विजय खन्ना सब इन्स्पेक्टर कुलाबा पोलीस स्टेशन मुंबई येथुन बोलत आहे असे सांगुन, तक्रारदार यांचे कौटुंबिक माहिती घेवून कुलाबा पोलीस स्टेशन येथे एक मनी लॉंडरींगचा गुन्हा दाखल असून त्याचा तपास सीबीआय ऑफिसर प्रविण सुद हे करीत आहेत असे सांगितले व फोन ठेवला. पुन्हा दुसऱ्या अनोळखी वॉटसअॅप क्र. +९१९१४६९७९२८९ यावरून कॉल करुन, एक डुप्लीकेट आधारकार्डची फोटो कॉपी व तक्रारदार यांचे नावे असलेले कॅनरा बँकेचे एटीएम कार्डची फोटो कॉपी पाठवून, तुमचे हे आधारकार्ड व एटीएमकार्ड कुलाबा पोलीस स्टेशन येथे दाखल असलेल्या मनी लौंडरींग गुन्हयातील आरोपी नरेश गोयल याचे घरामध्ये सापडले आहे. नरेश गोयल यास अटक केली असून तपासामध्ये आपल्या नाव असलेल्या कॅनरा बँक खात्यामध्ये मोठ्या प्रमाणात संशयास्पद आर्थिक उलाढाल झाली असून या प्रकरणामध्ये आपला ही सहभाग असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे असे सांगितले व तक्रारदार यांचे नावाने अरेस्ट वॉरंट, सुप्रिम कोर्टाची नोटीस सर्व्हेलन्सचे ३ पानी इंग्रजी मध्ये नियम असलेली नोटीस व्हॉटसअॅपवर पाठवून भिती घालुन तक्रारदार यांना २१ लाख २५ हजार १६१/- रु इतकी रक्कम वेगवेगळ्या खात्यात विभागणी करुन पाठविण्यास सांगुन त्यांची ऑनलाईन आर्थिक फसवणुक केल्याने ४ डिसेंबर २०२४ रोजी गुन्हा दाखल झाला. सायबर एक्सपर्ट टिमने दिल्ली येथुन आरोपी राघवेंद्र सिंग, पिता मुलचंद (वय ३८ वर्षे रा. प्लॉट नं. ३३६, ग्राऊंड फ्लोअर गल्ली नं.२, हायटेंशन रोड, कपासहेडा दक्षिण-पश्चिम नवी दिल्ली) यास दि. १७ मार्च रोजी अटक केली. या गुन्हयात वापरलेला मोबाईल व फसवणुक रकमेपैकी ९ लाख ५० हजार रु रोख रक्कम हस्तगत करण्यात आली.

## महत्वाचे...



### उजनी धरणग्रस्तांच्या जमिनी अधिग्रहण करण्यास शेतकऱ्यांचा विरोध : प्रा. पाटील

**टेंभुर्णी, दि. २५ मार्च-**

धरणग्रस्तांच्या जमिनी सरकार उजनी पर्यटनासाठी आदी ग्रहण करणार असेल तर, सर्व धरणग्रस्त शेतकरी विरोध करणार असल्याचे रयत क्रांती पक्षाचे प्रदेशाध्यक्ष प्रा. सुहास पाटील यांनी सांगितले. माढा तालुक्यातील सुरली येथे धरणग्रस्त बचाव संघर्ष समितीच्या वतीने शेतकऱ्यांचा मेळावा आयोजित केलेला होता. त्यावेळी ते बोलत होते. प्रा. पाटील म्हणाले, उजनी धरण पूर्ण क्षमतेने १०० टक्के भरल्यानंतर शिल्लक जमिनी पूर्वजांपासून आजच्या पिढीपर्यंत शेतकरी कसत आहेत. परंतु त्या जमिनीवर उजनी धरण संपादित अशा महसूल नोंदी आहेत. या जमिनी धरणग्रस्तांना परत मिळाव्यात यासाठी सातत्याने शेतकरी शासनाकडे पाठपुरावा करीत आहेत. असे असताना उजनी पर्यटनासाठी सरकार संपादित जमिनी शेतकऱ्यांकडून अधिग्रहण करण्याच्या विचारात आहे. यावेळी उजनी धरण बचाव संघर्ष समितीचे अध्यक्ष निलेश देवकर, माढा तालुका धरणग्रस्त संघटनेचे तालुकाध्यक्ष सुरेश पाटील, बाळासाहेब ढेकणे, नीलकंठ शिंदे, संपत काळे, प्रताप काळे, रामकृष्ण काळे आदींनी मनोगत व्यक्त केले. माजी सरपंच रामकृष्ण काळे यांनी सुरली येथील उजनी धरणग्रस्त शेतकऱ्यांची नावांची यादी वाचून दाखवत, त्या शेतकऱ्यांच्या पाठीमागे आम्ही सर्व ग्रामस्थ उभा राहणार असल्याचे सांगितले. यावेळी गणेश मुळे, सागर भोपे, भद्रसेन पाटील, संपत काळे, शांतीलाल मुळे, कुबेर कदम, हरिदास कदम, रवींद्र जाधव, अशोक जाधव, विठ्ठल जाधव, आप्पा कदम, केशव सरडे उपस्थित होते.

### मुलांच्या सोशल मीडिया वापरावरील नियंत्रणाच्या नियमांची अंमलबजावणी करा : आ. आवताडे

**पंढरपूर, दि.२५ मार्च-**

महाराष्ट्र विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशना दरम्यान मुलांच्या सोशल मीडिया अतीवापराचा गंभीर मुद्दा आमदार समाधान आवताडे यांनी सभागृहात उपस्थित करत मंत्रीमहोदयांचे लक्ष वेधले. या दरम्यान



माहिती व तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार यांच्या नेतृत्वात नुकत्याच स्थापन करण्यात आलेल्या विशेष टास्क फोर्सचे प्राथमिक निष्कर्ष काय आहेत आणि त्यांच्या शिफारसींची अंमलबजावणी चालू शैक्षणिक वर्षापासून करणार का, याबद्दल सभागृहात आमदार समाधानदादा आवताडे साहेब यांनी विचारणा केली. मुलांच्या दैनंदिन मोबाईल गेमिंग वेळेवर वेळ मर्यादेचे नियंत्रण तसेच, गेमिंग कंपन्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी राज्य शासन केंद्र सरकारकडे काय पाठपुरावा करत आहे, याबद्दलही विचारणा केली. यासोबतच, राज्यातील शाळांमध्ये 'स्क्रीन फ्री सॅटरडे' हा उपक्रम राबविण्यासाठी शासनाने कुठली स्वतंत्र नियमावली तयार केली आहे का, हा प्रश्न उपस्थित केला. या उपस्थित सर्व प्रश्नांवर माहिती व तंत्रज्ञान मंत्री श्री. आशिषजी शेलार यांनी सकारात्मक भूमिका घेत प्राथमिक निष्कर्षाचा अहवाल पुढील तीन महिन्यात येणे अपेक्षित असून या अहवालानुसार ठोस पावले उचलण्यात येतील, असे स्पष्ट केले. तसेच, 'स्क्रीन फ्री टाईम' या विषयी शिक्षण विभागाशी चर्चा या टास्क फोर्स मध्ये होईल, असेही यावेळी स्पष्ट करण्यात आले.

### नेहा चौधरीची धर्मदाय निरीक्षकपदी निवड



**जेऊर, दि.२५ मार्च-**

उमरड (ता.करमाळा) येथील नेहा मोहन चौधरी हिची धर्मदाय निरीक्षकपदी नियुक्ती झाली आहे. महाराष्ट्र राज्य धर्मादाय आयुक्त कार्यालयांतर्गत परीक्षा घेऊन ही निवड करण्यात आली आहे. नेहा चौधरी ही एका सामान्य शेतकऱ्याची मुलगी असून ती कृषी पदवीधर आहे. तिचे कृषी पदवीचे शिक्षण दापोलीच्या कोकण कृषी विद्यापीठात पूर्ण झाले आहे. तिचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळा तर महाविद्यालयीन शिक्षण भारत हांयस्कूल जेऊर येथे झाले आहे. तिच्या यशाबद्दल हभप चिंतामणी महाराज घोडके, रामेश्वर महाराज शिंदे, विठ्ठल महाराज पाटील, संजय महाराज बाबर आदींनी तिचे अभिनंदन केले.

### लोखंडी सळइने मारहाण

**सोलापूर :** घरासमोर असताना २२ मार्च रोजी आप्पासाहेब अशोक कोरे (वय ३९, रा. सद्गुरु समर्थ नगर शेळगी) यास लहान भाऊ याला बसवराज अशोक कोरे या आरोपीने दारूच्या नशेमध्ये शिवीगाळ करून विनाकारण लोखंडी सळईने आप्पासाहेब कोरे यांच्या डोक्यात मारून जखमी केले. तपास जोडभावी पेठ ठाण्याचे जगताप करत आहेत.


### नावात बदल

मी याद्वारे घोषित करतो की, माझे जुने नाव **गोविंदराव दडे** हे बदलून **गोविंद भिकाजी दडे** असे करण्यात आले आहे, राहणार, १४९, यामिनी नगर, विजापूर रोड, सोलापूर-४१३००८ (महाराष्ट्र राज्य)

**पी.एल. क्रमांक : ३९८**
**तारीख : ०४/०३/२०२६**


# सोलापूरसह शेजारच्या जिल्ह्यासाठी पुन्हा यलो अलर्ट

## अवकाळीमुळे अनेक भागात पिकांच्या होणार नुकसान

## हवामान खात्याने व्यक्त केला अंदाज

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ मार्च-**

सोलापूरसह राज्यातील इतर काही जिल्ह्यात अनेक ठिकाणी अवकाळी पाऊस आणि गारपिटीचे सावट आहे. हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार राज्यातील ७ ते १३ जिल्ह्यांत वादळी वाऱ्यासह पावसाचा 'यलो अलर्ट' दिला आहे. सोलापूर, धाराशिव, कोल्हापूरसह अनेक भागात पिकांचे नुकसान होण्याची भीतीही व्यक्त केली आहे. यामुळे शेतकऱ्यांनी काढून पडलेल्या पिकांच्या संरक्षणासाठी उपाययोजना कराव्यात.

हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार, गुरुवारी (२६ मार्च) राज्यातील १३ जिल्ह्यांत अवकाळी पाऊस बरसण्याची शक्यता आहे. यामध्ये सिंधुदुर्ग, कोल्हापूर घाट परिसर, कोल्हापूर, सातारा, सातारा घाट परिसर, सांगली, सोलापूर, परभणी, बीड, नांदेड, लातूर, धाराशिव, चंद्रपूर, गडचिरोली आणि यवतमाळ या जिल्ह्यांचा समावेश आहे. या जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह वादळे, मध्यम पाऊस आणि सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता आहे.

राज्यातील अनेक जिल्ह्यांत पुढील काही तास महत्त्वाचे असून वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता आहे. गारपिटीमुळे उभी पिके (गहू, आंबा, द्राक्ष) आणि फळबागांचे मोठे नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. ढगाळ वातावरण आणि सोसाट्याच्या वाऱ्यासह पावसाच्या सरी बरसण्याचा अंदाज आहे. यामुळे हवामान विभागाने पुढील ३ दिवस राज्याच्या विविध भागांत अवकाळी पावसाचा इशारा दिला आहे.

राज्यात कुठे तापमानाचा पारा वाढत आहे तर कुठे अवकाळी पाऊस बरसत आहे. राज्यावरील हे दुहेरी संकट आणखी तीन दिवस कायम राहणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. त्यामुळे नागरिकांची खासकरुन बळीराजाची चिंता आणखी वाढली आहे. राज्यावर असलेलं अवकाळी पावसाचं संकट अद्यापही कायम असल्याचं पहायला मिळत आहे.

राज्यातील वेगवेगळ्या भागात हवामानाचे वेगवेगळे रंग पहायला मिळत आहेत. कुठे उष्ण आणि दमट हवामान राहण्याची दाट शक्यता आहे. राज्यात पुढील तीन दिवस अवकाळी पावसाचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे.


## सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सोलापूर विभाग, सोलापूर

**जाहीर प्रसिध्दीकरण**

**(महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम २२-(२) नियम ७ व ७-अे वाचावे)**

**बदल अहवाल क्रमांक:-१४९०/२०२५**

ज्याअर्थी, एन.एम. वाडीया चॅरिटेबल हॉस्पीटल, सोलापूर न्यास नोंदणी क्रमांक ई-२७ (सोलापूर) या सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेच्या सादरकर्ता विश्वस्त श्री. शिरीष रामचंद्र गोडबोले, रा. ५६०/४३, दक्षिण सदर बझार, सोलापूर यांनी न्यासाचे विश्वस्त चेरमन श्री. पी.डी. करंदीकर यांनी राजीनामा दिलेबाबत व सदर रिक्त जागी श्री. प्रविणसिंह प्रतापसिंह परदेशी यांची नियुक्ती केलेबाबत बदल अर्ज क्रमांक १४९०/२०२५ दाखल केला असून महाराष्ट्र विश्वस्त व्यवस्था कलम २२(२) अन्वये सदर बदल अर्जास किरकोळ अर्ज क्रमांक १४९१/२०२५ हा अर्ज तात्पुरत्या स्वरुपात (Provisionally) स्विकृती मिळणेबाबत सादर केलेला आहे व तो मा. धर्मादाय उप आयुक्त, सोलापूर विभाग, सोलापूर, यांचे दिनांक १७/११/२०२५ रोजीच्या आदेशान्वये तात्पुरत्या स्वरुपात (Provisionally) मंजूर केलेला आहे. त्याअर्थी, हितसंबंध असलेल्या सर्व संबंधीत लोकांना सदर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, सदर बदल अहवालास काही आक्षेप हरकत घ्यावयाची असल्यास, आपण आपली हरकत सदर जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत मा. धर्मादाय उपआयुक्त, सोलापूर विभाग, सोलापूर यांचेसमोर दाखल करावी, अन्यथा, सदर बदल अहवालास कोणाचीही काहीही हरकत नाही, असे समजुन सदर कि.अ.क्र. १४९१/२०२५ मध्ये दिनांक १७/११/२०२५ रोजी तात्पुरत्या स्वरुपात (Provisionally) स्विकारण्यात आलेला आदेश हा अंतिम आदेश म्हणून कायम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २५ माहे मार्च सन २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व मा.धर्मादाय उपआयुक्त यांच्या शिक्यानिशी दिली.

शिक्का

**सही/-**
**अधिक्षक (न्याय)**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सोलापूर विभाग, सोलापूर**



## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

सोलापूर शहर व तालुका येथील तमाम जनतेस विशेषतः शहर सोलापूर व उत्तर सोलापूर जि. सोलापूर येथील जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन : डिस्ट्रीक्ट व सब डिस्ट्रीक्ट सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दीतील मौजे कसबे सोलापूर येथील जुना स.नं. ११६/२ व ११७/१क नवीन स.नं. ११४/२ व ११५/१क पैकी सदवदे नगरमधील जागा यांसी प्लॉट नं. १८२ पैकी याची हद्द पूर्व-पश्चिम २५ फुट दक्षिण उत्तर ४० फुट असून त्याचे एकुण क्षेत्र ९२.९३ चौ.मी किंवा १००० चौ. फुट इतके आहे. यामध्ये १० X १० ची एक कच्चे विट मातीमध्ये बांधकाम केलेली एक खोली असून त्यावर पन्हाळी पत्रे आहेत. यांसी चतुःसिमा खालीलप्रमाण :- यासी चतुःसिमा - पुर्वेस - रस्ता, पश्चिमेस - प्लॉट नं.६, दक्षिणेस - प्लॉट नं. १८३, उत्तरेस :-प्लॉट नं १८१

सदर वर नमूद प्लॉट जागा १. पार्वती शंकर सरवदे २. श्री बाबासाहेब शंकर सरवदे यांचे तर्फे कुलमुखत्यारधारक श्री. बुधाराम गीगारामजी पटेल यांच्या मालकी कब्जे वाहिवाटीचे आहे. तरी प्लॉटजागेचे कुलमुखत्यारधारक यांनी आमचे अशिल यांना सदर प्लॉट जागा विक्री करण्याचे ठरवून व्यवहार केलेला आहे. तरी त्या अनुषंगाने वर नमूद प्लॉट जागा ही निर्वेध निजोखमी असल्याबाबतची हमी सदरहू कुलमुखत्यारधारकने आमचे अशिलास दिलेली आहे. तरी वर नमूद मिळकतीबाबत इतर कोणाचीही, कसल्याही प्रकारचे हक्क, हितबंध गहाण, दान, लिज, लीन, टाच, पोटगी व इतर कायदेशीर हक्क असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील नमूद पत्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी आपली हरकत नोंदवावी, मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल वर नमूद प्लॉटजागा ही निर्वेध व निजोखमी आहे, असे समजून खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, त्यानंतर कोणाचीही, कसलीही प्रकारची तक्रार अथवा हरकत चालणार नाही, कोणाची फसवणूक, गैरसोय, नुकसान होऊ नये म्हणून ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस प्रसिध्द केली असे दिनांक २५/०३/२०२६.

**सही/-**
**ॲड. सहदेव रघुनाथ भडकुंबे**
**बी.कॉम., एलएल.बी., ॲडव्होकेट**
**रा. ५६, रविवार पेठ, गुजर वस्ती, सोलापूर - ४१३००२**
**मो. ९०२८९६६३१७**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**



## मध्य रेल्वे

**रुग्णालये व निदान केंद्रांची नोंदणी**

**सोलापूर मंडळ**

सोलापूर विभागाच्या रेल्वे रुग्णालयाशी संलग्न होण्यासाठी (Empanelment) खाजगी रुग्णालये आणि निदान केंद्रांकडून 'इच्छेची अभिव्यक्ती' (Expression of Interest) अर्ज आमंत्रित. सोलापूर विभाग/मध्य रेल्वेचा वैद्यकीय विभाग, खाजगी रुग्णालये आणि निदान केंद्रांना रेल्वेच्या लाभार्थींना-ज्यामध्ये 'UMID' कार्डधारक (म्हणजेच निवृत्त कर्मचारी आणि त्यांचे अवलंबून असलेले कुटुंबीय) यांचा समावेश आहे-वैद्यकीय सल्ला सेवा आणि निदान सुविधांसह उपचार सुविधा पुरवण्यासाठी, आपल्या सूचीमध्ये (Empanelment) समाविष्ट करण्याकरिता 'इच्छेची अभिव्यक्ती' (Expression of Interest) आमंत्रित करत आहे. हे अर्ज मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाच्या कार्यक्षेत्रात (ज्युरीस्डिक्शन) स्थित असलेल्या खाजगी रुग्णालये आणि निदान केंद्रांकडून मागवण्यात येत आहेत. या कार्यक्षेत्रात महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्यांमधील खालील जिल्ह्यांचा समावेश होतो; तसेच संबंधित शहराच्या श्रेणीनुसार लागू होणाऱ्या 'CGHS' दरांवर (Rates) या सेवा पुरवणे अपेक्षित आहे. 1) महाराष्ट्रातील जिल्हे: I. सोलापूर, II. धाराशिव (जुने नाव: उस्मानाबाद), III. लातूर, खत. पुणे, त. सांगली. 2) कर्नाटकातील जिल्हे: 1. कलबुरगी (Kalaburagi). 1. अर्ज '4' आकाराच्या कागदावर, विहित नमुन्यात (prescribed format) भरलेले असावेत आणि त्यासोबत सर्व आवश्यक कागदपत्रे/जोडपत्रे पूर्णपणे जोडलेली असावीत. 2. अर्जातील सर्व रकाने (columns) योग्यरित्या आणि पूर्णपणे भरलेले असणे अनिवार्य आहे. ३. अपूर्ण किंवा चुकीची माहिती असलेले अर्ज कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय (summarily) नाकारले जाण्यास पात्र असतील. 4. सर्व आवश्यक प्रमाणपत्रे योग्यरित्या साक्षांकित (attested) करून अर्जासोबत जोडलेली असावीत. 5. सर्व आवश्यक कागदपत्रे आणि जोडपत्रे योग्यरित्या भरून, 'इच्छेची अभिव्यक्ती' (Expression of Interest) अर्ज खालील ई-मेल पत्त्यावर पाठवावेत: empanelment.drh.sur@gmail.com. 6. अर्ज सादर करण्याचा कालावधी 1 एप्रिल 2026 ते 30 जून 2026 या दरम्यान असेल. ७. या 'Empanelment' प्रक्रियेशी संबंधित इतर नियम व अटी, तसेच अर्जाचा नमुना (format), हे 'विभागीय रेल्वे रुग्णालय, सोलापूर' येथील 'मुख्य वैद्यकीय अधीक्षक' (Chief Medical Superintendent) यांच्या कार्यालयातून, 1 एप्रिल 2026 ते 30 जून 2026 या कालावधीत, कोणत्याही कामाच्या दिवशी सकाळी 11.00 ते दुपारी 1.00 (13.00) या वेळेत प्राप्त करता येतील. 8. वर नमूद केलेल्या जिल्ह्यांमध्ये स्थित असलेली रुग्णालये/केंद्रे/आरोग्य सेवा संस्था, अर्जाचा नमुना (format) खाली नमूद केलेल्या मध्य रेल्वेच्या संकेतस्थळावरून (Website) डाउनलोड करू शकतात. 9. मध्य रेल्वेचे संकेतस्थळ: http://cr.indianrailways.gov.in. (येथे जा: bout Us → Divisions → Solapur → Medical → Sr.No.) लिंक: : https://cr.indianrailways.gov.in/view_section.jsp?ang=0&id=0,6,1191,1197.1346+

**रेल्वे मार्गाजवळ असुरक्षित आणि अनधिकृत काम करणे हा दंडनीय गुन्हा आहे.** 05



## बँक ऑफ महाराष्ट्र/ Bank of Maharashtra

प्रधान कार्यालय/ Head Office
लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5 / Lokmangal, 150,.Shivajinagar, Pune-5

**आंचलिक कार्यालय, सोलापुर / Zonal office, Solapur**

आंचलिक कार्यालय, अगरवाल पैलेस, पहिला मजला, डी मार्ट – भारती विद्यापीठ रोड़, जुले सोलापूर, सोलापुर - 413004
फोन /Phone - (0217) 2733870 / 71 ई-मेल /E-mail: legal_sol@mahabank.co.in

**नियम - ८ (१)**
**ताबा सूचना**

ज्याअर्थी, मी, सही करणारा, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अन्वये बँक ऑफ महाराष्ट्रचा प्राधिकृत अधिकारी असून, सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल, 2002 च्या नियम 3 सह वाचन केलेल्या कलम 13 च्या उप-कलम (12) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, खाली नमूद केलेल्या कर्जदारांना आणि जामीनदारांना सदर नोटीस मिळाल्याच्या तारखेपासून 60 दिवसांच्या आत संपूर्ण देय रक्कम परतफेड करण्यासाठी मागणी नोटीस 13/01/2026 जारी केली.

कर्जदाराने कर्जाची रक्कम परत करण्यात कसूर केल्यामुळे, याद्वारे कर्जदार, जामीनदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचित करण्यात येते की, अधोस्वाक्षरीकर्त्याने, संबंधित अधिनियमाच्या कलम 13 चे उपकलम (4) अन्वये (आणि 'सुरक्षा हित अंमलबजावणी नियम, 2002' च्या नियम 8 सह वाचन करून) स्वतःला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, दिनांक 18.03.2026 रोजी खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा 'प्रतिकात्मक ताबा' घेतला आहे.

विशेषतः कर्जदाराला आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे सावध करण्यात येते की, त्यांनी या मालमत्तेबाबत कोणताही व्यवहार करू नये; तसेच या मालमत्तेबाबत केलेला कोणताही व्यवहार, वर नमूद केलेल्या रकमेसाठी 'बँक ऑफ महाराष्ट्र'च्या हक्काच्या (Charge) अधीन असेल.

सुरक्षित मालमत्ता परत मिळवून घेण्यासाठी (Redeem) उपलब्ध असलेल्या कालावधीच्या संदर्भात, कर्जदाराचे लक्ष अधिनियमाच्या कलम 13 च्या उपकलम (8) मधील तरतुदींकडे वेधण्यात येत आहे..

| अ. क्र. | शाखा, कर्जदार आणि जामीनदार यांचे नाव | गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा तपशील | डिमांड नोटिसची तारीख आणि एकूण थकबाकी |
|---|---|---|---|
| 1 | **शाखा - वळसंग**<br>**कर्जदार :**<br>**1. मे. पद्मावती एंटरप्राइजेस**<br>**मालक: श्रीमती पद्मा विष्णू शेराल**<br>व्यवसायाचा पत्ता : मु.पो. प्लॉट क्र. 23-B, पद्माशाली नगर, उत्तर सोलापूर, जि. सोलापूर - 413005. निवासाचा पत्ता: मु.पो. स.नं. 716, अनिकेत रेसिडेन्सी, इमारत क्र. 1, अक्कलकोट रोड, उत्तर सोलापूर, जि. सोलापूर - 413005.<br>**2. श्री राजशेखर रामदास कदम**<br>पत्ता : पोस्ट A-155/2/A/1, गांधीनगर, अक्कलकोट रोड, सोलापूर, जि. सोलापूर-413005 | **सुरक्षा**<br>**प्राथमिक सुरक्षा :-**<br>सी.टी.एस. क्रमांक 9698, अंतिम भूखंड क्रमांक 14/31, टी.पी. क्रमांक 1, एकूण क्षेत्रफळ 207.70 चौ.मी असलेली, रविवार पेठ, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर येथे स्थित असलेली, बिगर-शेती निवासी वापराची संपूर्ण मालमत्ता; जी कर्जदार श्रीमती पद्मा विष्णू शेराल आणि जामीनदार श्री. राजशेखर रामदास कोडम यांनी गहाण ठेवली आहे.<br>**चतुःसीमा खालीलप्रमाणे :-**<br>पूर्व :- अंतिम भूखंड क्रमांक 14/30<br>पश्चिम :- अंतिम भूखंड क्रमांक 14/34<br>दक्षिण :- रस्ता<br>उत्तर :- अंतिम भूखंड क्रमांक 14/32 आणि 14/33<br>**तारण सुरक्षा :-** 'पद्मावती एंटरप्राइजेस' या दुकानामध्ये (पत्ता: भूखंड क्रमांक 23-B, पद्मशाली नगर, उत्तर सोलापूर, जि. सोलापूर-413005) स्थित असलेला मालसाठा आणि येणेबाकी यांचे तारण<br>CERSAI ID :- 200067562866<br>CERSAI ID :- 200067562863 | **खातेवहीतील शिल्लक:**<br>रु. 12,76,146.42/-<br>+ जमा न झालेले व्याज:<br>रु. 50,927.00/-<br>**एकूण:** रु.<br>13,27,073.42/-<br>(तेरा लाख सत्तावीस हजार त्र्याहत्तर रुपये आणि बेचाळीस पैसे फक्त) |

**ठिकाण - सोलापूर**
**दिनांक - 18/03/2025**

**सही/-**
**मुख्य व्यवस्थापक आणि प्राधिकृत अधिकारी, सोलापूर झोन.**



## जाहीर समन्स/नोटीस

पुढील नेमली तारीख १५/४/२०२६
आर.टी.एस. अपिल नं. ३८०/२०२५

### सोलापूर येथील मे. उपविभागीय अधिकारी क्र.१ यांचे न्यायालयात

**दि बारामती सह. बँक** - **अनेलंट**
विरुध्द
**रंगा भिमा मोरे, वगैरे** - **रेस्पॉंडट**

प्रति,

**महंमद इम्रान जहांगीर काझी**
रा. वायकुळे प्लॉट, डोंगळे शेजारी, पद्मकृष्ण मंगल कार्यालयाच्या पाठीमागे बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

**रिजवान जहांगीर काझी**
रा. वायकुळे प्लॉट, डोंगळे शेजारी, पद्मकृष्ण मंगल कार्यालयाच्या पाठीमागे बाशी, ता. बार्शी, जि. सोलापूर

**विलास भागवत शेंडगे, प्रोप्रा. विठ्ठल एंटरप्रायजेस, बार्शी**
रा. चोरमले प्लॉट, बालाजी झाडगे शेजारी, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

ज्याअर्थी अपेलंटने तुमचे विरुध्द या फेरफार नोंद नं. ६८८७१ व ७३२५६ या नोंदीविरुध्द अपिल आणलेले आहे. सदर अपिलात तुम्ही रेस्पोंडंट/प्रतिवादी अनुक्रमे ८, ९ व १० म्हणून सामील आहात. तुम्हास अपिलात नमूद पत्त्यावर समन्स/नोटीस काढली परंतु तुम्ही सदर ठिकाणी राहत नसलेचा रिपोर्ट/ पोस्ट पाकीट परत आलेले आहे. तसेच तुम्ही कोठे गेला आहेत हे माहिती नाही, कोणी माहिती सांगत नाहीत तुमचा निश्चित असा ठावठिकाणा आढळून येत नाही, सदर अपिलाकामी तुम्ही प्रतिवादी/रिस्पॉंडंट म्हणून सामील आहात.

त्याअर्थी तुम्हास सदर जाहीर समन्सद्वारे कळविण्यात येते की, आपण सदर अपिलाकामी जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत वा पुढील नेमली तारीख १५/०४/२०२६ रोजी स्वतः अगर माहितगार ॲडव्होकेट मार्फत हजर होऊन आपले म्हणणे, कैफियत लेखी स्वरुपात मा. न्यायालयात दयावी. मुदतीत आपण हजर होवून आपली कैफियत म्हणणे दिले नाहीतर आपणास सदर नोटीसची बजावणी होवूनही आपणास कांहीही सांगावयाचे नाही असे समजून मा. न्यायालयाचे सदरकामी यथायोग्य हुकूम होतील याची नोंद घ्यावी.

सदरचे जाहीर समन्स आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्द केले असे ता.२५/०३/२०२६

शिक्का

**सही/-**
**उपविभागीय अधिकारी**
**सोलापूर क्र.१ सोलापूर**



महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

## सूचना

सुशिक्षित बेरोजगार अभियंता (स्था) यांना लॉटरी पद्धतीने कामे वाटपाची योजना महापारेषण कंपनीचे परिपत्रक MSETCL/CO/TRO&M/SE-II/EE-VIII/12883 Dt. 05.12.2016 अन्वये लागू केली आहे. सदर परिपत्रकाला अनुसरून अधीक्षक अभियंता (स्था), अउदा स्था.बां.नि.सु. मंडळ, पुणे या कार्यालयाने सुशिक्षित बेरोजगार अभियंता (स्था) यांची नोंदणी व नूतनीकरण करणे सुरु आहे.

सदरील ई–प्रकटन दिनांक १९.०२.२०२६ पासून दिनांक २७.०२.२०२६ (पहिली मुदत) पर्यंत आणि मुदतवाढ दि.०६.०३.२०२६ (दुसरी मुदत) पर्यंत कंपनीच्या संकेतस्थळावर तसेच स्थापत्य कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिद्धीसाठी देण्यात आले होते. तर योजनेमध्ये भाग घेऊ इच्छितांचा विचार करून पुनश्चः ही मुदतवाढ **दि.०७.०४.२०२६** (तिसरी मुदत) पर्यंत वाढवण्यात आली आहे. या योजनेमध्ये भाग घेऊ इच्छिणाऱ्या सुशिक्षित बेरोजगार अभियंता (स्था) यांनी नमूद केलेल्या कागदपत्रांसोबत नोंदणी मागणीचा अर्ज अंतिम **दि.०७.०४.२०२६** पर्यंत अथवा त्यापूर्वी या कार्यालयात प्रत्यक्ष जमा करावा. सदर ई–प्रकटन कंपनीच्या संकेतस्थळावर तसेच स्थापत्य कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिद्धीसाठी उपलब्ध असेल याची नोंद घ्यावी.

**सूचना :–**

१. सदर देण्यात आलेली मुदत वाढ ही (तिसरी मुदत) व अंतिम असेल.
२. नोंदणीकृत सुशिक्षित अभियंता (स्था) यांना या कार्यालयामार्फत देण्यात आलेले प्रमाणपत्र अथवा पासबुक गहाळ झाले असल्यास त्याची रीतसर पोलीस तक्रार करून त्याची पोहोच प्रत या कार्यालयास आपल्या अर्जासोबत सादर करावी.
३. सुशिक्षित अभियंता (स्था) यांना उपरोक्त दिलेली मुदत वाढ ही तिसरी व अंतिम असल्यामुळे नोंदणीसाठीचा अर्ज हा प्रत्यक्ष कार्यालयामध्ये येवून सादर करावा. ई–मेल, पोस्टाने व कुरिअर द्वारे आलेले अर्ज विचारात घेण्यात येणार नाही. कृपया याची नोंद घ्यावी.

For further details visit our website **http://mahatransco.in**

**सही/–**
**अधीक्षक अभियंता (स्था), (प्र)**
**अउदा स्था.बां.नि.सु. मंडळ, पुणे**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्त्वाचे

### सौरव गांगुली दिग्गज जॅक्सन ग्रुपचा सदिच्छादूत



**नोएडा** : ऊर्जा आणि पायाभूत सुविधा क्षेत्रातील दिग्गज जॅक्सन ग्रुपने भारताचे माजी क्रिकेट कर्णधार सौरव गांगुली यांना आपला पहिला ब्रॅण्ड ॲम्बेसेडर म्हणून करारबद्ध केले आहे. या भागीदारीचा एक भाग म्हणून, गांगुली शाश्वत ऊर्जा परिसंस्थेसाठी जॅक्सन ग्रुपच्या प्रमुख ब्रॅण्ड मोहिमा व धोरणात्मक उपक्रमांमध्ये त्यांचे प्रतिनिधित्व करतील. वितरित ऊर्जा, सौर ऊर्जा, ग्रीन मॉलिक्युल्स आणि पायाभूत सुविधा - वीज, मेट्रो, नागरी आणि पाणी - या संपूर्ण मूल्य साखळीमधील जॅक्सनची दूरदृष्टी समयोचित आणि प्रभावी आहे. भारताच्या ऊर्जा संक्रमणात आणि हरित भविष्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या ब्रॅण्डशी जोडले जाण्यास मी उत्सुक आहे, असे गांगुली या भागीदारीबद्दल म्हणाले. ही भागीदारी आमचा ब्रॅण्ड अधिक मजबूत करेल, असे जॅक्सन ग्रुपचे अध्यक्ष समीर गुप्ता म्हणाले.

# पंतने तिसऱ्या क्रमांकावर खेळावे

### फाफ डु प्लसिसचा सल्ला

**नवी दिल्ली, २५ मार्च**



लखनौ सुपर जायण्ट्सचा (एलएसजी) कर्णधार ऋषभ पंत हा सर्वोत्तम खेळाडू असून त्याच्यासाठी फलंदाजीमध्ये तिसरा क्रमांक अत्यंत योग्य वाटतो व त्याने तिसऱ्या क्रमांकावर खेळावे, असा माजी दक्षिण आफ्रिका कर्णधार फाफ डु प्लेसिसने आयपीएल २०२६ पूर्वी लखनौ सुपर जायण्ट्सचा कर्णधार ऋषभ पंतला महत्त्वाचा सल्ला दिला आहे.

या आयपीएल हंगामात आपली क्षमता पूर्णपणे सिद्ध करण्यासाठी पंतने तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करेल व निकोलस पूरन चौथ्या क्रमांकावर फलंदाजीला येईल असे वाटते, असे तो म्हणाला.

अधिक सातत्य राखण्यासाठी पंतला त्याच्या टी-२० क्रिकेटच्या रणनीतीमध्ये अधिक स्पष्टता आणणे गरजेचे आहे, विशेषतः त्याच्या डावाच्या सुरुवातीच्या टप्प्यात काळजी घेणे आवश्यक आहे, असेही तो म्हणाला.

पंतने तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी केल्यास त्याचा प्रभाव वाढेल. गत हंगामात त्याला विविध क्रमांकावर खेळूनही सातत्य सापडले नव्हते. मात्र, तिसऱ्या क्रमांकावर खेळताना त्याने शानदार शतक झळकावले होते.

पंतची फटकेबाजी पाहता ती बऱ्याचदा विस्कळीत किंवा अनिश्चित वाटते. त्याच्या डोक्यात नक्कीच एखादी विशिष्ट पद्धत किंवा खेळाची योजना सुरू असते. कसोटी क्रिकेटमध्ये त्याला कशा प्रकारे खेळायचे आहे, याची एक निश्चित रणनीती त्याच्याकडे आहे. टी-२० क्रिकेटमध्येही तीच गोष्ट लागू होते. स्वतःला यशाची सर्वोत्तम संधी मिळवून देण्यासाठी, त्याची खेळाची योजना नक्की कशा प्रकारची असावी, हे त्याने स्पष्टपणे समजून घेणे गरजेचे आहे, असेही डु प्लेसिस म्हणाला.

या हंगामात पंतने जोखीम कमी घेत संयमाने खेळल्यास तो संघासाठी अधिक उपयुक्त ठरेल. लखनौची फलंदाजी फळीही मजबूत असून आगामी हंगामात संघाकडून मोठ्या अपेक्षा व्यक्त केल्या जात आहेत. फलंदाज आणि कर्णधार अशा दोन्ही भूमिकांमध्ये पंतकडून खूप मोठ्या अपेक्षा केल्या जातात. त्याच्या आक्रमक फटकेबाजीमुळे तो जागतिक क्रिकेटमधील सर्वात रोमांचक खेळाडूंपैकी एक बनला असला, तरी टी-२० सामन्यांमधील त्याच्या सातत्याबाबत मात्र अजूनही प्रश्नचिन्हे कायम आहेत. (वृत्तसंस्था)

# जगात कोणत्याही कोपऱ्यात विजेतेपदे जिंकू शकतो : हरमनप्रीत

**नवी दिल्ली, २५ मार्च**



आम्ही टी-२० विश्वचषक जिंकण्यासाठी आमचे सर्वोत्तम प्रयत्न करू. गेल्या विश्वचषकाने आम्हाला आत्मविश्वास दिला आहे आणि आता आमच्या मनात हा ठाम विश्वास निर्माण झाला आहे की, जगातील कोणत्याही कोपऱ्यात जाऊन आम्ही विश्वचषक जिंकू शकतो, असे भारतीय महिला क्रिकेट संघाची कर्णधार हरमनप्रीत कौर हिने बुधवारी सांगितले.

द्वारका येथील ओमॅक्स स्टेडियममध्ये हरमनप्रीत कौरच्या सन्मानार्थ एका स्टॅण्डला (प्रेक्षक गॅलरीला) तिचे नाव देण्याच्या समारंभाच्या निमित्ताने बोलताना सांगितले.

या विश्वचषकाने आम्हाला कोणत्याही ठिकाणी विजेतेपद जिंकण्यासाठी अत्यंत आवश्यक असलेला आत्मविश्वास आणि स्व-श्रद्धा प्रदान केला आहे. गत वर्षी नोव्हेंबरमध्ये नवी मुंबई येथे दक्षिण आफ्रिकेचा पराभव करून भारताने आपले पहिलेवहिले विजेतेपद पटकावले होते. आणि या यशाने संघाच्या मनात असा आत्मविश्वास निर्माण केला आहे की, १२ जून ते ५ जुलै या कालावधीत इंग्लंडमध्ये होणाऱ्या महिला टी-२० विश्वचषकातही या कामगिरीची पुनरावृत्ती करता येईल.

कोणत्याही क्षेत्रात, तुम्हाला काहीतरी विशेष करून दाखवावे लागते; तुम्हाला एखादे विजेतेपद जिंकावे लागते, तेव्हाच तुम्हाला खरी ओळख मिळते. अन्यथा, आपली सर्व मेहनत वाया गेल्यासारखे वाटते, असे हरमनप्रीत म्हणाली.

केवळ आमच्याच संघाने नव्हे, तर आमच्या आधीच्या सर्व महिला क्रिकेटपटूंनीही प्रचंड मेहनत घेतली आहे; अनेकदा तर त्यांनी स्वतःच्या खिशातूनही पैसे खर्च केले आहेत. त्यामुळे, एखादे विजेतेपद जिंकणे हे आमच्यासाठी अत्यंत महत्त्वाचे होते. आणि ते साध्य केल्यानंतर, भारतीय चाहते, प्रसारमाध्यमे आणि इतर सर्वांकडून आम्हाला जो प्रतिसाद मिळत आहे, ती आमच्यासाठी खूप मोठी गोष्ट आहे, असे ती म्हणाली. (वृत्तसंस्था)

### रियान परागची टेक स्टार्टअप प्रॉक्सीमध्ये २ कोटींची गुंतवणूक

**मुंबई** : राजस्थान रॉयल्सचा कर्णधार रियान परागने देशातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या, नवोन्मेषावर आधारित मेक इन इंडिया उत्पादन आणि तंत्रज्ञान कंपन्यांपैकी एक असलेल्या प्रॉक्सीमध्ये २ कोटी रुपयांची गुंतवणूक केली आहे. या गुंतवणुकीमुळे, पराग



आता प्रॉक्सीला पाठिंबा देणाऱ्या क्रिकेटपटूंच्या वाढत्या यादीत सहभागी झाला आहे, यात कोलकाता नाईट रायडर्सचा कर्णधार अजिंक्य रहाणेचाही समावेश आहे. प्रॉक्सीने ग्रॅहम बेल अवॉर्ड, सीईएस इनोव्हेशन अवॉर्ड्स, युरोपियन प्रॉडक्ट डिझाइन अवॉर्ड्स व नॅसकॉमची लीग ऑफ १० यांसारखे अनेक पुरस्कार जिंकले आहेत. सर्वाधिक निधी मिळालेल्या स्टार्टअप्सपैकी एक म्हणूनही या कंपनीने देशभरात लक्ष वेधून घेतले आहे. प्रॉक्सीने नवोन्मेष आणि अंमलबजावणी यांच्यात साधलेला समतोल मला त्यांच्याकडे आकर्षित करणारा ठरला, असे परागने म्हटले आहे. प्रॉक्सीची उत्पादने विशेषतः दररोज आव्हानात्मक वातावरणात काम करणाऱ्या कष्टकरी कामगारांसाठी सुरक्षितता व सुलभतेवर भर देते.

### आयसीसी मानांकनामध्ये 'न खेळता' सूर्या वर!

**नवी दिल्ली** : आयसीसीच्या नवीन टी-२० क्रमवारीत मोठे बदल नसले तरी काही रंजक घडामोडी झाल्या आहेत. भारतीय कर्णधार सूर्यकुमार यादव एकही सामना न खेळता दोन स्थानांनी वर येत सातव्या क्रमांकावर पोहोचला आहे. दरम्यान, अभिषेक शर्मा अव्वल स्थानावर कायम असून ईशान किशन दुसऱ्या क्रमांकावर आहे. इतर अव्वल सहा स्थानांमध्ये कोणताही बदल झालेला नाही. न्यूझीलंडचा टिम सेफर्ट आणि दक्षिण आफ्रिकेचा डेवाल्ड ब्रेव्हिस हे सध्याच्या मालिकेत न खेळल्याने त्यांचे रेटिंग घसरले, ज्याचा फायदा इतर खेळाडूंना झाला.

### अमेलिया केरचे शतक, न्यूझीलंड विजयी

**ख्राईस्टचर्च** : येथे खेळल्या गेलेल्या पाचव्या महिला टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यात अमेलिया केर हिने एकहाती शानदार शतक झळकावत न्यूझीलंडला दक्षिण आफ्रिकेविरुद्ध ९२ धावांनी विजय मिळवून दिला. केरने ५५ चेंडूंमध्ये १०५ धावांची स्फोटक खेळी केली. न्यूझीलंडने प्रथम फलंदाजी करत २० षटकांत ६ बाद १९४ धावा केल्या. प्रत्युत्तरात दक्षिण आफ्रिकेचा संपूर्ण संघ केवळ १०२ धावांवर मर्यादित राहिला. विशेष म्हणजे, संपूर्ण संघालाही केरइतक्या धावा करता आल्या नाहीत.

# भारतीय तिरंदाजांची दिमाखदार कामगिरी

### आशिया चषक (पहिला टप्पा) ● दोन कांस्यपदके जिंकली, अंतिम फेरी गाठली

**बँकॉक, २५ मार्च**



डावीकडून राज कौर, प्रशिक्षक विवेक कुमार, तेजल सावळे, चिकिता तनीपार्थी, जुवेल सरकार, प्रशिक्षक राहुल बॅनर्जी, सुखचैन सिंग व देवांग गुप्ता

येथे बुधवारी पार पडलेल्या आशिया चषक जागतिक मानांकन तिरंदाजी स्पर्धेच्या (पहिला टप्पा) दुसऱ्या दिवशी भारतीय तिरंदाजांनी दिमाखदार कामगिरी केली. भारताने दोन कांस्य पदके आपल्या नावे केली. तसेच, पुरुष रिकर्व्ह आणि महिला कम्पाऊंड सांघिक प्रकारांच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. महिलांच्या कम्पाऊंड संघाने अंतिम फेरीत धडक मारत, मागील स्पर्धेतील आपल्या कांस्य पदकाच्या कामगिरीत सुधारणा केली.

चिकिता तनिपार्थी, राज कौर आणि तेजल साळवे या त्रिकुटाने, अत्यंत चुरशीच्या ठरलेल्या उपांत्य फेरीत यजमान देशाच्या आवडत्या खेळाडू - कान्यावी मनीषोम्बतकुल, कानोकनापस कावचोम्फू आणि चानिदापा थानारतपितिनन - यांचा २२९-२२६ अशा फरकाने पराभव केला. या विजयासह त्यांनी, तिसरा मानांकन असलेल्या कझाकस्तान संघाविरुद्धच्या अंतिम लढतीचे स्थान निश्चित केले.

मात्र, पुरुषांच्या कम्पाऊंड विभागात भारताला काहीशी निराशा पदरी पडली. या स्पर्धेत भारताने आपल्या सर्वात अनुभवी खेळाडूंचे त्रिकूट मैदानात उतरवले होते.

पात्रता फेरीत अव्वल स्थान पटकावून आणि पहिल्या चारही जागांवर वर्चस्व गाजवूनही, हा संघ आपल्या विजेतेपदाचे रक्षण करण्यात अपयशी ठरला आणि त्यांना कांस्य पदकावरच समाधान मानावे लागले.

रजत चौहान, ऋषभ यादव आणि उदय कंबोज या त्रिकुटाने उपांत्य फेरीत व्हिएतनामविरुद्ध ५ गुणांची भक्कम आघाडी गमावली व त्यांना २३३-२३४ अशा एका गुणाच्या फरकाने पराभव स्वीकारावा लागला.

भारताने पहिल्या एन्डची (फेरीची) सुरुवात निर्दोष केली; परंतु दुसऱ्या फेरीत त्यांची लय बिघडली आणि त्यांना केवळ ५७ गुण मिळवता आले. याच वेळी, व्हिएतनामच्या कोंग डक डांग, न्गोक तू फाम आणि झुआन हुओंग ट्रान यांनी निर्दोष ६० गुणांची कमाई करत गुणांमधील तफावत कमी केली. व्हिएतनामी खेळाडूंनी तिसऱ्या फेरीतही पुन्हा एकदा निर्दोष ६० गुणांची कमाई करत आपली विजयी घोडदौड कायम ठेवली. यामुळे त्यांनी भारताची आघाडी मोडून काढली आणि स्वतः १ गुणाची आघाडी घेतली.

अंतिम फेरीत दोन्ही संघांनी प्रत्येकी ५९ गुण मिळवले, ज्यामुळे भारताचा निसटता पराभव निश्चित झाला.

तरीही, भारतीय संघाने या धक्क्यातून सावरत कांस्य पदकासाठीच्या लढतीत भूतानचा २३४-२३२ अशा फरकाने पराभव केला. रिकर्व्ह विभागात, भारताने मलेशियाचा ५-१ अशा फरकाने पराभव करत पुरुषांच्या सांघिक प्रकाराच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. अव्वल मानांकन असलेल्या देवांग गुप्ता, सुखचैन सिंग आणि जुएल सरकार या त्रिकुटाने एकही सेट न गमावता सहजपणे विजय मिळवला. महिलांच्या रिकर्व्ह संघानेही मलेशियाचा ५-१ ने पराभव करत कांस्यपदकावर आपले नाव कोरले. रुमा बिस्वास, कीर्ती आणि रिधी फोर या त्रिकुटाने अत्यंत वर्चस्वपूर्ण कामगिरी केली. (वृत्तसंस्था)

# दुहेरी नामांकनाने शंका दूर : प्रिन्स दीप

### हॉकी इंडियाचा वार्षिक पुरस्कार

**नवी दिल्ली, २५ मार्च**



अजून वरिष्ठ आंतरराष्ट्रीय स्तरावर पदार्पण करायचे शिल्लक असतानाच, आगामी हॉकी इंडियाच्या वार्षिक सोहळ्यात गोलरक्षक २१ वर्षीय प्रिन्स दीप सिंग याला नामांकन मिळाले आहे. या दुहेरी नामांकनांनी माझ्या मनातील आत्म-शंका दूर केल्या असून, माझ्या महत्त्वाकांक्षेला नवी ऊर्जा दिली आहे, असे प्रिन्स म्हणाला.

या वार्षिक पुरस्कार सोहळ्याची आठवी आवृत्ती शुक्रवारी येथे आयोजित करण्यात आली आहे.

सध्या वरिष्ठ पुरुष राष्ट्रीय शिबिरात सराव करत असलेल्या प्रिन्स दीप सिंगला दोन सर्वात मोठ्या श्रेणींमध्ये नामांकन मिळाले आहे- हॉकी इंडिया बलजित सिंग पुरस्कार (२०२५ चा वर्षातील सर्वोत्तम गोलरक्षक) आणि हॉकी इंडिया जुगराज सिंग पुरस्कार (२०२५ चा वर्षातील उदयोन्मुख खेळाडू - पुरुष, २१ वर्षांखालील गट) या दोन गटात प्रिन्सला नामांकन देण्यात आले आहे.

मला खूप आनंदव अभिमान वाटत आहे. अशा पुरस्कारांसाठी नामांकन मिळायला सहसा वेळ लागतो, पण मला ही संधी लवकर मिळाली. स्पर्धांमध्ये चांगली कामगिरी करणे व अव्वल गोलरक्षकांमध्ये माझे नाव पाहणे, यामुळे मला खूप प्रेरणा मिळते, असे प्रिन्स म्हणाला.

भारताकडे गोलरक्षकांची एक मजबूत फळी उपलब्ध आहे. वरिष्ठ स्तरावर पदार्पण करण्यापूर्वीच मला नामांकन मिळणे ही एक विशेष गोष्ट वाटते. यामुळे मी योग्य मार्गावर वाटचाल करीत आहे असा आत्मविश्वास मिळतो. हा विश्वास कदाचित या सन्मानाची सर्वात मोठी फलश्रुती आहे, ही एक अशी पुष्टी आहे की, मनातील आत्म-शंका दूर करण्यास आणि महत्त्वाकांक्षेला बळ देण्यास मदत करीत आहे, असेही तो म्हणाला.

प्रिन्स दीपने २०२४ च्या ज्युनियर आशिया चषकात सुवर्णपदक, २०२५ च्या सुलतान ऑफ जोहोर चषकात रौप्यपदक आणि गेल्या वर्षी चेन्नई येथे झालेल्या पुरुष ज्युनियर विश्वचषकात कांस्यपदक पटकावले होते. त्याला हॉकी इंडिया लीगमध्ये स्पर्धेतील सर्वोत्तम गोलरक्षक म्हणूनही गौरवण्यात आले होते; या स्पर्धेत तो अकॉर्ड तामिळनाडू ड्रॅगन्स संघाकडून खेळला होता. (वृत्तसंस्था)

# आरसीबीचे मालक बदलले

### मालकी हक्क आदित्य बिर्ला समूहाकडे




**बंगळुरू, २५ मार्च**

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) या संघाचे अधिग्रहण एका अत्यंत प्रतिष्ठित समूहाने तब्बल सुमारे १६,६६० कोटी रूपये देऊन केले आहे. या समूहाचे नेतृत्व आदित्य बिर्ला समूह करीत असून, यामध्ये टाइम्स ऑफ इंडिया समूह, बोल्ट व्हेंचर्स आणि ब्लॅकस्टोन यांचाही समावेश आहे. या व्यवहारामध्ये (इंडियन प्रीमियर लीग) आणि (महिला प्रीमियर लीग) या दोन्ही संघांच्या संपूर्ण मालकी हक्कांचा समावेश आहे.

युनायटेड स्पिरिट्स लिमिटेडने (यूएसएल) दिलेल्या माहितीनुसार, त्यांच्या संचालक मंडळाने रॉयल चॅलेंजर्स स्पोर्ट्स प्रायव्हेट लिमिटेडमधील (आरसीएसपीएल) आपला १०० टक्के समभाग सदर समूहाला रोख स्वरूपातील व्यवहाराद्वारे विकण्याच्या अंतिम करारांना मंजुरी दिली आहे. आरसीएसपीएलकडेच पुरुष व महिला या दोन्ही लीग्समधील संघांची मालकी आणि व्यवस्थापनाची सूत्रे आहेत. हा व्यवहार पूर्ण झाल्यानंतर, सदर समूहाला या संघांची मालकी आणि व्यवस्थापन करण्याचे संपूर्ण अधिकार प्राप्त होतील. यूएसएलने नोव्हेंबर २०२५ मध्ये सुरू केलेल्या एका धोरणात्मक आढावा प्रक्रियेचाच हा व्यवहार परिपाक आहे. (वृत्तसंस्था)

#### आरसीबीचे नवीन अध्यक्ष आर्यमन बिर्ला



आयपीएल २०२६ सुरू होण्यापूर्वी गतविजेत्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) संघाला नवीन मालक मिळाले आहेत. आदित्य बिर्ला समूहाच्या नेतृत्वाखालील समूहाने ही फ्रॅन्चायझी सुमारे १.७८ अब्ज डॉलर्स किंमतीला विकत घेतली आहे. या बदलानंतर आर्यमन बिर्ला आरसीबीचे अध्यक्ष असतील. ते उद्योगपती कुमार मंगलम बिर्ला यांचे पुत्र असून, स्वतःही माजी क्रिकेटपटू आहेत. त्यांनी देशांतर्गत क्रिकेटमध्ये मध्य प्रदेशचे प्रतिनिधित्व करीत २०१८ मध्ये प्रथम-श्रेणी क्रिकेटमध्ये शतक झळकावले आहे.आर्यमन बिर्ला यांनी यापूर्वी राजस्थान रॉयल्स संघाचा भाग म्हणून आयपीएलमध्ये स्थान मिळविले होते, मात्र त्यांना पदार्पणाची संधी मिळाली नाही. क्रिकेटनंतर त्यांनी कॉर्पोरेट क्षेत्रात प्रवेश करत आदित्य बिर्ला समूहामध्ये महत्त्वाची भूमिका स्वीकारली आहे.



# धोनिश, अंजलीने पटकावले पहिले पदक

### खेलो इंडिया वनवासी क्रीडा

**रायपूर** : येथील आंतरराष्ट्रीय जलतरण संकुलात आयोजित पहिल्या खेलो इंडिया वनवासी तक्रीडा स्पर्धेत कर्नाटकचा धोनिश एन. आणि ओडिशाची अंजली मुंडाने अनुक्रमे पुरुष व महिलांच्या २०० मीटर फ्रीस्टाईल जलतरण स्पर्धेत वर्चस्वपूर्ण कामगिरी करत पहिले दोन सुवर्णपदके पटकावलीत. एकूण ३० राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश खेलो इंडिया टवनवासी क्रीडा स्पर्धेच्या या पहिल्या आवृत्तीत सहभागी होत आहेत. यामध्ये जवळपास ३८०० स्पर्धक नऊ क्रीडा प्रकारांमध्ये एकमेकांशी भिडतील.

### हर्षितच्या जागी नवदीप सैनी

**नवी दिल्ली** : आगामी १९ वा इंडियन प्रीमियर लीग हंगाम सुरू होण्यापूर्वी कोलकाता नाईट रायडर्स (केकेआर) आणि गुजरात टायटन्स (जीटी) या संघांनी अनुक्रमे नवदीप सैनी आणि कुलवंत खेजरोलिया यांची पर्यायी खेळाडू म्हणून निवड केली आहे.केकेआरने २०२६ च्या आयपीएलसाठी हर्षित राणाच्या बदली खेळाडूची घोषणा केली आहे. दुखापतीमुळे हा स्टार वेगवान गोलंदाज या हंगामातून बाहेर झाला. या हंगामात नवदीप सैनी भारतीय वेगवान गोलंदाजाने घेतले आहे.



# हर्षवर्धन सदगीरला शरद पवारांकडून १२ लाखांची शिष्यवृत्ती

### काका पवार यांच्या तालमीला ५० लाखांचे आर्थिक सहाय्य

**पुणे, दि. २५ मार्च-**

खासदार व कुस्ती श्रेत्राचे आश्रयदाते शरद पवार साहेब यांनी डबल महाराष्ट्र केसरी हर्षवर्धन सदगीरला १२ लाख रूपयांची शिष्यवृत्ती तर काका पवार यांच्या आंतरराष्ट्रीय क्रीडा संकुल,पुणे या संकुलसाठी ५० लाख रुपयेंचे बक्षिस दिले आहे. मुंबईत हर्षवर्धन सदगीरसह अर्जून पुरस्कार विजेते काका पवार यांनी शरद पवार यांची भेट घेतली. यावेळी उद्योजक श्री मोहसीन बागवान, कुस्ती प्रशिक्षक शिवाजी कोळी सर महाराष्ट्र चॅम्पियन पृथ्वीराज पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

हर्षवर्धन सदगीर यांचे कौतुक करीत ऑलिम्पिकपटू होण्यासाठी पुढील २ वर्षांसाठी महिना ५० हजार प्रमाणे १२ लाखांचे शिष्यवृत्ती धनादेश दिला आहे. काका पवार यांच्या तालमीतील हर्षवर्धनसह ११ मल्लांनी पदकाची लयलुट केल्याबद्दल आंतरराष्ट्रीय क्रीडा संकुलला ५० लाख रूपयांचे शरद पवार यांनी आर्थिक सहाय्य दिले आहे. शरद पवार यांचे आभार व्यक्त करीत काका पवार म्हणाले की, पवार हे खेळाडूंसाठी तारणहार व आधार आहेत. त्यांच्या या कार्याबद्दल त्यांचे आम्ही सर्व पहिलवान व खेळाडू कायम ऋणी आहोत. पवार यांनी केवळ घोषणाच केली नाही तर धनादेश देऊन वेळीच विजेत्यांचे व प्रशिक्षण केंद्राचे कौतुक केले आहे. क्रिकेटनंतर इतक्या वेगाने पवार हेच कुस्तीगीरांसाठी अनेकदा धावून आले आहेत. हर्षवर्धन सदगीर याने सांगितले की, गुरूवर्य काका पवार यांच्या सल्ल्यानंतर मी पुन्हा महाराष्ट्र केसरीच्या मैदानात तरणार आहे. परंतु ऑलिम्पिक खेळण्याचे माझे ध्येय आहे. शरद पवार यांची मदत प्रोत्साहन देणारी ठरली आहे.

**शासनाकडून नोकरीचे आश्वासन**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचीही काक पवार व हर्षवर्धन सदगीर यांनी भेट घेतली. त्यावेळी येत्या अधिवेशनात नाशिक महानगरपालिकेत नोकरी देण्याचे आश्चासन एकनाथ शिंदे यांनी दिली असल्याचे काका पवार यांनी सांगितले आहे.

# थंडर्स, टाईम्स इलेव्हनचे शानदार विजय

### इंडियन मॉडेल पॅरेंट्स क्रिकेट लीग सिझन-१६ | मकरंद बसवंती, गजानन पिलगुलवार सामनावीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ मार्च-**

इंडियन मॉडेल पॅरेंट्स क्रिकेट लीग सिझन-१६ क्रिकेट स्पर्धेत बुधवारी आयएमएस थंडर्स, टाईम्स इलेव्हन संघाने शानदार विजय नोंदविले.

श्री अरुणोदय मल्टिस्टेट को. ऑप. क्रेडीट सोसायटी लि. प्रायोजित ही स्पर्धा डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्टेडियम, रेल्वे मैदान येथे सुरु आहे. तिसऱ्या सामन्यात टाईम्स इलेव्हनने ग्लोबल वॉरियर्सचा चार धावांनी पराभव केला.

२० धावा व ३ बळी पटकाविणारा मकरंद बसवंती सामन्याचा मानकरी ठरला. चौथ्या सामन्यात थंडर्सने टायगर्स वर ६ गडी राखून विजय मिळविला. गजानन पिलगुलवार (१७



मकरंद बसवंती



गजानन पिलगुलवार

धावा १ बळी) सामनावीर ठरला.

**संक्षिप्त धालफलक**

**टाईम्स इलेव्हन** : १२ षटकांत ८ बाद ११० (आनंद बदामीकर ४५, मकरंद बसवंती २०, मयूर बासुतकर १६, रफिक मोमीन २-८, जयराज मडोळे१-७, जावेद पटेल १-२६) **वि. वि. ग्लोबल वारियर्स** : १२ षटकांत ६ बाद १०६ (श्रीकांत सोलकर ४२, सचिन कामुनी २७, सचिन गोरे १९, मकरंद बसवंती३-१३, सुधांशु भालेराव २-९, रोहित उपळेकर १-१८).

**टायगर्स** : १२ षटकांत ७ बाद ५५ (लक्ष्मण कावळे २२, संगमनाथ नागोजी १०, अजिंक्य माने १-५, राजपाल सरवदे १-७, सचिन गायकवाड १-७, गजानन पिलगुलकर १-८, इस्माईल शेख १-७) **पराभूत विरुद्ध थंडर्स** : ८.२ षटकांत ५ बाद ५९ (गजानन पिलगुलवार १७, प्रवीण नरोटे १०, बबलू वळसंगे २-१६, सागर कुंभार १-२).

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### बलदवा हायस्कूलच्या विद्यार्थ्यांचे जिल्हास्तरीय यश

**सोलापूर, दि. २५ मार्च-**

गांधी विचार संस्कार परीक्षेत गोपीबाई रामकिसन (पापाशेठ) बलदवा हायस्कूल येथील विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरावर यश संपादन केले आहे. परीक्षेत प्रथम - प्राची ढावरे, प्रतीक्षा जाधव, गौरी कांबळे, शर्वरी उघडे, प्रज्ञा ढावरे, द्वितीय संजना पवार, तृतीय सुहाना शेख. यशस्वी विद्यार्थ्यांना गांधी विचार संस्कार परीक्षा जळगाव यांच्यामार्फत प्रशस्तीपत्र व मेडल देऊन गौरविण्यात आले. सर्व विद्यार्थ्यांना उपक्रम प्रमुख शीला हावळे यांचे मार्गदर्शन ठरले. गव्हर्नमेंट ऑफ इंडिया, मिनिस्ट्री ऑफ एज्युकेशन अंतर्गत आयोजित विकसित भारत बिल्डथॉन २०२५-व्होकल फॉर लोकल या उपक्रमात शाळेतील विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवून यशस्वीरित्या काम पूर्ण केले. याबद्दल विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. स्पर्धेत राम गायकवाड, श्रेयस कांबळे, जोया शेख, प्राजक्ता कोठे, वैष्णवी डोंगरे यांनी नाविन्यपूर्ण कल्पना/प्रोटोटाइप सादर करून यश संपादन केले. सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन माजी विद्यार्थी नूतन पीएसआय योगेश्वर पांचाळ व मुख्याध्यापक मारुती मडवळी, स्कूल कमिटी सदस्य रामन्ना जाधव, शिवा कदम, विश्वनाथ कराळे, शरद भुईटे आबा, सावंत, कराळे यांच्या हस्ते करण्यात आले.

# कुळ कायद्यातील जाचक अटींमुळे शेतकरी हवालदील

### १० टक्के रक्कम भरून जमिनी नावावर करा : आमदार अभिजीत पाटील यांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २५ मार्च-**

राज्य सरकारने कुळ कायद्यात सुधारणा करताना जिल्हाधिकाऱ्यांचे अधिकार काढून ते राज्य सरकारकडे घेणे आणि प्रक्रियेत होणारा विलंब यांमुळे सर्वसामान्य शेतकरी भरडला जात असल्याची टीका आमदार अभिजीत पाटील यांनी विधानसभेत केली.

उजनी धरण परिसरातील ६०० हेक्टरहून अधिक जमीन आणि रांजणी, विमाननगर सारख्या वस्त्यांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी १० टक्के रक्कम भरून घेऊन या जमिनी 'वर्ग-१' मध्ये रूपांतरित कराव्यात, अशी आग्रही मागणी त्यांनी यावेळी केली.



विधेयकावरील चर्चेत सहभाग घेताना आमदार पाटील म्हणाले की, उजनी धरणासाठी संपादित केलेली मात्र वापरात नसलेली शेकडो हेक्टर जमीन शेतकरी अनेक वर्षांपासून कुळ म्हणून कसत आहेत. ३०-३० वर्षे उलटूनही ही जमीन त्यांच्या मालकीची झालेली नाही. सातबाऱ्यावर 'कुळ' असा उल्लेख असल्याने या शेतकऱ्यांना बँकांचे कर्ज मिळत नाही, घरांच्या बांधकामासाठी परवानग्या मिळत नाहीत आणि सामाजिक स्तरावरही या मुलांची लग्ने जमण्यात अडचणी येत आहेत. ही परिस्थिती अत्यंत गंभीर असून, यामुळे शेतकरी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलत आहेत. नुकत्याच सरकारकडून आलेल्या नोटिसांमुळे भीतीपोटी दोन शेतकऱ्यांचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाल्याची धक्कादायक माहितीही त्यांनी सभागृहात दिली.

प्रशासकीय दिरंगाईवर बोट ठेवताना आमदार पाटील यांनी स्पष्ट केले की, जिल्हाधिकाऱ्यांचे अधिकार राज्य सरकारकडे वर्ग केल्यामुळे फाईलींचा प्रवास लांबणार आहे. मंत्रालयाचे उंबरठे झिजवण्यात शेतकऱ्यांचा वेळ वाया जाईल. सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्यासारख्या प्रामाणिक अधिकाऱ्यांकडे हे अधिकार कायम ठेवले तर स्थानिक पातळीवर प्रश्न लवकर सुटतील. अधिकारांचे विकेंद्रीकरण करून जिल्हाधिकाऱ्यांना कालमर्यादा घालून द्यावी, जेणेकरून दोन-तीन महिन्यांत शेतकऱ्यांच्या नावावर जमिनी होतील, असा तोडगा त्यांनी सुचवला.

विमाननगर, रांजणी, सुरली आणि शिराळा यांसारख्या गावांमधील घरांचा आणि शेतीचा प्रश्न या कायद्यामुळे सुटू शकतो. ज्या कारणासाठी जमीन घेतली होती, त्यासाठी ती वापरली नसेल तर ती मूळ शेतकऱ्याला परत मिळणे हा त्यांचा हक्क आहे. केवळ २-४ एकर जमीन असणाऱ्या या अल्पभूधारक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी सरकारने या कायद्यातील त्रुटी दूर कराव्यात आणि त्यांना कायमस्वरूपी मालकी हक्क द्यावा, अशी विनंती आमदार अभिजीत पाटील यांनी भाषणाच्या शेवटी केली. त्यांच्या या भूमिकेचे उजनी काठच्या शेतकरी संघटना आणि स्थानिक नागरिकांनी स्वागत केले आहे.

## पापनस येथे वीज चोरी उघड; ग्राहकाविरुध्द कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २५ मार्च-**

माढा तालुक्यातील मौजे पापनस येथे बेकायदेशीररीत्या वीज वापर केल्याचा प्रकार उघडकीस आला असून संबंधित ग्राहकाविरुद्ध महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित (महावितरण) कडून भारतीय विद्युत अधिनियम २००३ च्या कलम १३५ अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.

महावितरणच्या कुडूवाडी ग्रामीण-२ शाखेचे प्रभारी कनिष्ठ अभियंता अमित सौदागर आवटे यांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. १० मार्च रोजी सायंकाळी थकबाकीदार व वीजपुरवठा खंडित केलेल्या ग्राहकांची तपासणी करताना ते सहकारी संदीप देटे व इतर कर्मचाऱ्यांसह पापनस येथे गेले होते.

यावेळी अकबर अयुब कुरेशी (वय २८) यांच्या घरासमोरील लघुदाब वाहिनीच्या पोलवरील मल्टीमीटर बॉक्समध्ये काळ्या रंगाच्या वायरद्वारे आकडा टाकून बेकायदेशीररीत्या वीज वापर होत असल्याचे निदर्शनास आले. पंचासमक्ष सदर वायर जप्त करुन त्यावर सहीयुक्त लेबल लावण्यात आले असून तो मुद्देमाल शाखा कार्यालयात सुरक्षित ठेवण्यात आला आहे. पुढील कार्यवाहीसाठी तो पोलीस ठाण्यात जमा करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

तपासणीत संबंधित ग्राहकाने १,२७३ युनिट वीज चोरी केल्याचे, चोरीची अंदाजे रक्कम रुपये १८,७७९

तसेच त्यांच्या नावावरील खंडित कनेक्शनची रूपये १६,७५० थकबाकी असल्याचे आढळले. याप्रमाणे एकूण देय रक्कम रुपये ३५,५२९ इतकी असून तडजोड रक्कम रुपये ४,००० निश्चित करण्यात आली आहे. आर्थिक वर्षअखेरच्या कामकाजामुळे गुन्हा त्याच दिवशी नोंदविता आला नसल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

या प्रकरणी संबंधित ग्राहकाविरुद्ध भारतीय विद्युत अधिनियम २००३ च्या कलम १३५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यासाठी महावितरणकडून अधिकृत फिर्याद देण्यात आली आहे. महावितरणने नागरिकांना अनधिकृत वीज वापर टाळण्याचे व थकबाकी वेळेत भरण्याचे आवाहन केले असून वीज चोरीविरोधात तपासणी मोहीम पुढेही सुरु राहणार असल्याचे सांगितले आहे.

## वीजपुरवठा पुरेशा दाबाने व सुरळीत करावा

### शिवणे येथील ग्रामस्थांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२५ मार्च-**

शिवणे (ता.सांगोला) येथे शेतीपंप व घरगुती वीज परवठा वारंवार खंडीत होत आहे. याबाबत ग्रामस्थांनी सांगोला महावितरण कार्यालयास निवेदन देऊन येथील वीजपुरवठा पुरेशा दाबाने व सुरळीत करावा अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा दिला आहे.

सध्या कडक उन्हाळ्याचे दिवस सुरू झाले असल्याने पिकांना आणि जनावरांना वेळेवर पाणी देणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना अभ्यास करण्यासाठी विजेची गरज आहे. अशा काळात वीज नेहमीच गायब होत असल्याने या परिसरातील नागरिकांचे पशुपालकांचे आणि विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. शिवणे येथील शेतकऱ्यांना आणि घरगुती ग्राहकांना भारनियमन व्यतिरिक्त पूर्ण दाबाने व सलग विज कोरडा न झाल्यास ग्रामस्थांच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा या निवेदनात देण्यात आला आहे. हे निवेदन उपअभियंता रमेश पोवार यांना देतेवेळी गोरख घाडगे, बाळासाहेब वाळके, दादासाहेब घाडगे, विक्रम घाडगे, अनिल इरकर, प्रताप पाटील, निसार काझी, किरण वाघमोडे, औदुंबर काळे उपस्थित होते.




> वीज पुरवठा सुरू असतानाही तो वारंवार खंडित होतो आहे. यामुळे शेतकरी, विद्यार्थी यांचे प्रचंड नुकसान होत असून महिलांना त्रास सहन करावा लागत आहे. शिवणे येथील घरगुती विज बिल वसुली शंभर टक्के असतानाही गाव अश्मयुगाचा अनुभव घेत आहे.
> **प्रताप पाटील,** शिवणे

### सोलापुरात बचत गटांत बदलाची चाहूल!

## २५ हजार पदाधिकारी फेरबदलाची शक्यता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५ मार्च**

जिल्ह्यातील सुमारे २५ हजार महिला बचत गटांमध्ये दीर्घकाळापासून एकाच पदावर कार्यरत असलेल्या अध्यक्ष व सचिवांबाबत आता बदलाचे संकेत मिळू लागले आहेत. यासंदर्भात संबंधित स्तरावरून सूचना देण्यात आल्या असून, या निर्णयामागे गटांच्या कार्यक्षमतेत वाढ आणि नव्या नेतृत्वाला संधी देणे हा मुख्य उदेश असल्याचे स्पष्ट होत आहे.

जिल्ह्यातील अनेक बचत गटांमध्ये अध्यक्ष आणि सचिव पदे वर्षानुवर्षे त्याच व्यक्तींकडे असल्यामुळे नव्या सदस्यांना नेतृत्वाची संधी मिळत नाही, अशी तक्रार सातत्याने समोर येत होती. यामुळे गटांमध्ये नवकल्पना, पारदर्शकता आणि सक्रियता कमी होत असल्याचे निरीक्षणही व्यक्त करण्यात आले आहे.या पार्श्वभूमीवर पदाधिकाऱ्यांमध्ये फेरबदल करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. यामुळे गटांचे कामकाज अधिक गतिमान होऊन महिलांमध्ये नेतृत्वगुण विकसित होतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

याबाबत इंद्रजीत पवार यांनी सांगितले की, दीर्घकाळ एकाच पदावर राहिल्यामुळे काही ठिकाणी कामकाजात स्थिरता येते. त्यामुळे नव्या नेतृत्वाला संधी देणे गरजेचे आहे. यामुळे बचत गट अधिक सक्षम व सक्रिय होतील. दरम्यान, या निर्णयामुळे अनेक बचत गटांमध्ये उत्सुकता निर्माण झाली असून, आगामी काळात गटांच्या कार्यपद्धतीत सकारात्मक बदल होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## कोल्हापूरच्या व्यवसायिकाला सांगोल्यात लुटले

**सांगोला :** गांधीनगर कोल्हापुर येथून निंलगा जि.लातूर येथे चाललेल्या व्यवसायिकाला सांगोल्यात लुटले असल्याची घटना शनिवार दि.२१ मार्च रोजी घडली.

दिलीप भागोजी पाटील (वय-५८), व्यवसाय- गाडीचे स्पेअर पार्टचे दुकान, रा.भोगम कॉलनी, चिंचवड, ता.करवीर, जि.कोल्हापुर हे शनिवार दि.२१ मार्च रोजी गांधीनगर कोल्हापुर येथुन इरटिगा गाडी नं.एमएच.०९ जेयु.०३७१ यामधुन पत्नी सत्यकला व चालक रामचंद्र साळुंखे रा.वळिवडे, ता.करविर असे तिघेजण लातूर जिल्ह्यातील निंलगा येथे चालु असलेल्या घराच्या बांधकामसाठी २ लाख ५० हजार रू. रोख कपड्याच्या एका बॅगेत ठेवून निघाले होते. ती बॅग गाडीच्या पाठीमागील डिकीत ठेवली होती. रा.११ वा. सुमारास त्यांची गाडी सांगोला येथील पंढरपुर ब्रिजचे पुढे थोड्या अंतरावर आली असता विना नंबरच्या काळ्या रंगाच्या थार गाडीने त्यांच्या गाडीस कट मारून गाडी थांबवुन त्यातील ३० ते ३५ वर्षे वयोगटातील चार अनोळखी इसमांनी शिवीगाळ करून दोन कपड्याच्या बॅगा व चालकाचे दोन मोबाईल फोन जबरदस्तीने चोरून नेले.

## महापालिकेने केला जलसंपदाकडे १०.२० कोटी थकबाकी भरणा

### तिन्ही जलस्रोतांवरील पंप सुरळीत : चौबे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ मार्च-**

जलसंपदा विभागाकडे प्रलंबित असलेली थकबाकी महापालिकेने आज १०.२० कोटी तर

तीन टप्प्यांत एकूण १७.५१ कोटी रुपये भरल्यामुळे शहराच्या पाणीपुरवठ्यावरील संकट दूर झाले असून तिन्ही जलस्रोतांवरील पंप सुरळीत सुरू असल्याची माहिती महापालिका सार्वजनिक आरोग्य अभियंता वेंकटेश चौबे यांनी दिली.

सोलापूर शहराला उजनी धरण, औज बंधारा आणि हिप्परगा जलाशय या तीन ठिकाणांहून पाणीपुरवठा केला जातो. शहराची दररोज सुमारे अडीचशे एमएलडी पाण्याची गरज आहे. ठरलेल्या मर्यादेपेक्षा अधिक पाण्याचा उपसा केल्यामुळे जलसंपदा विभागाने महापालिकेवर दंड आकारला होता. ही रक्कम प्रलंबित राहिल्याने पंप बंद करण्याची कारवाई करण्याचा इशारा देण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर महापालिकेने तातडीने आर्थिक नियोजन करत १२ मार्च रोजी साडे तीन कोटी, २४ मार्च रोजी ३.८१ कोटी आणि २५ मार्च रोजी १०.२० कोटी रुपये असा एकूण १७.५१ कोटी रुपयांचा भरणा केला.

या भरण्यानंतर जलसंपदा विभागाने प्रस्तावित कारवाई थांबवली. परिणामी उजनी, औज आणि हिप्परगा या तिन्ही जलस्रोतांवरील पाणी उपसा करणारे पंप सुरळीतपणे सुरू असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

महापालिकेच्या या निर्णयामुळे ऐन उन्हाळ्यात निर्माण होऊ शकणारे जलसंकट टळले असून नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. भविष्यात अशी परिस्थिती निर्माण होऊ नये, यासाठी पाणीवापराचे काटेकोर नियोजन आणि थकबाकी वेळेत भरणे आवश्यक असल्याचेही प्रशासनाकडून सांगण्यात आले.

**नगरसेवक अनंत जाधव यांनी विचारला जाब**

दरम्यान, महापालिका अंदाजपत्रक नियोजन आढावा बैठकीमध्ये आज थकबाकी आणि सील संदर्भात अनंत जाधव यांनी व्यंकटेश चौबे यांना जाब विचारला. महापालिका सभागृह आणि पदाधिकाऱ्यांना या संदर्भात माहिती का दिली नाही असा सवाल उपस्थित केला. चौबे यांनी जलसंपदा विभागाने सील केले नाही असे सांगताच अनंत जाधव यांनी माझ्याकडे या संदर्भातील फोटो आहेत असे सांगितले.

**तिन्ही जलस्रोतांवरील पंप सुरळीत**

महापालिकेकडून आज जलसंपदा विभागाकडे १० कोटी २० लाख रुपयांचा भरणा करण्यात आल्यामुळे शहरातील पाणीपुरवठ्यावरील अनिश्चितता दूर झाली आहे. सध्या कोणतेही पंप सील नसून सर्व पंप सुरळीत सुरू असल्याने पाणीपुरवठ्यात कोणतीही अडचण येणार नसल्याची माहिती सार्वजनिक अभियंता व्यंकटेश चौबे यांनी दिली.



## सोलापूरमध्ये एलपीजीचे दर गगनाला

### गैरप्रकार रोखून रिक्षाचालकांना दिलासा देण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ मार्च-**

सोलापूर शहरात ऑटो रिक्षासाठी वापरल्या जाणाऱ्या एलपीजी इंधनाच्या दरात अचानक ३० ते ३५ रुपयांची मोठी वाढ झाल्याने आणि तीव्र तुटवडा निर्माण झाल्याने रिक्षाचालक मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत. शहरातील विविध पंपांवर ८२.९५ ते ८७ रुपये प्रति लिटर याप्रमाणे मनमानी दर आकारले जात असून, या गैरप्रकारांविरुद्ध 'वाहतूक संघटना संयुक्त महासंघाने' आक्रमक पवित्रा घेतला आहे.

प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन एलपीजीचे दर कमी करावेत आणि मनमानी करणाऱ्या पंपांवर कठोर कारवाई करावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा वाहतूक संघटना संयुक्त महासंघाने प्रशासनाला इशारा दिला आहे की, तात्काळ निर्णय न घेतल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.

यावेळी प्रदेश अध्यक्ष रियाज सय्यद, प्रदीप शिंगे, इरफान कल्याणी, इम्रान शेख, शंकर राऊत, अशोक बनसोडे, सालीक शेख, जुबेर शेख, इर्शाद शेख, सरफराज पिरजादे, सद्दाम सय्यद,कबीर शेख, सचिन शिर्के, हानोक रावडे, इलाही कुरेशी, लाडजी नदाफ, यासीन मुल्ला, अकिल शेख, अफसर पिरजादे, सरफराज बागवान, शब्बीर फुलमामडी, मोहसिन बागवान, अप्पू सुतार, जमीर शेख उपस्थित होते.

## माध्यमिक मुख्याध्यापकांसाठी एकदिवसीय कार्यशाळा

**सोलापूर, दि. २५ मार्च-**

सोलापूर शहर माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ सोलापूर यांच्यावतीने शहरातील मुख्याध्यापक व तंत्रस्नेही शिक्षकांसाठी एकदिवसीय शैक्षणिक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

शुक्रवार दि.२७ मार्च रोजी सकाळी ९.३० वाजता निर्मलकुमार फडकुले सभागृहात आयोजित कार्यशाळेचे उदघाटन शिक्षण उपसंचालक गणपत मोरे यांच्या हस्ते, माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. या कार्यशाळेत कृत्रिम बुद्धिमत्ताचा अध्यापनात प्रभावी वापर, अध्यापनासाठी उपयुक्त अख ढेश्री चा उपयोग तसेच शाळा व्यवस्थापनाशी संबंधित महत्त्वाच्या विषयांवर तज्ज्ञांकडून मार्गदर्शन केले जाणार आहे. त्यामुळे शिक्षकांना आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत अध्यापन अधिक परिणामकारक करण्याची संधी मिळणार आहे.या बदलत्या शिक्षण व्यवस्थेत तंत्रज्ञानाची भूमिका अधिक प्रभावी करण्याच्या उद्देशाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेस मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाच्यावतीने करण्यात आले आहे.

## निधन वृत्त...

### सखुबाई फुगे



**बार्शी, दि. २५ मार्च-**

सुभाषनगर, बार्शी येथील श्रीमती सखुबाई मच्छिंद्र फुगे यांचे वयाच्या ८० व्या वर्षी बुधवारी सकाळच्या सुमारास वृद्धापकाळाने निधन झाले. त्या अरुण आणि सौदागर मच्छिंद्र फुगे यांच्या मातोश्री होत. त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली, सुना, नातवंडे परिवार आहे.

### कलावती सपकाळ



**सोलापूर, दि. २५ मार्च-**

कुमठा नाका वेणुगोपाल नगर येथील कलावती दत्तात्रय सपकाळ यांचे मथुरा येथे देवदर्शनासाठी गेले असता हृदयविकाराच्या झटक्याने बुधवारी दुपारी ४.३०च्या सुमारास निधन झाले. संतोष सपकाळ व सतीश सपकाळ यांचे मातोश्री होत. शुक्रवारी सकाळी त्यांच्या निवासस्थानापासून अंतयात्रा निघेल.

## सुलाखे कॉमर्स कॉलेजच्या विद्यार्थ्यांसाठी आदर्श उपक्रम

### स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजनेतून राज्यातील पहिला विमा दावा मंजूर

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. २६ मार्च-**

विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत सामाजिक बांधिलकी जपत श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित बी. पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज, बार्शी यांनी उल्लेखनीय कार्य करत स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजना - विद्यार्थी-पालक अपघात विमा अंतर्गत राज्यातील पहिला विमा दावा मंजूर करुन घेतला आहे. महाविद्यालयाच्या तत्पर पाठपुराव्यामुळे विद्यार्थ्याच्या कुटुंबाला अल्पावधीत आर्थिक मदत मिळाल्याने सर्व स्तरांतून कौतुक व्यक्त होत आहे.

चंद्रकांतदादा पाटील, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या संकल्पनेतून सुरु झालेली ही योजना संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहे. इंटिग्रेटेड रिस्क इन्शुरन्स ब्रोकर्स यांनी तयार केलेल्या पॉलिसीनुसार या योजनेच्या राज्यभर अंमलबजावणीसाठी नॅशनल इन्शुरन्स कंपनी, पुणे ऑफिस-३ यांची निवड करण्यात आली आहे.



अवघ्या ७३ रुपयांमध्ये पाच लाख रुपयांचे अपघाती विमा संरक्षण विद्यार्थी व त्यांच्या पालकांना उपलब्ध करुन देणारी ही योजना विद्यार्थ्यांसाठी मोठा आधार ठरत आहे.

बी. पी. सुलाखे कॉमर्स कॉलेजमधील एका विद्यार्थ्याच्या पालकाचा अपघाती मृत्यू झाल्यानंतर महाविद्यालयाने तात्काळ पुढाकार घेत फेब्रुवारी २०२६ मध्ये विमा दावा सादर केला. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून नॅशनल इन्शुरन्स कंपनीने अवघ्या सात दिवसांत रु. ४ लाख ४० हजारांचा विमा दावा मंजूर केला.

नॅशनल इन्शुरन्स कंपनीचे मॅनेजर राहुल पाटील व डेप्युटी मॅनेजर अंजू शिंदे यांनी स्वतः महाविद्यालयात भेट देत मयत संजय अनभूले यांच्या कुटुंबीयांना दावा मंजुरी पत्र व टोकन धनादेश प्रदान केला, तसेच कुटुंबीयांचे सांत्वन केले. यावेळी राहुल पाटील यांनी विद्यार्थ्यांना या योजनेचे महत्त्व, अपघात विम्याची गरज व विविध सुरक्षा योजनांबाबत मार्गदर्शन करुन जनजागृती केली. कार्यक्रमास शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे जनरल सेक्रेटरी पी. टी. पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय करंडे उपस्थित होते. विशेषतः कार्यालयीन अधीक्षक भाऊसाहेब पाटील यांनी आवश्यक कागदपत्रांची तत्पर पूर्तता करुन प्रक्रियेला गती दिली. विद्यार्थ्यांच्या कठीण प्रसंगी महाविद्यालयाने दाखविलेली संवेदनशीलता व जबाबदारीची भूमिका समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# पानगांवजवळ दुचाकी अपघातात एकाचा मृत्यू

## चालकाविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २५ मार्च-**

सोलापूर रोडवर पानगांव शिवारात दुचाकींच्या धडकेत एका व्यक्तीचा मृत्यू तर दुसरा जखमी झाल्याची दुर्दैवी घटना २३ मार्च रोजी रात्री घडली. याप्रकरणी संबंधित दुचाकी चालकाविरुद्ध तक्रार दाखल करण्यात आली आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, लखन बाबासाहेब कांबळे (वय ३४, रा. पानगाव) हे आपल्या मित्रासह मोटारसायकलवरुन खोमणे चहा कॅन्टीन येथे जात होते. रात्री सुमारे ७.४५ वाजता, त्यांनी आपली मोटारसायकल (क्रमांक चक-१३/एट-६९०६) रोडच्या कडेला उभी करुन खाली उतरत असताना बार्शीकडून भरधाव वेगात आलेल्या दुसऱ्या मोटारसायकलने त्यांच्या दुचाकीला बाजूने जोरदार धडक दिली. या अपघातात लखन कांबळे यांना डोके, मान व डाव्या डोळ्याजवळ दुखापत झाली, तर मागे बसलेले यशवंत बाळु घोडे (वय ३९, रा. पानगाव) गंभीर जखमी झाले. घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी यशवंत घोडे यांना तातडीने उपचारासाठी बार्शी येथील जगदाळे मामा हॉस्पिटल येथे दाखल केले. मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाल्याची माहिती मिळाली. धडक देणाऱ्या मोटारसायकलचा क्रमांक चक-१३/F-४७३९ असून ती मोटारसायकल चंद्रकांत पांडुरंग जाधव (रा. पानगाव) चालवत असल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. अपघातात दोन्ही दुचाकींचे नुकसान झाले आहे.

जखमी लखन कांबळे यांनी २४ मार्च रोजी जगदाळे मामा हॉस्पिटल येथे उपचारादरम्यान दिलेल्या जबाबात, संबंधित चालकाने निष्काळजीपणे व वेगात वाहन चालवल्यामुळे हा अपघात घडल्याचा आरोप केला आहे. या घटनेप्रकरणी मोटार सायकल क्रमांक चक-१३/F--४७३९ चा चालक चंद्रकांत पांडुरंग जाधव याच्याविरुद्ध पुढील कायदेशीर कारवाईसाठी तक्रार दाखल करण्यात आली असून तपास सुरु आहे.

# अवैध गॅस पुरवठा करणाऱ्या एजन्सीवर कारवाई करा

## जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांचे आदेश | जिल्ह्यात पेट्रोल, डिझेल व एलपीजीचा तुटवडा नाही | गॅस एजन्सीसमोर गर्दी न करता ऑनलाइन बुकिंग करण्याचे आवाहन






**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ मार्च-**

जिल्ह्यातील गॅस एजन्सी समोर गर्दी होऊ नये यासाठी प्रशासनाने २३ मार्च रोजी स्पष्ट आदेश दिले आहेत. तरी काही ठिकाणी गॅस एजन्सी समोर सिलेंडरसाठी लाईन व गर्दी होत असल्याचे दिसून आलेले आहे. तरी गॅस कंपन्यांनी गॅस एजन्सी समोर गर्दी होणार नाही, तेथून गॅस सिलेंडरचा पुरवठा होणार नाही त्याप्रमाणेच अवैध गॅस सिलेंडर विक्री होऊ नये, याबाबत सूचना द्याव्यात. अन्यथा प्रशासनाकडून अशा गॅस एजन्सीवर अत्यंत कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिला.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात गॅस पुरवठा करणाऱ्या कंपन्यांच्या प्रतिनिधी समवेत आयोजित बैठकीत जिल्हाधिकारी आशीर्वाद मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे, अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे, गॅस कंपनीचे जिल्हा समन्वयक रघुकुमार, बीपीसीएलचे वरिष्ठ अधिकारी प्रवीण यादव, एचपीसीएलचे सागर चव्हाण व आयओसीएलचे सागर गौतम उपस्थित होते. जिल्हाधिकारी आशीर्वाद पुढे म्हणाले की, गॅस कंपन्यांनी गर्दी होत असलेल्या एजन्सींची यादी प्रशासनाला द्यावी.

तसेच संबंधित गॅस एजन्सीच्या कर्मचाऱ्यांनी तेथे येणाऱ्या नागरिकांना गॅस सिलेंडर पुरवठ्याच्या अनुषंगाने अत्यंत सौजन्याने माहिती सांगावी. त्याप्रमाणेच ग्रामीण भागातील एजन्सी समोर गर्दी होत आहे का? या अनुषंगाने संबंधित सर्व तहसीलदार यांच्याकडून अहवाल मागविण्यात येत आहे. दोन्ही अहवालाची पडताळणी करून आवश्यक त्या गॅस एजन्सीला पोलीस संरक्षण देण्याबाबतची कार्यवाही केली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

### रोज जिल्हा पुरवठा विभागाला अपडेट द्या

सर्व गॅस कंपन्यांनी त्यांना वरिष्ठ स्तरावरून सोलापूर जिल्ह्यासाठी दैनंदिन किती प्रमाणात गॅस पुरवठा केला जात आहे तसेच त्याचे वितरण कशा पद्धतीने होत आहे याची माहिती दुसऱ्या दिवशी दुपारी बारा वाजेपर्यंत पुरवठा विभागाला सादर करावी, अशी सूचना जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिल्या. प्रशासन व सर्व गॅस कंपन्या यांच्यामध्ये समन्वय व संवाद असला पाहिजे. त्यामुळे नागरिकांना विहित पद्धतीने व वेळेत गॅस पुरवठा उपलब्ध करण्यात अडचण निर्माण होणार नाही असेही त्यांनी सांगितले.

### टंचाईच्या ठिकाणी गॅस पुरवठा वाढवा

गॅस कंपनीने दिलेल्या माहितीनुसार गॅस पुरवठा वितरण यामध्ये सुधारणा होत आहे. ऑनलाइन बुकिंग केल्यानंतर सरासरी साडेचार दिवसात घरपोच गॅस सिलेंडर पुरवठा केला जात आहे. तथापि ज्या ठिकाणी बुकिंग झाल्यानंतरही गॅस सिलेंडर मिळण्यास जास्त कालावधी लागत आहे त्या ठिकाणी जास्तीत जास्त गॅस पुरवठा करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी गॅस कंपन्यांना दिले आहेत.

### जिल्ह्यात पुरेशा प्रमाणात गॅस उपलब्ध

जिल्ह्यात गॅस उपलब्धता पुरेशा प्रमाणात आहे त्यामुळे नागरिकांनी घाबरून जाऊ नये. गॅस सिलेंडर साठी गॅस एजन्सी समोर गर्दी करू नये. गॅस एजन्सी येथून गॅस सिलेंडर मिळणार नाहीत. ऑनलाइन बुकिंग झाल्यानंतर विहित वेळेत आपल्याला घरपोच गॅस सिलेंडर पुरवठा होणार आहे, नागरिकांनी याची नोंद घ्यावी व प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले.

### जिल्ह्यात पेट्रोल, डिझेल व एलपीजीचा तुटवडा नाही

राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये नागरिकांकडून पेट्रोल व डिझेलच्या घाईघाईने खरेदीमुळे पेट्रोल पंपांवर लांबच लांब रांगा लागत असल्याचे राज्य प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे. मात्र, राज्यात पेट्रोल, डिझेल तसेच घरगुती एलपीजीचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. त्याप्रमाणे सोलापूर जिल्ह्यात ही पेट्रोल, डिझेल व घरगुती एलपीजीचा तुटवडा नाही. तरी जिल्ह्यातील नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये व घाईघाईने खरेदी करण्याची गरज नाही, अशी माहिती जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिली.



**परशुराम अवतार :** पूर्व विभाग श्रीराम मंदिराच्या वतीने श्रीराम नवमीनिमित्त बुधवारी प्रभु श्रीरामाचे सातवे परशुराम अवतार अलंकार करण्यात आले.

# सीना-माढा उपसा सिंचन योजना सुरुच राहणार : आ. अभिजित पाटील

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २५ मार्च-**

सध्या काही लोक अफवा पसरवून, शेतकऱ्यांना वेटीस धरत असल्याचे दिसत आहेत, भूलथापांना किंवा अफवांवर विश्वास ठेवू नये, शेतकऱ्यांपर्यंत टेल टू हेड पाणी पोचेपर्यंत आम्ही कटिबध्द असल्याचे आ.अभिजीत पाटील यांनी सांगितले.

माढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार अभिजीत पाटील यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांची विधानभवनात भेट घेऊन सीना-माढा उपसा सिंचन योजना बंद न करण्याबाबतचे पत्र दिले असता, योजनेवर मोठ्या प्रमाणावर पाणीपट्टी थकीत असली तरी हि योजना परिसरातील शेतकऱ्यांसाठी जीवनदायी ठरत असल्याचे सांगितले. या योजनेतून टेल टू हेड शेतकऱ्यांना पाणी मिळेपर्यंत सुरळीत चालणार असल्याची नोंद सर्व शेतकरी बांधवांनी घेण्याचे पाटील यांनी सांगितले.



# सदुभाऊ चौक आता वारकरी संस्कृतीच्या दर्शनाने उजळणार

## ● अकलूजच्या वैभवात भर

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २५ मार्च-**

स्वच्छता, संस्कृती आणि आधुनिक विकास यांचा त्रिवेणी संगम साधत अकलूज शहराच्या सौंदर्यीकरणात मानाचा तुरा रोवला गेला आहे. आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील व खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली, अकलूज नगरपरिषदेच्या माध्यमातून सदुभाऊ चौक येथे 'वारकरी पुतळ्याची' देखणी प्रतिकृती उभारण्यात आली आहे.

या उपक्रमामुळे परिसराचा कायापालट झाला असून, नागरिकांकडून कौतुक होत आहे. नगराध्यक्षा रेश्मा अडगळे आणि गटनेते तथा उपनगराध्यक्ष शिवतेजसिंह मोहिते-पाटील यांच्या संकल्पनेतून हा प्रकल्प साकार झाला आहे. ही प्रतिकृती केवळ सुशोभीकरणाचा भाग नसून, त्या माध्यमातून महाराष्ट्राच्या भक्ती मार्गाचा आणि वारकरी संप्रदायाचा गौरवशाली वारसा जपण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, या प्रकल्पामुळे परिसरात स्वच्छता आणि सामाजिक जनजागृतीचा संदेश दिला जात असून, येथील आकर्षक विद्युत रोषणाईने रात्रीच्या वेळी या चौकाचे सौंदर्य अधिकच विलोभनीय दिसत आहे. अकलूज शहराला आदर्श आणि सुंदर शहर बनवण्यासाठी नूतन नगराध्यक्ष व उपनगराध्यक्ष विशेष सक्रिय झाले आहेत. शहरातील विविध विकास कामांना गती देतानाच शहराचे बाह्यरूप पालटण्यावर त्यांचा भर आहे. या नियोजित विकासाचाच एक भाग म्हणून भविष्यात शहरातील प्रत्येक मुख्य चौकाचे सुशोभीकरण करून तेथे विविध ऐतिहासिक आणि सांस्कृतिक देखावे उभारले जाणार असल्याचे, शिवतेजसिंह मोहिते पाटील यांनी यावेळी स्पष्ट केले. या अभिनव उपक्रमामुळे अकलूजकर रहिवाशांमध्ये आनंदाचे वातावरण असून, शहराच्या विकासाची ही नवी दिशा भविष्यात अकलूजला एक पर्यटन आणि सांस्कृतिक केंद्र म्हणून नावलौकिक मिळवून देईल.





# पूर्व विभाग श्री राम मंदिरात जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते 'महाआरती'

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ मार्च-**

पूर्व भागातील श्रद्धास्थान असलेल्या श्री राम मंदिरात बुधवारी भक्तिमय वातावरणात महाआरतीचा सोहळा पार पडला. सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या हस्ते ही महाआरती करण्यात आली. प्रभू श्री रामाच्या जयघोषाने संपूर्ण मंदिर परिसर दुमदुमून गेला होता. याप्रसंगी उत्सव समितीच्या वतीने जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. प्रशासकीय जबाबदाऱ्या सांभाळतानाच सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सहभाग नोंदवल्याबद्दल समितीने त्यांचे आभार मानले.

यावेळी मंदिराचे विश्वस्त भूपती सि. सामलेटी, दयानंद ना. कोंडाबत्तीनी, गोवर्धन ना. चाटला, अध्यक्ष श्रीनिवास भू. सामलेटी, उपाध्यक्ष दत्ता कि. श्रीराम, सल्लागार रामदास म्हता, प्रसिद्धी प्रमुख श्रीनिवास अं. बिनगुंडी यांच्यासह पूर्व विभाग श्री राम मंदिराचे अन्य सर्व पदाधिकारी आणि भाविक उपस्थित होते. अतिशय शिस्तबद्ध वातावरणात हा सोहळा पार पडला.

# शहीदांच्या विचारांची ज्वाला पेटली

## सोलापुरात युवा महासंघाची आक्रमक मशाल रॅली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ मार्च-**

शहीद भगत सिंग सुखदेव राजगुरू यांच्या स्मृतीदिनानिमित्त भारताचा लोकशाहीवादी युवा महासंघ, जिल्हा समिती सोलापूरच्या वतीने क्रांतिकारी अभिवादन व आक्रमक मशाल रॅलीचे आयोजन करण्यात आले.

याप्रसंगी युवा महासंघाचे राज्य सचिव दत्ता चव्हाण यांनी सांगितले की, भगतसिंग यांचे साम्राज्यवाद विरोधी विचार हे केवळ ब्रिटिश सत्तेविरुद्ध नव्हते, तर शोषणमुक्त, समताधिष्ठित समाज उभारण्याचे व्यापक स्वप्न होते. आजच्या काळात युद्ध, आर्थिक विषमता आणि मानवी हक्कांवरील हल्ले वाढत असताना हे विचार अधिकच प्रासंगिक ठरत आहेत.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास अभिवादन करून करण्यात आली. जिल्हा अध्यक्ष विक्रम कलबुर्गी व सीटूचे नेते युसुफ शेख मेजर यांच्या हस्ते मशाल प्रज्वलित करण्यात आली. रॅली सरस्वती चौक, लकी चौक मार्गे चार हुतात्मा पुतळा येथे दाखल झाली. तेथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर व चार हुतात्मा यांना पुष्पहार अर्पण करून समारोप करण्यात आला.




युवकांना संबोधित करताना माजी आमदार कॉ. नरसय्या आडम मास्तर यांनी युवकांना संबोधित करताना आक्रमक भूमिका घेतली. त्यांनी सांगितले, भगतसिंग, सुखदेव, राजगुरू यांनी अन्यायाविरुद्ध लढा देत बलिदान दिले. आज त्या विचारांना केवळ स्मरण करून चालणार नाही, तर ते प्रत्यक्षात उतरवण्याची गरज आहे. ते पुढे म्हणाले, देशात वाढती बेरोजगारी, महागाई आणि सामाजिक विषमता ही गंभीर समस्या आहे. या विरोधात युवकांनी संघटित होऊन संघर्ष उभारला पाहिजे. अन्याय सहन करणे हा पर्याय नाही-तर त्याविरुद्ध उभे राहणे हीच खरी श्रद्धांजली ठरेल.

कार्यक्रमास अशोक बल्ला, विल्यम ससाणे, बापू साबळे, मुरलीधर सुंचु, विजय हरसुरे, बालकृष्ण मल्याळ, मधुकर चिल्लाळ, नरेश गुल्लापल्ली, किशोर झेंडेकर, दिनेश बडगु, बजरंग गायकवाड, बालाजी गुंडे, वीरेंद्र पद्मा, दीपक निकंबे, अभिजित निकंबे, अश्विनी मामाड्याल, आप्पाशा चांगले, राहुल बुगले, चंटी बिटला, बालाजी तुम्मा, शिवा श्रीराम आदींसह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.






**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## चन्नबसवेश्वर फार्मसी कॉलेजतर्फे स्वसंरक्षण प्रशिक्षण संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. २५ मार्च :** चन्नबसवेश्वर फार्मसी कॉलेज (डिग्री), लातूर यांच्यातर्फे पी. एम. श्री. सावित्रीबाई फुले म. न. पा. शाळा क्र. ९, लातूर येथे ''हर घर दुर्गा'' या स्वसंरक्षण जनजागृती व प्रशिक्षण कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये विशेषतः मुलींमध्ये, वैयक्तिक सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करणे आणि त्यांना मूलभूत स्वसंरक्षण कौशल्ये देणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

सदर शिबिरामध्ये प्रशिक्षित मार्गदर्शक मास्टर धनश्री मदने हिने स्वसंरक्षणाचे प्रात्यक्षिक दाखवून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवून विविध तंत्रे आत्मसात केली. हा कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि त्यांच्या सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरला. शाळा प्रशासनानेही या उपक्रमासाठी सहकार्य केले. सदर कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक श्री. एस. पी. शिंदे, प्रा. महेश मानके, डॉ. ऐश्वर्या इर्लापल्ले, शाळेचे सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

या उल्लेखनीय उपक्रमाबद्दल संस्थेचे सचिव श्री. भीमाशंकर देवणीकर, विश्वस्त श्री. विजयकुमार मठपती, श्री. अरुण हालकुडे, प्राचार्य डॉ. विजयेंद्र स्वामी, डॉ. अविनाश टेकाडे, डॉ. ओमप्रकाश भुसनुरे, डॉ. अनंत देशपांडे, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी कार्यक्रमाचे कौतुक करून या उपक्रमाचे मनापासून स्वागत केले.



# विविध वृत्त...

## चटकदार पदार्थांनी गजबजली 'आनंदनगरी'; हजारोंची उलाढाल

**लातूर:** दयानंद वाणिज्य महाविद्यालयात उत्कर्ष २०२६ वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या ''आनंदनगरी'' या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा आणि नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. विविध खाद्यपदार्थांच्या स्टॉल्समुळे परिसरात चविष्ट आणि उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले असून, या माध्यमातून विद्यार्थ्यांनी हजारो रुपयांची उलाढाल करत व्यवहारज्ञानाची प्रात्यक्षिक शिकवण घेतली. हा उपक्रम सोमवारी मोठ्या उत्साहात महाविद्यालय परिसरात पार पडला.

या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी पाणीपुरी, पावभाजी, दहीधपाटे, दहीवडा, आईसगोळा, मठ्ठा, शरबत, बासुंदी, कुल्फी यांसारख्या विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल उभारले होते. आकर्षक सादरीकरण, ग्राहकांशी संवाद आणि विक्री कौशल्य यामुळे प्रत्येक स्टॉलवर मोठी गर्दी पाहायला मिळाली. या उपक्रमाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर यांच्या हस्ते झाले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांच्या उपक्रमशीलतेचे कौतुक करत, अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना व्यावहारिक ज्ञान आणि आत्मविश्वास मिळतो, असे मत व्यक्त केले.

यावेळी प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर यांच्यासह उपप्राचार्य तथा विद्यार्थी परिषदेचे प्रमुख डॉ. गणेश लहाने, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बाळासाहेब चव्हाण, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. मनीषा आष्टेकर, बीसीए विभागप्रमुख डॉ. शशिकांत स्वामी, बीबीए विभागप्रमुख डॉ. वैशाली सातपुते, प्रा. ऋतुजा देशमुख, डॉ. सुभाष मोरे तसेच ''आनंदनगरी''चे प्रमुख डॉ. विशाल वर्मा यांची उपस्थिती होती. उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. विशाल वर्मा, डॉ. प्रिया वर्मा, प्रा. निकिता अग्रवाल, प्रा.अक्षय राजूरवार, प्रा.सोनाली सास्तुरकर, प्रा. रेणुका महाळंगीकर यांच्यासह प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## लातूर शहर महानगरपालिका विरोधी पक्ष नेते देविदास काळे यांचा सत्कार



**लातूर:** लातूर शहर महानगरपालिका, लातूरच्या विरोधी पक्षनेते देविदास काळे यांची नियुक्ती करण्यात आली आणि आज त्यांचा पदभार समारंभ पार पडला त्यानिमित्ताने त्यांचा अजिंक्य सिटी येथील कार्यालयात आज शाल आणि पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी माजी पोलीस इन्स्पेक्टर तथा वाकेथॉन विजेते पी.जी. लवटे, माजी शिक्षक बाबुराव बोबडे, प्रा.विश्र्वनाथ बोंडगे पाटील, पेन्शनर्स संघटनेचे जिल्हा सचिव माजी मुख्याध्यापक के.एस.मानकर, ज्येष्ठ नागरिक शिवाजी खसे, प्रबोधनकार प्रा.डी.डी.सूर्यवंशी, प्रा.डॉ. संजय गवई, सेवानिवृत्त प्राध्यापक मधुकरराव होनमाळे यांची उपस्थिती होती.

यावेळी लातूर शहर महानगरपालिका वार्ड क्र.०१मध्ये त्यांनी केलेल्या कार्याची माहिती सुद्धा देण्यात आली तसेच उर्वरित विकास कामे लवकरच पूर्ण केली जातील असे आश्र्वासन त्यांनी या प्रसंगी दिले.

यावेळी उपस्थित सर्वांनी मा.श्री.देविदास काळे यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या. त्यांनीही सर्वांचे आभार व्यक्त केले.

## लातूर ग्रामीण मधील कॉंग्रेस पदाधिकारी यांच्या निवडी जाहीर

**लातूर :** कॉंग्रेस पक्षाच्या संघटनात्मक बळकटीसाठी तसेच स्थानिक पातळीवर पक्षकार्य अधिक प्रभावी करण्याच्या दृष्टीने विविध पदांवर कॉंग्रेस पक्षाच्या वतीने माजी आमदार तथा लातूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांच्या सुचनेनुसार नव्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या आहेत.नुतन पदाधिकारी यांना कॉंग्रेस भवन येथे नियुक्ती पत्राचे वाटप करण्यात आले.

यामध्ये रेणापुर शहर कॉंग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी श्री. नितीन अनुरथ मोटेगावकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या सामाजिक व राजकीय कार्याचा विचार करून ही जबाबदारी सोपविण्यात आली आहे. तसेच रेणापुर शहर युवक कॉंग्रेसच्या अध्यक्षपदी श्री. रोहित गोविंद गिरी यांची निवड करण्यात आली असून, युवकांना पक्षाशी जोडण्याबरोबरच युवकांच्या प्रश्नांवर प्रभावीपणे काम करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे.

याचबरोबर मुरुड बु. शहर महिला कॉंग्रेसच्या अध्यक्षपदी सौ. सारिकाताई निलेश फेरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महिला सक्षमीकरण, महिलांचे प्रश्न आणि त्यांच्या हक्कांसाठी लढा देण्याच्या उद्देशाने ही निवड करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

# देविदास काळेंनी घेतला विरोधी पक्ष नेत्याचा पदभार

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. २५ मार्च :**
लातूर/प्रतिनिधी : भारतीय जनता पक्षाने लातूर शहर महानगरपालिकेच्या विरोधी पक्ष नेतेपदी देविदास काळे यांची नियुक्ती केल्यानंतर आज त्यांचा पदभार समारंभ भव्य रूपाने पार पडला. भाजपा प्रदेश उपाध्यक्षा डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर व भाजपा लातूर शहर अध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा समारंभ संपन्न झाला. या पदभार समारंभ प्रसंगी प्रशासनाच्या वतीने आयुक्त मानसी मीना यांनी देविदास काळे यांचा सत्कार केला व त्यांना शुभेच्छा दिल्या. विरोधी पक्षनेते देविदास काळे यांनीही डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, अजित पाटील कव्हेकर आणि आयुक्त मानसी मीना यांचा सत्कार केला.

विरोधी पक्षनेते देविदास काळे यांच्या सत्कार समारंभ प्रसंगी बोलताना भाजपा शहर अध्यक्ष अजित पाटील कव्हेकर म्हणाले, आज अतिशय महत्त्वाचा दिवस आहे. भाजपा पक्ष लोककल्याणासाठी केंद्रबिंदू म्हणून काम करते. मनपात आज लोककल्याणकारी कार्यालयाची सुरुवात झाली असून, या कार्यालयात सर्वसामान्य कार्यकर्त्यांची कामे होणार आहेत. त्यामुळे या विरोधी पक्ष नेते दालनाला 'कार्यकर्ता मंदिर' म्हणून



पाहिले पाहिजे. या कार्यकर्ता मंदिरातून प्रत्येक कार्यकर्त्यांना न्याय मिळेल आणि लातूरकरांनाही न्याय मिळवून देण्याचे काम इथून होणार आहे.

ते पुढे म्हणाले, सत्ताधाऱ्यांवर अंकुश ठेवण्याचे काम विरोधी पक्ष नेते देविदास काळे यांच्या माध्यमातून होणार आहे. भाजपचे प्रत्येक कार्यकर्ते या कार्यालयात भेट देऊन आपल्या प्रभागातील प्रश्र्न सोडवण्यासाठी प्रयत्न करावेत. आयुक्त मानसी मीना यांना उद्देशून त्यांनी विनंती केली की, भाजपा कार्यकर्ते आणि नगरसेवकांच्या कामांना प्राधान्य द्यावे, तसेच त्यांना न्यायिक भूमिका देण्याचे काम आपल्या माध्यमातून व्हावे कारण प्रशासनातील काही अधिकारी सत्ताधाऱ्यांच्या सांगण्यावरून काम करत असल्याचे निदर्शनास आले आहे. या प्रसंगी विरोधी पक्षनेत्यांना पुढील कामासाठी शुभेच्छा दिल्या.

त्यानंतर बोलताना भाजपा प्रदेश उपाध्यक्षा डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी आपल्या भाषणात सांगितले, आज महत्त्वाचा दिवस आहे. देविदास काळे यांच्या माध्यमातून लोककल्याणकारी कामे होतील. सत्ताधाऱ्यांची संख्या जास्त असली तरी त्यांच्यापेक्षा अधिक प्रभावी काम करून आपण लातूरकरांचे मन जिंकावे. विरोधी पक्षाचे दालन सर्वांसाठी खुले आहे आणि येथे २४ द ७ तास काम केले जाईल. त्यांनी हरलेल्या उमेदवारांना संबोधित करताना म्हटले, जे मनपा निवडणुकीत हारले त्यांना मी 'हारले' म्हणणार नाही, तर 'लढले' असे म्हणेन. त्यांनीही आपल्या प्रभागातील नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी विरोधी पक्ष नेत्याशी संपर्क साधावा. आपल्या कामातून सत्ताधाऱ्यांची मक्तेदारी तोडावी.

ते पुढे म्हणाल्या, राज्यात आणि केंद्रात भाजपाचे सरकार असल्याने शहराच्या विकासासाठी जास्तीत जास्त निधी आणण्याचा प्रयत्न केला जाईल. सत्ताधाऱ्यांची कामे शहराच्या विकासाला खीळ घालणारी आहेत, हे जिल्हा नियोजन समितीच्या कामांना स्थगिती देऊन दाखवले आहे. येणाऱ्या काळात सत्ताधाऱ्यांना सळो की पळो करावे लागेल. कार्यकर्त्यांना संबोधित करताना त्यांनी विश्र्वास दिला की, प्रभागातील प्रश्र्न सोडवण्यासाठी अग्रेसर राहा, अडचण आली तर आम्ही तुमच्यासोबत आहोत.

देविदास काळे यांचे आक्रमक आश्वासन

पदभार स्वीकारताना आणि सत्काराला उत्तर देताना देविदास काळे म्हणाले, येणाऱ्या काळात सभागृहात आणि सभागृहाच्या बाहेर लातूरकरांच्या प्रश्र्नांसाठी भाजपा आक्रमकपणे काम करणार आहे. साडेतीन वर्षांच्या प्रशासकीय काळातून प्रशासन बाहेर आले नाही, त्यांनाही जाब विचारला जाईल. पालिकेला आर्थिक शिस्त लावणे, कर्मचाऱ्यांच्या पगार वेळेवर होणे याकडे लक्ष दिले जाईल.

ते पुढे म्हणाले, लातूरकरांनी आम्हाला विरोधात बसवले तरी सत्ताधाऱ्यांकडून योग्य काम करून घेण्याची भूमिका आमची राहणार आहे. मनपा कार्यालयात येणाऱ्या सर्वसामान्य लातूरकरांना कोणतीही अडचण येणार नाही, यासाठी भाजपा अग्रेसर राहील. शहरातील कचरा, स्वच्छता, दिवाबत्ती, पाणीपुरवठा, ट्राफिक यासारख्या मूलभूत प्रश्र्नांवर जातीने लक्ष देऊन ते सोडवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. विकास कामे वेळेत आणि दर्जेदार होण्यासाठी सत्ताधाऱ्यांना जाब विचारला जाईल.

देविदास काळे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री शिवेंद्रराजे भोसले, माजी पालकमंत्री आमदार संभाजी पाटील निलंगेकर, आमदार अभिमन्यू पवार, आमदार रमेश कराड यांचे आभार मानले आणि पक्षाने दिलेल्या संधीचे सोने करण्याची ग्वाही दिली. पक्षातील सर्व सदस्यांना सोबत घेऊन काम केले जाईल, असेही त्यांनी सांगितले.

समारंभात उपस्थित राहिल्याबद्दल डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर व शहराध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांचे आभार मानले. या प्रसंगी भाजपाच्या अनेक नगरसेवकांनी कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांनी देविदास काळे यांना शुभेच्छा दिल्या. हा पदभार समारंभ भाजपासाठी नव्या उर्जेचा प्रारंभ मानला जात आहे. या पदभार समारंभास प्रविण कस्तुरे, उध्दव तेलंग, ऋषी राजे, भीमाशंकर बेंबळकर, ड. प्रदीप मोरे, करुणा शिंदे, स्वाती घोरपडे, राजश्री बाहेती, संजय गीर, पुनित पाटील यासह अनेक नगरसेवक व कार्यकर्ते उपस्थित होते.

## आज रामेश्वर येथे प्रभू श्रीराम जन्मसोहळा आणि श्रीराम रथ उत्सवाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. २५ मार्च :** भारतीय संस्कृती, परंपरा, तत्त्वज्ञान, त्याग आणि समर्पणाचे मूर्तीमंत प्रतीक, समस्त भारतीयांचे श्रध्दास्थान असलेल्या मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीराम जन्मसोहळ्याच्या निमित्ताने सर्वधर्मसमभावाचे प्रतीक असलेले भारतीय संस्कृती दर्शन 'श्रीराम' रथ यात्रा उत्सव आणि ह.भ.प. हरिहर महाराज दिवेगावकर यांचा कीर्तन सोहळा लातूर तालुक्यातील मौजे रामेश्र्वर (रूई) येथे २६ मार्च २०२६ गुरुवार रोजी आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यास रामेश्र्वर आणि पंचक्रोशीतील भाविक भक्त नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी असे आवाहन संयोजकाच्या वतीने करण्यात आले आहे.

पूर्णब्रह्मयोगिनी त्यागमूर्ती श्रीमती प्रयागअक्का दादाराव कराड यांनी मानवता तीर्थ मौजे रामेश्र्वर (रूई) येथील श्रीराम मंदिरास अर्पण केलेल्या सुंदर, रेखीव व वैशिष्ट्यपूर्ण अशा भारतीय संस्कृती दर्शन- श्रीराम रथाची २६ मार्च २०२६ गुरुवार रोजी सकाळी ८ वाजता संपूर्ण भारतीयांचे श्रध्दास्थान असलेल्या मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीराम जन्मसोहळ्याच्या निमित्ताने रामेश्र्वर गावात ग्रामप्रदक्षिणा रथयात्रा उत्सव आयोजित करण्यात आला असून या रथ यात्रेनंतर ह.भ.प. हरिहर महाराज दिवेगावकर यांचे कीर्तन होऊन महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे.

प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी प्रभू श्रीराम जयंती सोहळ्यानिमित्ताने श्री राम रथ उत्सवाची जय्यत तयारी करण्यात आली आहे. या रथयात्रेत वाजंत्रीसह विविध भजनी मंडळी, टाळकरी, असंख्य भाविक भक्त सहभागी होणार आहेत. रामेश्र्वर आणि पंचक्रोशीतील भाविक भक्त नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन संयोजकाच्या वतीने करण्यात आले आहे.

## 'जिल्हा युवा पुरस्कार २०२५-२६' करिता अर्ज सादर करण्याचे आवाहन- १० एप्रिलपर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** राज्याचे युवा धोरण २०१२ अंतर्गत शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्यावतीने शासन निर्णय १२ नोव्हेंबर, २०१३ अन्वये जिल्ह्यात कार्यरत असलेल्या युवक, युवतींना व नोंदणीकृत संस्थांनी केलेल्या समाजहिताच्या कार्याचा गौरव व्हावा आणि युवा विकासाचे कार्य करण्यासाठी त्यांना प्रोत्साहन मिळावे, यासाठी जिल्हास्तरावर जिल्हा युवा पुरस्कार दरवर्षी दिला जातो. युवक, युवतीसाठी पुरस्काराचे स्वरुप गौरव पत्र, सन्मानचिन्ह, रोख पुरस्कार रुपये १० हजार व संस्थेसाठी गौरवपत्र, सन्मानचिन्ह, रोख पुरस्कार रुपये ५० हजार असे आहे. यासाठी जिल्ह्यातील युवक, युवती तसेच नोंदणीकृत संस्थांकडून जिल्हा युवा पुरस्कार २०२५-२६ वर्षाच्या युवा पुरस्कारासाठी अर्ज मागविण्यात येत असून अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत १० एप्रिल २०२६ अशी आहे. यासाठीचे अर्ज जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातून प्राप्त करुन घ्यावेत व अधिक माहितीसाठी जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालयात क्रीडाधिकारी बाबासाहेब इंगोले यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन लातूर येथील जिल्हा क्रिडा अधिकारी महादेव कसगावडे यांनी केले आहे.


**जाहीर प्रगटन** दै. तरुण भारत

लातूर जिल्हा परिसरातील तमाम जनतेस या जाहिर प्रगटना द्वारे सुचीत करण्यात येते की, माझे पक्षकार **शंकर रामसिंह राजपुत, रा.हरंगुळ (बु.), ता.जि.लातूर** यांनी मला दिलेल्या माहिती व कागदपत्रावरुन व वकिल म्हणून अधिकृत केले वरुन सर्व जनतेस खालील प्रमाणे जाहीर प्रगटन देत आहे.

माझे पक्षकार यांना **गोविंद देवराव जाधव, रा.मुबारकपुर, ता.निलंगा जि.लातूर** यांनी खरेदीखत दस्त डे.बु.नं लतर - १ - ८७२१/२०१२, दि.०४/०७/२०१२ ईसवी अन्वये खरेदी मालकीचा व कब्जेवहिवाटीचा प्लॉट मौजे. मुरुड अकोला, ता.जि.लातूर येथील जमीन गट नंबर १२२ पैकीचा खुला प्लॉट याचा एन.ए झालेला एन.ए नंबर २०११/जेएमबी/लातूर/सीआर -२०२, दि.१३/०३/२०१२ ईसवी अन्वये मे.सबडिव्हीजनल ऑफिस, लातूर यांनी मंजूर केलेला याचा लेआऊट नंबर एलटीआर/एनए/जी/एस/स.नं.११८,११९,१२०,१२२/लातूर/एनआरएल -२८३, दि.०७/०३/२०१२ ईसवी अन्वये मे. नगर रचनाकार, लातूर यांनी मंजूर केलेल्या पैकीचा प्लॉट नंबर १२२ पुर्ण असून याची लांबी पुर्व - पश्चिम द.बा. १३.४१ मी. व उ.बा. १३.१३ मी. आणि रुंदी दक्षिण - उत्तर पु.बा. ९.५७ मी. व प.बा. ८.५० मी असून याचे एकूण क्षेत्रफळ ११९.८३ चौ.मी. (१२८९.३७ चौ.फुट) आहे. याची चतुः सीमा खालीलप्रमाणे :-

पुर्वेस - ६ मीटर रुंदीचा रस्ता, पश्चिमेस - सदर गटातील जमीन, दक्षिणेस - सदर गटातील जमीन, उत्तरेस - प्लॉट नंबर १२३.

येणे प्रमाणे वरील चतु:सीमेच्या आतील मिळकत विद्यमान मालकाकडुन **लेखी** करार करुन घेऊण,इस्सारापोटी काही रक्कम माझे पक्षकाराकडुन स्विकारुन सदरची मिळकत ही निर्विवाद व निर्जोखीम असल्याची हमी माझे पक्षकारास दिली आहे. तरी सदर मिळकती बाबत जर कोणाचा उजर,आक्षेप,हितसंबंध,हक्कसंबंध,कर्जबोजा,गहाणखत,बक्षीसपत्र,कोर्टडिग्री,मृत्युपत्र,तारण,लीज, शेजाऱ्याचा वाद,शासकिय अथवा निमशासकिय कर्ज, न्यायालयीन वाद असतील तर त्यांनी सदरचे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून **सात ( ०७ )** दिवसाच्या आत माझे खालील कार्यालयीन पत्यावर योग्य त्या कागदपत्रांसह लेखी उजर / आक्षेप नोंदवावा मुदतीत जर कोणाचा उजर/आक्षेप नाही आल्यास सदरची मिळकत ही निर्विवाद व निर्जोखीम आहे असे गृहीत धरुन माझे पक्षकार सदर मिळकतीचे नोंदणीकृत खरेदीखत मूळ मालकाकडून आपल्या हक्कात करुन घेतील व त्यानंतर येणारे आक्षेप माझे पक्षकारावर बंधणकारक राहणार नाहीत याची सर्व जनतेने नोंद घ्यावी.

दिनांक — २४/०३/२०२६

तर्फे ॲड.अशोक ज्ञा.लोखंडे
नोटरी भारत सरकार.
शाहू चौक,लातूर
मो नं.९४२१९ ८६४९५

जाहीर प्रगटन देणार
**शंकर रामसिंह राजपुत**
**रा.हरंगुळ (बु.), ता.जि.लातूर**
मो. नं.९८९२७ ६१०२३


# महावितरणकडून वीजबिल वसुली मोहिम अधिक आक्रमक

## – २४९७ वीजग्राहकांचा वीजपुरवठा खंडीत – सहा दिवसात साडेदहा कोटी वसुलीचे आव्हान

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. २५ मार्च :** जिल्ह्यातील लघूदाब वर्गवारीतील घरगुती, व्यावसायिक व औद्योगिक वीजग्राहकांसह इतर वर्गवारीतील वीज ग्राहकांकडे थकीत ३६ कोटी ३० लाख व चालू महिन्याचे ५८ कोटी १६ लाख अशा एकत्रीत ९४ कोटी ४६ लाख रुपयांच्या वीजबिल वसुलीसाठी महावितरणने वसुली मोहीम मार्च अखेरीस अधिक आक्रमक केली आहे. थकबाकीदार वीजग्राहक रडारवर असून वारंवार सुचना देवूनही दाद न देणाऱ्या ग्राहकांचा वीजपुरवठा थेट मीटर काढून खंडित करण्याची कारवाई करण्यात येत आहे. वीज खंडित केल्यानंतर कुणी परस्पर जोडल्यास महावितरणतर्फे थेट पोलिसांत गुन्हा दाखल करण्याचा इशारा देण्यात आला आहे. ग्राहकांनी चालू बिलासह थकबाकी भरून सहकार्य करावे आणि वीजपुरवठा खंडीत करण्याची कटू कारवाई टाळावी असे आवाहन महावितरणने केले आहे.

जिल्ह्यात घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक व इतर वर्गवारीतील वीज ग्राहकांकडे आज रोजी ९४ कोटी ४६ लाख रुपयांची वीजबिल थकबाकी आहे. वसुलीसाठी संपूर्ण जिल्ह्यात महावितरणचे सर्व अभियंते, अधिकारी, कर्मचारी भर उन्हात दारोदार फीरत आहेत. अनेक ग्राहक तातडीने बिल भरून सहकार्य करत आहेत. मात्र जे ग्राहक बिल भरण्यास प्रतिसाद देत नाहीत, त्यांचा वीजपुरवठा नाईलाजास्तव खंडित करण्यात येत आहे. काल पर्यंत २ हजार ४९७ वीजपुरवठा तात्पुरत्या स्वरूपात खंडीत करण्यात आला आहे. त्याचबरोबर स्मार्ट मीटर असलेल्या ग्राहकांचा वीजपुरवठा ऑटो डिस्कनेक्ट होत आहे. नॉन स्मार्ट मीटर असेल, तर ते थेट काढून आणले जात आहे. थकबाकी भरल्यावरच नवीन स्मार्ट मीटरने वीजपुरवठा जोडण्यात येत आहे. गेल्या चोवीस दिवसात लातूर मंडळातील थकबाकीदार ग्राहकांनी ४७ कोटी ७३ लाख रूपयांच्या बिलांचा भरणा केला आहे. हे प्रमाण चालू बिलाच्या केवळ ८२ टक्केच असून मागील थकबाकीला स्पर्शही झालेला नाही. यामधे निलंगा विभागाची मागील थकबाकी ४ कोटी ८५ लाख असून चालू महिन्याचे ९ कोटी ४८ लाख वसुल करावयाचे आहेत. यापैकी केवळ ८ कोटी २७ लाख वसूल झाले आहेत. तर उदगीर विभागातील ग्राहकांकडे १७ कोटी २३ लाख थकबाकी असून चालू महिन्याचे १५ कोटी ९० लाख वसूल करण्याचे आव्हान आहे. काल पर्यंत यापैकी केवळ १३ कोटी २८ लाख वसूल करण्यात यश मिळाले आहे. त्याचबरोबर लातूर विभागातील ग्राहकांकडे १४ कोटी २१ लाख थकबाकी असून चालू महिन्याचे




३२ कोटी ७८ लाख वसूल करण्याचे आव्हान आहे. काल पर्यंत यापैकी केवळ २६ कोटी १८ लाख वसूल करण्यात आले आहेत. वीजबील वसुलीसाठी विभागीय कर्मचाऱ्यांसोबतच लातूर परिमंडल कार्यालयाचे वरिष्ठ अधिकारीही थकबाकीदारांचे दार ठोठावत आहेत. सुट्टीच्या दिवशीही ही मोहीम सुरू आहे. जिल्ह्यातील सर्व ग्राहकांनी थकबाकी व चालू वीजबिले भरून सहकार्य करावे व संभाव्य गैरसोय टाळावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

महावितरणच्या लातूर परिमंडलाचे मुख्य अभियंता अरविंद बुलबुले हे सातत्याने वसुलीवर लक्ष ठेवून आहेत. जास्त थकबाकी असलेल्या व वसुली कमी असलेल्या उपविभागाला प्रत्यक्ष भेट देऊन वसुलीचा आढावा घेत आहेत. यावेळी अधीक्षक अभियंता प्रशांत दाणी हे सुध्दा वारंवार बैठका घेवून व प्रत्यक्ष उपविभागीय क्षेत्रात वसुलीसाठी फीरत आहेत. निलंगा विभागाचे कार्यकारी अभियंता नागेश देशमूख, उदगीर विभागाचे कार्यकारी अभियंता रविंद्र महाव्दार तसेच लातूर विभागाचे कार्यकारी अभियंता अनिरूध्द घाटगे यांच्यासह तांत्रिक कर्मचारी, लेखा विभाग व मानव संसाधन विभागाचे अधिकारी कर्मचारी वसुलीसाठी फीरत आहेत. मार्च अखेरीस केवळ सहा दिवस राहिल्याने युद्धपातळीवर वसुलीचे काम करा, अशा सूचना मुख्य अभियंता अरविंद बुलबुले यांनी दिल्या आहेत.

वीजबील भरण्यासाठी विविध पर्याय उपलब्ध असून सर्व वीजग्राहकांनी तातडीने थकीत वीजबिल भरणे गरजेचे आहे. अन्यथा महावितरणला वीजपुरवठा खंडित करण्याशिवाय कोणताही पर्याय नाही. सर्वांनी थकीत वीजबिल भरून महावितरणला सहकार्य करावे

**–अरविंद बुलबुले,**
**मुख्य अभियंता**
**लातूर परिमंडल**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## संक्षिप्त...

### वलांडीत नूतन जिल्हा परिषद अध्यक्षांचा सत्कार



**वलांडी :** देवणी तालुक्यातील वलांडी येथे नूतन जिल्हा परिषद अध्यक्ष वलांडीची लेक उषाताई संभाजी पाटील यांचा नुकताच वलांडी येथे येथील सामाजिक कार्यकर्ते रियाज मोमीन यांच्या घरी सत्कार करण्यात आला. याप्रसंगी निलंगा तालुक्यात सहाय्यक कृषी अधिकारी के एम शेख, देवणी पंचायत समितीचे उपसभापती बाळासाहेब पाटील, जि प सदस्य रामलिंग शेरे, माजी सभापती तुकाराम पाटील, हरी पाटील तानाजी पाटील सुधीर भोसले ,प्रशांत पाटील, अरुण पाटील, सुशांत साबणे, धनाजी पाटील वसंत जगताप दिनेश पाटील भालचंद्र भंडारे, हसन शेख, आकाश डोंगरे, मन्नान शेख, निलेश गायकवाड, दाऊद तांबोळी यांच्यासह महिलांची उपस्थिती होती..

### विविध क्षेत्रातील महिलांचा जिजाऊ ब्रिगेड कडून नारीरत्न पुरस्काराने सन्मान

**लातूर :** शहरातील जिजाऊ ब्रिगेड, लातूर पूर्व यांच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त नारीरत्न पुरस्कार सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या २५ महिलांना नारीरत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. अध्यक्षस्थानी विलासराव देशमुख फाउंडेशनच्या संचालिका संगीता मिळवणे होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून मराठा सेवा संघाचे प्रदेश उपाध्यक्ष वैभव तळेकर, सहायक पोलिस निरीक्षक सोनाली केंद्रे, जिल्हा परिषदेच्या सदस्य सोनाली थोरमोटे, जिजाऊ ब्रिगेडच्या सहसचिव वनिता काळे, शोभा पाटील आदी मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी महिलांच्या सध्याच्या सामाजिक स्थितीवर सखोल चर्चा झाली. महिलांनी भोंदूगिरीपासून दूर राहून शिक्षण, स्वावलंबन व कुटुंबाच्या उन्नतीवर भर द्यावा, असा संदेश वक्त्यांनी दिला. या सोहळ्यात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या २५ कर्तृत्ववान महिलांचा सन्मान केला. तसेच जिजाऊ ब्रिगेडच्या १७ नवीन पदाधिकाऱ्यांना पदनियुक्ती दिली.सोनाली मिर्चे आणि लायन्स क्लबच्या विद्या देशमुख यांची उपस्थिती होती. प्रमुख वक्त्या म्हणून रंजना हसुरे, विभागीय अध्यक्ष रंजना चव्हाण व जिजाऊ ब्रिगेडच्या पूर्व भागाच्या अध्यक्ष, लातूर शहरातील जिजाऊ ब्रिगेडच्या (पूर्व भाग) वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या २५ महिलांना नारीरत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यावेळी अर्चना तळेकर-पाटील यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ व क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहारअर्पण करून करण्यात आली. त्यानंतर मीराताई देशमुख यांनी जिजाऊ वंदना सादर केली. उपस्थित मान्यवरांचा तुतारीच्या सुरात हार, शाल व ट्रॉफी देऊनसन्मान करण्यात आला. आभार प्रदर्शन मंदाकिनी भालके यांनी केले. यावेळी जिजाऊ ब्रिगेडचे पदाधिकारी, मराठा सेवा संघाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

### मार्च अखेर कराचा भरणा केला तर १००% दंड माफ; औसा शहरातील नागरिकांना दिलासा

औसा : औसा शहरातील नागरिकांसाठी दिलासादायक निर्णय घेत मुळ कराचा भरणा ३१ मार्च पर्यंत केला तर राज्य सरकारने थकीत मालमत्ता करावरील १०० टक्के दंड माफ करण्यास मंजुरी दिली आहे. आमदार अभिमन्यू पवार यांनी या प्रकरणी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश मिळाले आहे.यामुळे नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण पसरले आहे.



नगर विकास विभागाने दि. १९ मे २०२५ रोजी जाहीर केलेल्या शासन निर्णयानुसार नगरपरिषद व नगरपंचायत क्षेत्रात मालमत्ता करावरील शास्ती माफीसाठी 'अभय योजना' लागू करण्यात आली आहे. त्यानुसार औसा नगरपरिषदेकडून सादर करण्यात आलेल्या प्रस्तावाला शासनाने मंजुरी दिली आहे. या योजनेअंतर्गत औसा नगरपरिषद क्षेत्रातील १९ मे २०२५ पर्यंतच्या थकीत मालमत्ता करावरील संपूर्ण शास्ती माफ करण्यात येणार आहे. मात्र, मूळ कर रक्कम भरावी लागणार असून त्यावर कोणतीही सवलत लागू राहणार नाही.

नागरिकांनी थकीत मालमत्ता कराची पूर्ण रक्कम दि. ३१ मार्च २०२६ पर्यंत भरल्यासच त्यांना १००% शास्ती माफीचा लाभ मिळणार आहे. त्यामुळे नागरिकांनी या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या निर्णयानुसार जिल्हाधिकारी, लातूर यांनी उर्वरित कर वसुली १००% होईल याची दक्षता घ्यायची आहे तसेच नगरपरिषदेच्या मालमत्ता कराचे पुनर्मूल्यांकन वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या आयुक्तांनी या योजनेचा आढावा घेऊन तिच्या अंमलबजावणीचा अहवाल शासनाकडे सादर करणे आवश्यक आहे. अभय योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधित मालमत्ताधारकांनी औसा नगरपरिषदेकडे अर्ज करणे आवश्यक आहे व या योजनेची अंमलबजावणी करण्याचे अधिकार मुख्याधिकारी, औसा नगरपरिषद यांना देण्यात आले आहेत.

शासनाने स्पष्ट केले आहे की भविष्यात अशा प्रकारची कोणतीही करसवलत दिली जाणार नाही, त्यामुळे नागरिकांनी ही संधी शेवटची समजून लाभ घ्यावा. या निर्णयामुळे औसा शहरातील नागरिकांना मोठा आर्थिक दिलासा मिळाला असून अनेकांकडून आमदार अभिमन्यू पवार यांच्या प्रयत्नांचे कौतुक करण्यात येत आहे.

# होनाळी येथे पोटहिस्सा मोजणी पथदर्शी प्रकल्पाचा शुभारंभ

## प्रशासनाला सहकार्य करण्याचे आव्हान जि पं सदस्य औदुंबर पांचाळ यांनी केले

**तभा वृत्तसेवा**

**देवणी, दि. २५ मार्च :** ग्रामीण भागातील शेतजमिनींची पोटहिस्सा मोजणी करून नकाशे, सातबारा व अधिकार अभिलेख अद्ययावत करण्याच्या उद्देशाने लातूर जिल्ह्यातील देवणी तालुक्यातील होनाळी येथे एक महत्त्वाचा पथदर्शी प्रकल्प सुरू करण्यात आला आहे.

या प्रकल्पाच्या नियोजन व जनजागृतीसाठी आज ग्रामपंचायत होनाळी येथे तालुकास्तरीय समितीची विशेष सभा आयोजित करण्यात आली होती. ही सभा निलंगा येथील उपविभागीय अधिकारी शरद झाडके यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.



यावेळी जिल्हा परिषद सदस्य औदुंबर रामदास पांचाळ (होनाळीकर) तसेच जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, लातूर, श्रीमती पटेल यांची प्रमुख उपस्थिती होती. समितीचे सदस्य म्हणून देवणी तालुक्याचे तहसीलदार सोमनाथ वाडकर तसेच संबंधित भूमि अभिलेख कार्यालयाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. गावातील सरपंच, ग्रामपंचायत सदस्य व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सभेत मार्गदर्शन करताना श्रीमती पटेल यांनी सांगितले की, पोटहिस्सा मोजणीमुळे शेतजमिनींचे अचूक विभाजन होऊन शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा कायदेशीर हिस्सा स्पष्टपणे समजेल. तर अध्यक्षीय भाषणात झाडके यांनी प्रकल्पाच्या प्रशासकीय प्रक्रियेबाबत सविस्तर माहिती दिली.

या प्रकल्पाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी गावकरी व शेतकरी बांधवांनी प्रशासनाला पूर्ण सहकार्य करावे, असे आवाहन श्रीमती पटेल यांनी केले.

या सभेमुळे होनाळी परिसरातील शेतकऱ्यांमध्ये सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून महसूल विभागाच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे

## अहमदपूर चाकूर तालुक्याच्या स्मशानभूमी विकासासाठी २ कोटी ६० लाख रुपयांचा निधी मंजूर

### सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांच्या पुढाकारातून

**तभा वृत्तसेवा**

**चाकूर, दि. २५ मार्च :** महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून अहमदपूर आणि चाकूर विधानसभा मतदारसंघातील २४ ते २५ गावांना तेथील स्मशानभूमीच्या संरक्षणभिंत ,शेड बांधकाम किंवा अन्य सुशोभिकरणासाठी २ कोटी कोटी ६० लाख रुपये मंजूर करण्यात आले असून लवकरच या कामाच्या प्रशासकीय, तांत्रिक मान्यता होऊन कार्यारंभ आदेश प्राप्त होऊन लवकरच या कामांना गती मिळणार आहे अशी माहिती सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांच्या कार्यालयातून देण्यात आली आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की,अहमदपूर आणि चाकूर तालुक्यात विविध स्मशान भूमीसाठी निधी मिळावा यासाठी सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करून अहमदपूर आणि चाकूर तालुक्यातील जवळपास २४ ते २५ गावांना २ कोटी ६० लाख रुपयांचा निधी मंजूर केला असून यामध्ये अहमदपूर तालुक्यातील आनंदवाडीतांडा , वळसंगी, सताळा, शिरूर ताजबंद, तेलगाव, बेंबडेवाडी, अंधोरी, काळेगाव, उमरगा कोर्ट, शिवनखेड खुर्द, कुमठा, किनगाव तसेच चाकूर तालुक्यातील बनसावरगाव, कबनसांगवी, चापोली, रोहिणा, आष्टा,बोथी,शिरनाळ, अंबुलगा, नागेशवाडी, गांजुरवाडी, जानवळ, हिपळनेर, अजनसोंडा, गावात प्रत्येकी दहा लक्ष रुपयाचा निधी स्मशानभूमी संरक्षण भिंत शेड बांधकाम व सुशोभीकरणासाठी मंजूर करण्यात आला आहे.

चाकूर आणि अहमदपूर तालुक्यातील स्मशानभूमीसाठी हा निधी मंजूर केल्याबद्दल महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले यांचे आभार मानले आहेत.



अहमदपूर आणि चाकूर विधानसभा मतदारसंघातील स्मशानभूमीसाठी निधी देणे गरजेचे होते. यासाठी पालकमंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले यांच्याशी सातत्याने पाठवापुरावा करून अहमदपूर आणि चाकूर विधानसभा मतदारसंघासाठी तबल २ कोटी ६० लक्ष रुपयाच्या स्मशानभूमी विकासासाठी निधी मंजूर केला असून लवकरच ही कामे मार्गी लागणार आहेत. निधी मंजूर केल्याबद्दलया बद्दल शिवेंद्रसिंह राजे भोसले यांचे मनस्वी आभार

**-ना. बाबासाहेब पाटील**
**सहकार मंत्री महाराष्ट्र राज्य-**

## ग्रामीण आरोग्य सेवेत मोलाचा वाटा; डॉ. शृंगारे, डॉ. कुटलकर यांना जीवन गौरव पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा**

**वलांडी, दि. २५ मार्च :** देवणी तालुक्यातील वलांडी येथे वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय व निःस्वार्थ सेवा देणारे येलमवाडी येथील डॉ. देविदास नागोबा शृंगारे तसेच डॉ. प्रियंका कुटलकर यांना 'नेताजी सुभाषचंद्र बोस जीवन गौरव पुरस्कार' जाहीर करण्यात आला आहे. ग्रामीण भागातील रुग्णांसाठी त्यांनी केलेल्या सातत्यपूर्ण सेवेमुळे त्यांच्या कार्याची दखल घेत हा सन्मान जाहीर करण्यात आला आहे.



कर्नाटक सीमाभागातील येलमवाडी येथील मूळ रहिवासी असलेले डॉ. देविदास शृंगारे हे गेल्या पाच ते सहा वर्षांपासून वलांडी येथील चेतन हॉस्पिटलमध्ये कार्यरत असून, त्यांनी आपल्या कुशल वैद्यकीय सेवेच्या जोरावर अनेक रुग्णांना नवजीवन दिले आहे. त्यांच्या सेवाभावी वृत्तीमुळे ते परिसरात विश्र्वासार्ह डॉक्टर म्हणून ओळखले जातात.

त्याचप्रमाणे, त्यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेल्या डॉ. प्रियंका कुटलकर या देखील सहाय्यक म्हणून कार्य पाहत असून, त्या २४ तास तत्परतेने विविध आजारांवर उपचार करून ग्रामीण रुग्णांची सेवा करत आहेत. त्यांच्या कार्यतत्परतेमुळे अनेक गरजू रुग्णांना वेळेवर व योग्य उपचार मिळत आहेत.

सामाजिक बांधिलकी जपत विविध क्षेत्रातील गुणवंत व्यक्तींना प्रोत्साहन देण्याचे कार्य 'महाराष्ट्र पोलीस मित्र सोशल असोसिएशन' ही संस्था करत असून, डॉक्टर, वकील, पत्रकार, समाजसेवक, शिक्षक, अभियंते तसेच इतर क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना दरवर्षी या पुरस्काराने सन्मानित केले जाते.

दरम्यान, दिनांक २१ मार्च २०२६ रोजी लातूर येथे आयोजित भव्य समारंभात मान्यवरांच्या हस्ते डॉ. देविदास शृंगारे व डॉ. प्रियंका कुटलकर यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## रेणापूर शहरात क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत रॅली सपन्न




**तभा वृत्तसेवा**

**रेणापूर दि. २५ मार्च :** ग्रामीण रुग्णालय,आरोग्य विभाग पंचायत समिती रेणापूर व श्रीराम विद्यालय रेणापूर यांच्या वतीने अधिक्षक डॉ. अनिता अलगुले, तालूका वैद्यकीय अधिकारी डॉ श्रीधर रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली रेणापूर शहरात क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत आज दिनांक २४ मार्च रोजी जागतिक क्षयरोग दिनानिमित्त जनजागृती रॅली काढण्यात आली .रेणापूर शहरांमधून विद्यार्थ्यांनी क्षयरोगाबाबत विविध घोषणा देत जनजागृती केली. शाळेमध्ये शेवटी कार्यक्रमाने समारोप करण्यात आला. याप्रसंगी अध्यक्ष म्हणून प्राचार्य सिद्धेश्र्वर मामडगे श्रीराम प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सतीश मोरे पर्यवेक्षक अनिल कुटवाड प्राध्यापक जुबेर खान पठाण क्रीडा विभाग प्रमुख विभाग विवेक भातीकरे,शिवाजी तोकले संगीत विभाग प्रमुख महादेव बन प्रशांत कोष्टी ,ग्रामीण रुग्णालयाचे पर्यवेक्षक भांदर्गे यांची उपस्थिती होती.पर्यवेक्षक प्रताप भांदरगे यांनी टि बी ची लक्षणे उपाय व घ्यावयाची काळजी याबाबत मार्गदर्शन केले . टी बी. हारेल देश जिंकेल आशा व इतर घोषणा देवून जनजागृती करण्यात आली. रैली यशस्वी करण्यासाठी कार्यक्रम सहाय्यक अबू शेख, MPW सूरज चव्हाण ,शंकर कदम,निलेश थोरवे यांनी परीश्रम घेतले

आरोग्यविभाचे कर्मचारी तसेच शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी सहभागी झाले होते

## ज्ञान, संस्कृती आणि अनुभवांची अविस्मरणीय सफर – महाराष्ट्र विद्यालय, निलंगा शैक्षणिक सहल यशस्वी




**तभा वृत्तसेवा**

**निलंगा, दि. २५ मार्च :** केल्याने देशाटन, मनुष्य ज्ञानसमृद्ध होतो या उक्तीचा प्रत्यय देणारी महाराष्ट्र विद्यालय, निलंगा येथील शैक्षणिक सहल दिनांक २० मार्च ते २३ मार्च २०२६ दरम्यान अत्यंत उत्साहात व यशस्वीरीत्या पार पडली. या सहलीत विद्यार्थ्यांनी इतिहास, संस्कृती, धर्म आणि विज्ञान यांचा संगम प्रत्यक्ष अनुभवत ज्ञानाची नवी क्षितिजे गाठली.

या सहलीदरम्यान विद्यार्थ्यांनी अजिंठा लेणी, वेरूळ लेणी, घृष्णेश्र्वर मंदिर, भद्रा मारुती मंदिर, दौलताबाद किल्ला, बीबी का मकबरा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, जायकवाडी धरण, संत एकनाथ महाराज समाधी आणि पैठण उद्यान या ऐतिहासिक व धार्मिक स्थळांना भेटी देऊन त्यांच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास केला.

विद्यार्थ्यांनी प्रत्येक ठिकाणी स्थापत्यकला, ऐतिहासिक वारसा, धार्मिक परंपरा व सामाजिक योगदान यांचा सखोल अभ्यास केला. पाठ्यपुस्तकातील माहिती प्रत्यक्ष पाहण्याची संधी मिळाल्याने त्यांच्या ज्ञानात लक्षणीय भर पडली आणि अभ्यासाविषयीची उत्सुकता अधिकच वाढली.

या सहलीमुळे विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, सहकार्य, वेळेचे नियोजन आणि समूहभावना यांचा विकास झाला. शिक्षणासोबतच जीवनमूल्यांचेही बाळकडू मिळाल्याने ही सहल सर्वार्थाने यशस्वी ठरली.

सहल यशस्वी करण्यासाठी उपमुख्याध्यापक श्री. पवार डी. डी., सहल विभाग प्रमुख श्री. सोनवणे बी. एम., तसेच श्री. सलघंटे व्ही. आर., श्री. कांबळे एस. ए., श्री. मुगळे एस. आर., श्रीमती जन्मले एस. ए., श्रीमती माळी व्ही. बी., श्री. जाधव एस. वाय. आणि श्री. सुरवसे डी. यांनी परिश्रमपूर्वक नियोजन केले.

या यशस्वी आयोजनाबद्दल महाराष्ट्र शिक्षण समितीचे अध्यक्ष श्री. विजय पाटील निलंगेकर, सचिव श्री. सरतापे तसेच शाळेचे मुख्याध्यापक श्री. नटवे एम. आर., उपमुख्याध्यापक श्री. पवार डी. डी., पर्यवेक्षिका श्रीमती देशमुख एस. डी. व पर्यवेक्षक श्री. बिराजदार आर. ए. यांनी सर्व शिक्षकांचे अभिनंदन करून त्यांच्या कार्याचे कौतुक केले.

एकूणच, ही शैक्षणिक सहल विद्यार्थ्यांसाठी ज्ञानवर्धक, प्रेरणादायी आणि आयुष्यभर लक्षात राहणारा अनुभव ठरली.

# दिव्यांगासाठी शीघ्र निदानासाठी माता,आंगनवाड़ी आणि आशा सेविकांसाठी प्रशिक्षणाची मोठी आवश्यकता : मुदगड़े

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. २५ मार्च :** द हंस फॉउंडेशन दिव्यांगसाठी मोफत मोबाइल थेरपी सेवा दिल्या जातात, या पुनर्वसन विषयक सेवा पूनर्वास व्यावसायिक तज्ञ टीम द्वारे मुंबई, नवी मुंबई, ठाणे, रायगड येथील ४५ वंचित समुदायात महिन्यातून दोन वेळा दिल्या जातात. दिव्यांगजनाचे वसन आणि पुनर्वसन साठी आवश्यक सर्व उपक्रम प्रकल्पाद्वारे दिले जातात.दिव्यांगाचे मानसिक स्वास्थ्य आणि शारीरिक तपासणी साठी दिव्यांग व्यक्तींसाठी विविध प्रकारची वैद्यकीय शिबिरे आयोजित केले जातात.



द हंस फाउंडेशन तर्फे आज दिनांक २३ मार्च रोजी सदिच्छा भिड़े मनोविकास विद्यालय, कल्याण येथे ७५ आंगनवाडी सेविकांचे दिव्यांगत्वाचे स्क्रीनिंग (विजालन ) कसे करावयाचे याचे मार्गदर्शन श्रीमती ज्योती खरात, व्याख्याता, नीपिड प्रादेशिक केंद्र ,नवी मुंबई आणि श्री,जगन मुदगड़े ,द हंस फाउंडेशन यानी केले. सेविकाना दिव्यांगाचे पायाभूत ज्ञान प्राप्त करुण दिव्यांगाचे लवकर स्क्रीनिंग करण्यास मदत व्हावी या हेतूने कार्यक्रमांचे आयोजन केले गेले होते. कारण दिव्यांगतवच्चे निदान अणि रेफरल करण्यात त्यांची खुप मदत होत असते.दिव्यांगाचे प्रकार आणि लक्षणे यावर सविस्तर माहिती दिली तसेच जगन मुदगड़े यानी शीघ्र निदान आणि हस्तक्षेपण यावर मार्गदर्शन करताना लवकरात लवकर विकासत्मक विलंब आणि इतर लक्षणाच्या आधारे स्क्रिनिंग कशी करायची ,सन्दर्भित करयाचे हे सांगून निदान आणि शीघ्र हस्तक्षेपण कार्यक्रमामुळे दिव्यांगतावची तीव्रता कमी करुण संभावित सहसंबंधींच्या अवस्था टाळता ययेतात आणि कार्यक्षमता वाढवतात.

कार्यक्रमात मा. सुधीर साळवी , बाल विकास प्रकल्प अधिकारी, कल्याण, निरक्षिका श्रीमती शर्मीला जाधव, शोभा चौगुले, दक्षता चतुर , शाळेच्या मुख्याधिपिका सौ. रेखा निकुंभ , श्री प्रमोद मनगोळी यानी मोलाचे मार्गदर्शन आणि सहकार्य केले. कार्यक्रमांचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन श्रीमती सीमा यादव यानी केले. सदरिल कार्यक्रम यशस्वी करण्याकरीता प्रकल्प व्यवस्थापक आणि संघ यानी परिश्रम घेतले.

धाराशिव
# जिल्हा
सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## लग्नाचे आमिष दाखवून लाखोंची फसवणूक; भुममध्ये गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.२५ मार्च -**
लग्न लावून देण्याचे आमिष दाखवून सुमारे ४ लाख ४० हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला असून या प्रकरणी भुम पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी महेश दादासाहेब गपाट (वय २९, रा. दिंडोरी, ता. भुम) यांना आरोपी नझमा महाबरी राजु, लक्ष्मी धनाजी तुपे व दोन अनोळखी इसम यांनी लग्न लावून देण्याचे आमिष दाखवले.

दि.१ मार्च रोजी धाराशिव येथील बसस्थानकासमोर फिर्यादीच्या वडील व चुलत्यांकडून ४ लाख रुपये रोख तसेच ४० हजार रुपये ऑनलाइन स्वरूपात घेण्यात आले.

मात्र त्यानंतर आरोपींनी फसवणूक करून पैसे लुबाडले. दरम्यान, फिर्यादीची पत्नी लक्ष्मी हिला तिच्या बहिणीकडे सोडण्यासाठी गेलेल्या फिर्यादीच्या वडिलांना दोन अनोळखी व्यक्तींनी धमकावत हा आमचा धंदा आहे, मुलगी दाखवून लग्न लावून पैसे घेऊन निघून जातो, असे सांगत परत आल्यास जीवे मारण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद आहे.

या प्रकरणी फिर्यादीने दि.२३ मार्च रोजी दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.



# येडेश्वरी देवी चैत्र पौर्णिमा यात्रा २ ते ७ एप्रिलदरम्यान; १२-१५ लाख भाविकांची अपेक्षा

### आई येडेश्वरीच्या चैत्र पौर्णिमा यात्रेची देवस्थान ट्रस्टकडून तयारी अंतिम टप्प्यात





**सुधीर लोमटे**
**धाराशिव, दि.२५ मार्च -**
महाराष्ट्रासह राज्याबाहेरही तुळजाभवानी देवीची धाकटी बहीण म्हणून प्रसिद्ध असलेल्या येरमाळा येथील आई येडेश्वरी देवीची चैत्र पौर्णिमा यात्रा महोत्सव येत्या २ एप्रिल ते ७ एप्रिल दरम्यान मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. यात्रेतील प्रमुख आकर्षण असलेला चुना वेचण्याचा कार्यक्रम व पालखीचे आमराई मंदिरात आगमन ३ एप्रिल रोजी होणार आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही सुमारे १२ ते १५ लाख भाविक उपस्थित राहण्याची शक्यता आहे.

यात्रेच्या पार्श्वभूमीवर येडेश्वरी देवस्थान ट्रस्टकडून सर्व तयारी अंतिम टप्प्यात पोहोचली असून परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला आहे. भाविकांची मोठी गर्दी लक्षात घेऊन मंदिर परिसरात व्यापक स्वच्छता मोहीम राबविण्यात आली असून यात्रा काळात ५० स्वच्छता कर्मचारी कार्यरत राहणार आहेत. पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्थेसाठी मलकापूर साठवण तलावाजवळील देवस्थानच्या विहिरीतून दत्त कल्लोळ व मंदिरापर्यंत नवीन पाइपलाईनद्वारे पाणीपुरवठ्याची सोय करण्यात आली आहे. मंदिराची आकर्षक रोषणाई व शिखराचे रंगकाम अंतिम टप्प्यात आले असून आमराई मंदिर परिसराची स्वच्छता व रंगकामही पूर्ण करण्यात आले आहे. भाविकांना उन्हापासून दिलासा मिळावा यासाठी सावली मंडप उभारण्यात आले आहेत. यात्रेदरम्यान वीजपुरवठा, निवास, वाहतूक नियोजन, आरोग्य सुविधा व आपत्कालीन सेवांची सर्वतोपरी तयारी करण्यात आली असून विविध धार्मिक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात येणार आहे.

> सुरक्षेच्या दृष्टीने मंदिर व परिसरात सुमारे १०० सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले असून ट्रस्टकडून १०० जवानांचा सुरक्षा ताफा तैनात करण्यात येणार आहे.
> - संतोष आगलावे, कोषाध्यक्ष, येडेश्वरी देवस्थान ट्रस्ट, येरमाळा,

यात्रेदरम्यान भाविकांनी शिस्त पाळून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

## विज्ञान प्रश्नमंजुषेत महात्मा बसेश्वर विद्यालयाचा तालुक्यात प्रथम क्रमांक



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२५ मार्च -**
अध्ययन संस्था, मुंबई यांच्या वतीने कै. शरणप्पा मलंग विद्यालय, उमरगा येथे आयोजित विज्ञान प्रश्नमंजुषा स्पर्धेत महात्मा बसेश्वर विद्यालय, उमरगा यांनी तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले.

या स्पर्धेत इयत्ता ८ वीतील मलप्रित बनसोडे व सिद्धी विश्वकर्मा तसेच इयत्ता ९ वीतील जोया लदाफ, श्रेयसी राऊळवार आणि समृद्धी पोतदार या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत १२० पैकी ११५ गुण मिळवले. त्यांच्या या यशामुळे शाळेने तालुकास्तरावर अव्वल स्थान पटकावले.

**स्पर्धेत १० शाळांचा सहभाग...**

स्पर्धेत तालुक्यातील एकूण १० शाळांचा सहभाग होता. यामध्ये द्वितीय क्रमांक महात्मा गांधी विद्यामंदिर, केसर जवळगा, तृतीय क्रमांक भारत विद्यालय, उमरगा तर उत्तेजनार्थ क्रमांक श्री श्री रविशंकर विद्या मंदिर, उमरगा यांनी मिळवला.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मल्लिकार्जुन आप्पा दंडगे, ज्येष्ठ मार्गदर्शक डॉ. चंद्रकांत महाजन, कार्यवाह डॉ. कपिल महाजन, मुख्याध्यापक नेताजी गायकवाड, संचालक सदस्य राजा देशेट्टी व प्रवीण अणदूरकर, विज्ञान विभाग प्रमुख शरद गायकवाड तसेच सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी आणि पालकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## धाराशिव जिल्ह्यात ५ एप्रिलपासून प्रत्यक्ष भेटीद्वारे मतदार मॅपिंग मोहीम सुरू

### जिल्ह्यात १५२३ बीएलओ आणि १५२ बीएलओ सुपरवायझर या मोहिमेत कार्यरत



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ मार्च -**
जिल्ह्यातील मतदार यादी अधिक अचूक व अद्ययावत करण्यासाठी ५ एप्रिलपासून प्रत्यक्ष भेटीद्वारे मतदार मॅपिंग मोहीम सुरू करण्यात येणार असल्याची माहिती उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिरीष यादव यांनी दिली.

धाराशिव जिल्ह्यातील चार विधानसभा मतदारसंघांमध्ये एकूण १४ लाख २१ हजार ८९४ मतदार नोंदणीकृत आहेत. यापैकी आतापर्यंत ८ लाख ५७ हजार ८५१ मतदारांचे मॅपिंग पूर्ण झाले असून हे एकूण प्रमाण ६०.३३ टक्के इतके काम पूर्ण आहे. अद्याप सुमारे ४ लाख मतदारांचे मॅपिंग बाकी आहे. यामध्ये २००२ पूर्वीच्या मतदार यादीतील ६ लाख ३३ हजार ४६० मतदारांचे, तर २००२ नंतरच्या यादीतील २ लाख ८३ हजार ८८७ मतदारांचे मॅपिंग पूर्ण झाले आहे. सध्या जिल्ह्यात १५२३ बीएलओ आणि १५२ बीएलओ सुपरवायझर या मोहिमेत कार्यरत आहेत. या प्रक्रियेदरम्यान मतदार यादीतील दुबार नावे तपासणे, मयत मतदारांची नावे वगळणे, तसेच २३ हजार ५४१ ब्लर (अस्पष्ट) फोटो ओळखून त्यांची दुरुस्ती करणे ही कामेही हाती घेण्यात आली आहेत. ही मोहीम प्री-एसआर अंतर्गत राबवली जात असून, सध्या ऑनलाईन प्रणालीच्या सहाय्याने मॅपिंगचे काम सुरू आहे.

या कामासाठी प्रशासनाने सर्व राजकीय पक्षांची बैठक घेऊन सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. मात्र, भाजप वगळता इतर कोणत्याही पक्षाने बीएलई उपलब्ध करून दिले नसल्याचेही यावेळी सांगितले.

मतदार यादी अधिक पारदर्शक व अचूक करण्यासाठी ही मोहीम महत्त्वाची असून, नागरिकांनीही यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

## जि.प. अध्यक्षा अर्चनाताई पाटील यांचा सत्कार; विकासकामांवर सविस्तर चर्चा



**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२५ मार्च -**
धाराशिव जिल्हा परिषद येथे अध्यक्षा अर्चनाताई पाटील यांचा डिकसळ परिसरातील पदाधिकाऱ्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी नगरसेवक प्रशांत लोमटे, डिकसळचे ग्राम पंचायत सदस्य इम्रान मुल्ला, जीवा कुचेकर, विशाल शिंदे तसेच जनजागृती शाळेचे शिक्षक रफिक शेख उपस्थित होते.

याप्रसंगी डिकसळ गावातील विविध विकासकामांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. गावातील रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता तसेच इतर मूलभूत सुविधांशी संबंधित प्रश्न उपस्थितांकडून मांडण्यात आले. प्रलंबित कामे लवकरात लवकर पूर्ण व्हावीत, तसेच नव्या विकासकामांना गती द्यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

अध्यक्ष अर्चनाताई पाटील यांनी उपस्थितांच्या मागण्यांकडे लक्ष देत संबंधित विषयांवर सकारात्मक भूमिका घेतली. आवश्यक त्या ठिकाणी प्रशासनाच्या माध्यमातून तत्काळ कार्यवाही करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. गावाच्या सर्वांगीण विकासासाठी सहकार्य करण्याची ग्वाहीही त्यांनी यावेळी दिली.

या भेटीदरम्यान स्थानिक प्रश्नांवर चर्चा होऊन विकासकामांना चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

## उच्च न्यायालयाचा ऐतिहासिक आदेश; पार्वती मल्टीस्टेट बँकेच्या ठेवी २ महिन्यांत परत द्या

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ मार्च -**
पार्वती मल्टीस्टेट बँकेच्या खातेदारांना त्यांच्या ठेवी परत देण्याची संपूर्ण प्रक्रिया दोन महिन्यांत पूर्ण करावी, असे स्पष्ट आदेश संभाजीनगर येथील उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने दिले आहेत. न्यायमूर्ती संदीप कुमार शिंदे व न्यायमूर्ती आबासाहेब मोरे यांनी २३ मार्च रोजी हा महत्त्वपूर्ण निर्णय दिला.

पार्वती मल्टीस्टेट बँकेने ठेवीदारांना जादा व्याजाचे आमिष दाखवून लोहारा, सास्तूर, डाळिंब, कसली, सालेगाव, तुरोरी आदी ठिकाणी शाखा उघडत मोठ्या प्रमाणात ठेवी गोळा केल्या होत्या. मात्र पिग्मी व एफडीची मुदत संपूनही गेल्या तीन वर्षांपासून खातेदारांना पैसे परत मिळत नसल्याने अनेकजण आर्थिक अडचणीत सापडले होते. या ठेवींची एकूण रक्कम सुमारे ३० ते ३५ कोटी रुपयांपर्यंत असल्याचे सांगितले जाते. या प्रकरणी खातेदारांनी महाराष्ट्र ग्राहक संरक्षण अधिनियम १९९९ अंतर्गत संभाजीनगर उच्च न्यायालयात क्रिमिनल रिट याचिका दाखल केली होती. अवघ्या सहा महिन्यांत न्यायालयाने निकाल देत, कायद्यात कालमर्यादा नसतानाही ठोस निर्देश दिले.



**सामाजिक कार्यकर्ते अनिल जगताप यांच्या प्रयत्नांना यश...**

न्यायालयाने आदेशात नमूद केले की, संबंधित कायद्यांतर्गत संचालकांची चल व अचल मालमत्ता जप्त करून खातेदारांना पैसे परत देण्याची प्रक्रिया दोन महिन्यांत पूर्ण करावी. ॲड. अक्षरा मडके यांनी केलेला प्रभावी युक्तिवाद ग्राह्य धरत न्यायालयाने खातेदारांच्या हिताला प्राधान्य दिले. या प्रकरणात सामाजिक कार्यकर्ते अनिल जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली खातेदारांनी आंदोलनही केले होते. मात्र प्रशासनाकडून अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याने अखेर न्यायालयाचा दरवाजा ठोठावण्यात आला.

दरम्यान, या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर खातेदारांनी सर्वोच्च न्यायालयात कॅव्हिएट दाखल केले असून पुढील कामकाज ॲड. सागर पाटील पाहणार आहेत.

या ऐतिहासिक निर्णयामुळे ठेवीदारांचे पैसे अडकवणाऱ्या संस्थांवर मोठा दबाव निर्माण झाला असून खातेदारांमध्ये दिलासा व्यक्त होत आहे.

## एमएसईबीच्या हलगर्जीपणामुळे सालगड्याचा विजेच्या धक्क्याने मृत्यु

### ग्रामस्थांचा संताप, अधिकाऱ्यांना घेराव...

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२५ मार्च -**
तुळजापूर तालुक्यातील कुन्सावळी येथे एमएसईबीच्या कथित गलथान कारभारामुळे शेतात काम करणाऱ्या ३५ वर्षीय सालगड्याचा विजेचा शॉक लागून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या घटनेनंतर संतप्त ग्रामस्थांनी एमएसईबी अधिकाऱ्यांना घेराव घालत चौकशी व मयताच्या कुटुंबाला न्याय देण्याची मागणी केली.

मिळालेल्या माहितीनुसार, दि.२४ मार्च रोजी सकाळी सुमारे १० वाजण्याच्या सुमारास कुन्सावळी येथील सुभाष बाबुराव शिंदे यांच्या शेतात सालगडी म्हणून काम करणारा गोरख धोंडिबा गुंड (वय ३५) हा नेहमीप्रमाणे शेतातील बोअरवरील वीज डब्याजवळ साफसफाईचे काम करत होता. गावात दररोज वीजपुरवठा दुपारी १ वाजता सुरू होतो, अशी माहिती असल्याने तो सकाळी निर्धास्तपणे काम करत होता.

मात्र, त्या दिवशी अचानक सकाळीच वीजपुरवठा सुरू झाल्याने गोरख गुंड यांना जोरदार विजेचा धक्का बसून त्यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेनंतर संतप्त ग्रामस्थांनी बोरगाव येथील एमएसईबी सबस्टेशनमध्ये धाव घेत अधिकाऱ्यांना घेराव घातला. वीजपुरवठा नेहमी दुपारी १ वाजता सुरू होतो, मग आज सकाळी १० वाजताच का सुरू करण्यात आला? पूर्वसूचना का देण्यात आली नाही? असा जाब ग्रामस्थांनी विचारला. यावेळी कुन्सावळीचे सरपंच पांडुरंग शिंदे, पोलिस पाटील तेजाबाई शिंदे, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष रघुनाथ कोकरे, शिवसेनेचे श्रीकांत कोकरे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

ग्रामस्थांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी तसेच मयताच्या कुटुंबाला आर्थिक मदत देऊन न्याय द्यावा, अशी मागणी केली आहे. मयत गोरख गुंड यांच्या पश्चात पत्नी व दोन लहान मुले असून त्यांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे, अशी संतप्त भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

## राजेंद्र बिक्कड यांना 'नेताजी सुभाषचंद्र बोस राष्ट्रीय जीवनगौरव पुरस्कार' जाहीर



**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२५ मार्च -**
कळंब तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, आढाळा येथील मुख्याध्यापक राजेंद्र बाबासाहेब बिक्कड यांना महाराष्ट्र राज्य पोलीस मित्र असोसिएशनतर्फे दिला जाणारा 'नेताजी सुभाषचंद्र बोस राष्ट्रीय जीवनगौरव पुरस्कार' जाहीर झाला आहे.

शिक्षण क्षेत्रातील त्यांचे दीर्घकालीन समर्पित कार्य, नाविन्यपूर्ण उपक्रम व विद्यार्थ्यांना दिलेले करिअर मार्गदर्शन याची दखल घेत हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

त्यांच्या कार्यामुळे अनेक विद्यार्थ्यांच्या आयुष्याला दिशा मिळाली आहे.

हा पुरस्कार २९ मार्च २०२६ रोजी मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार असून, त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

## एमटीएस परीक्षेत स्वामी विवेकानंद विद्यामंदिरचे घवघवीत यश



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२५ मार्च -**
उमरगा येथील श्री राष्ट्रीय शिक्षण प्रसारक संस्था संचलित स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिरच्या विद्यार्थ्यांनी २०२५-२६ च्या महाराष्ट्र टॅलेंट सर्च (एमटीएस) परीक्षेत जिल्हा व तालुकास्तरावर उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

या परीक्षेसाठी शाळेतील एकूण ६० विद्यार्थी बसले होते. त्यामध्ये इयत्ता दुसरी ते सातवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांचा समावेश होता. यात कुमारी प्रसिका शिवानंद सूर्यवंशी हिने तालुक्यात चौथा व जिल्ह्यात पंधरावा क्रमांक मिळवून विशेष कामगिरी केली.

इतर विद्यार्थ्यांनीही उल्लेखनीय गुण मिळवत शाळेची उज्वल परंपरा कायम राखली.

यामध्ये इयत्ता दुसरीतील अथर्व सुतार (८२), दानवी पाटील (७४), इयत्ता तिसरीतील अभिज्ञा शाही वाले (१०२), अंजली बसुळे (९८), माहेरा मुजावर (९२), विराट माळी (९६), दिव्या आडे (९४), इयत्ता चौथीतील श्वेता होगाडे (८८), वैष्णव मेरू (७४), इयत्ता सहावीतील प्रसिका सूर्यवंशी (१२८), कृष्णा क्षीरसागर (११२), ओंकार पवार (११२), सोनाली जाधव (१०८), श्रावणी माळी (१०४) तसेच इयत्ता सातवीतील पूजा चलवाडे (१०८), प्राप्ती लुल्ले (१०२), ज्योती स्वामी (९२), नमिर देशमुख (९२), मयुरेश फुकटे (९०) यांनी उत्कृष्ट यश मिळवले.

या यशाबद्दल संस्थेचे ज्येष्ठ संचालक डॉ. चंद्रकांत महाजन, अध्यक्ष मल्लिकार्जुन आप्पा दंडगे, कार्यवाह डॉ. कपिल महाजन तसेच मुख्याध्यापिका सविता लोहार व सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## नळदुर्ग उपजिल्हा रुग्णालयात एचपीव्ही लसीकरणाला सुरुवात

### १४-१५ वयोगटातील मुलींना मोफत लस...



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२५ मार्च -**
नळदुर्ग येथील उपजिल्हा रुग्णालयात दि.२४ मार्च रोजी १४ ते १५ वयोगटातील मुलींसाठी एचपीव्ही लस देण्यास सुरुवात करण्यात आली. या लसीकरणाचा शुभारंभ रुग्णालयाच्या अधीक्षक डॉ. चंचला बोडके यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी शहरातील महेरीन मुर्तुजा मौजन या मुलीला परिचारिका सुमन फुले यांच्या हस्ते पहिली लस देण्यात आली. कार्यक्रमास डॉ. सुरेंद्र मडके, परिचारिका मनिषा होगले तसेच इतर आरोग्य कर्मचारी उपस्थित होते. मुलींना भविष्यात कॅन्सर सारख्या गंभीर आजारापासून संरक्षण मिळावे, यासाठी राज्य सरकारने १४ ते १५ वयोगटातील मुलींना ही लस मोफत देण्याचा निर्णय घेतला आहे. नळदुर्ग शहरात सुमारे २५० मुली या लसीकरणासाठी पात्र असून पालकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता आपल्या मुलींना ही लस देण्याचे आवाहन डॉ. चंचला बोडके यांनी केले आहे.

उपजिल्हा रुग्णालयात दररोज हे लसीकरण सुरू राहणार असल्याची माहिती रुग्णालय प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

धाराशिव
# दिनांक
सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## गर्दीचा फायदा घेत तरुणीचे ८० हजारांचे सोन्याचे गंठण लंपास

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२५ मार्च -
जुने बसस्थानक परिसरात गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने एका तरुणीच्या गळ्यातील सोन्याचे मिनी गंठण लंपास केल्याची घटना समोर आली आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी प्रज्ञा आकाश कांबळे (वय २३, रा. आयोध्या नगर, मुरुम ता. उमरगा, जि. धाराशिव) या दि. २४ मार्च २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ५ वाजण्याच्या सुमारास तुळजापूर येथील जुने बसस्थानक येथे संभाजीनगरकडे जाणाऱ्या बसमध्ये चढत होत्या. यावेळी गर्दीचा फायदा घेत अज्ञात व्यक्तीने त्यांच्या गळ्यातील सुमारे १५ ग्रॅम वजनाचे, अंदाजे ८० हजार रुपये किमतीचे सोन्याचे मिनी गंठण चोरून नेले.

या प्रकरणी प्रज्ञा कांबळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तुळजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.



## संक्षिप्त वृत्त...



### स्वामी विद्यामंदिरात विद्यार्थ्यांनी चालवली एक दिवसाची शाळा

उमरगा, दि.२५ मार्च -
उमरगा येथील श्री राष्ट्रीय शिक्षण प्रसारक संस्था संचलित स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिरमध्ये इयत्ता सातवीच्या २६९ विद्यार्थ्यांनी स्वयंशासन दिनानिमित्त पूर्ण एक दिवस शाळा चालवण्याचा अनोखा उपक्रम राबविला. विद्यार्थ्यांनी शिक्षकांची नक्कल करत इयत्ता पहिली ते सहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना विविध विषय शिकवले, त्यामुळे लहान विद्यार्थ्यांमध्ये उत्सुकता वाढली. या निमित्ताने इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांनी 'खाऊ गल्ली'चे आयोजन करून वडापाव, पावभाजी, भजी, पाणीपुरी आदी पदार्थांचे स्टॉल लावले. यामधून विद्यार्थ्यांना व्यापारातील नफा-तोट्याचा अनुभव मिळाला. स्वयंशासन दिनासाठी भावनेश सौंदर्गे, नमिर देशमुख, संजीवनी पाटील, विपुला सूर्यवंशी यांनी मुख्याध्यापक म्हणून काम पाहिले. यावेळी संस्थेचे संचालक राजा देशट्टी, प्रवीण अनुदुरकर तसेच मुख्याध्यापिका सविता लोहार व शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

### वरुणराज कळसे यांना पीएच.डी. पदवी

धाराशिव, दि.२५ मार्च -
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उपपरिषद, व्यवस्थापनशास्त्र विभागातील सहाय्यक



प्राध्यापक वरुणराज चंद्रशेखर कळसे यांना बिझनेस डमिनिस्ट्रेशन विषयातील पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली. त्यांचा संशोधन विषय अ स्टडी ऑफ सायबर सिक्युरिटी मॅनेजमेंट इन ऑनलाइन शॉपिंग विथ रेफरन्स टू मराठवाडा रिजन असा होता. या संशोधनासाठी त्यांना डॉ. मोहम्मद फारुख खान यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल संचालक डॉ. सुयोग अमृतराव, डॉ. विक्रम शिंदे, डॉ. जितेंद्र शिंदे, डॉ. सचिन बसैये तसेच कुटुंबीय चंद्रशेखर कळसे, माणिक कळसे, वैष्णवी कळसे आदींनी त्यांचे अभिनंदन केले.

### उमरगा बसस्थानकासाठी नव्या एस.टी. बसेस देण्याची मागणी

उमरगा, दि.२५ मार्च -
उमरगा आगार हे महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवरील शेवटचे बसस्थानक असल्याने येथे प्रवाशांची मोठी



गर्दी असते. मात्र, स्थानकातील बसेसची दुरावस्था व अपुरी संख्या यामुळे ग्रामीण भागातील वाहतूक नियोजन करताना प्रशासनास अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेना उपनेते तथा माजी आमदार ज्ञानराज चौगुले यांनी परिवहन मंत्री तथा पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे उमरगा बसस्थानकासाठी जास्तीत जास्त नवीन बसेस उपलब्ध करून देण्याची मागणी पत्राद्वारे केली आहे. या मागणीची दखल घेत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी संबंधित विभागाला आवश्यक त्या सूचना दिल्या आहेत.

### सचिन बसैये यांना पीएच.डी. पदवी प्रदान

धाराशिव, दि.२५ मार्च -
सचिन कचरुलाल बसैये यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाकडून 'बिझनेस डमिनिस्ट्रेशन' विषयातील पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली. मराठवाडा विभागातील सार्वजनिक व खासगी क्षेत्रातील बँकांकडून गृहकर्ज घेण्याबाबत ग्राहकांच्या दृष्टीकोनाचा अभ्यास या विषयावर त्यांनी संशोधन पूर्ण केले. या संशोधनासाठी त्यांना डॉ. श्रीकृष्ण चंदनशिव यांचे मार्गदर्शन लाभले.

## पायाभूत विकास महामंडळ म्हणजे टेंडर मॅनेजमेंटचा खेळ?

### आमदार कैलास पाटील यांचा सभागृहात घणाघात...

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२५ मार्च -
महाराष्ट्र राज्य पायाभूत विकास महामंडळ हे केवळ टेंडर मॅनेज करणारी यंत्रणा असल्याचा खळबळजनक आरोप आमदार कैलास पाटील यांनी विधानसभेत केला. संबंधित अधिकाऱ्यांची भूमिका ही कलेक्शन यंत्रणेसारखीच असल्याचे त्यांच्या कामावरून दिसत असल्याचाही आरोप त्यांनी यावेळी केला.

आमदार पाटील म्हणाले की, सार्वजनिक बांधकाम विभागाकडे ८ हजार अभियंते असताना पुन्हा स्वतंत्र पायाभूत विकास महामंडळ स्थापन करण्यामागचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. मनुष्यबळ कमी आणि कामांचा प्रचंड भार अशी या मंडळाची अवस्था असून सध्या सुमारे ३७ हजार कोटी रुपयांची कामे या मंडळाकडे सुरू आहेत.

ऊसतोड मजुरांसाठी वसतिगृह बांधकाम तसेच काही मेडिकल कॉलेजच्या इमारतींची कामेसुद्धा या मंडळाकडे सोपवण्यात आली आहेत. केंद्र शासनाच्या



अखत्यारितील यंत्रणांकडून होणारी कामेसुद्धा या मंडळाकडे देण्याची गरज का भासली, असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

मुंबईतील मुख्य कार्यालयात अत्यल्प मनुष्यबळ असून प्रत्येक विभागात एक किंवा दोन कार्यकारी अभियंतेच आहेत. एवढ्या मर्यादित यंत्रणेकडे मोठ्या प्रमाणावर कामे देण्याचा घाट सरकार का घालत आहे, तसेच कामांची प्रत्यक्ष पाहणी करणेही शक्य नसताना हे कामकाज कसे चालते, याबाबत सरकारने स्पष्टीकरण द्यावे, अशी मागणी त्यांनी केली.

निविदा प्रक्रियेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित करत, एकाही कामाची निविदा ही मूळ रकमेपेक्षा कमी दरात नसल्याचे त्यांनी सांगितले. कमी दराने निविदा आल्यास ७.५ टक्के बँक गॅरंटीची अट घालण्यात आल्याने स्पर्धा मर्यादित होत असल्याचा आरोप त्यांनी केला.

राष्ट्रीय महामार्गांची कामे ४० ते ४५ टक्के कमी दरात होत असताना राज्यात तशी पद्धत का राबवली जात नाही, असा सवाल करत केंद्रातील मंत्री नितीन गडकरी यांच्या कामकाजाचा दाखलाही त्यांनी दिला.

सदर प्रकारामुळे भ्रष्टाचाराला खतपाणी मिळत असल्याचा आरोप करत, सुशासन देण्याचा दावा करणाऱ्या सरकारने याबाबत खुलासा करावा, अशी मागणी आमदार कैलास पाटील यांनी सभागृहात केली.

## कवठा येथे 'त्रिशिव हनुमान मंदिर' सभागृहाचे आज भूमीपूजन

तभा वृत्तसेवा
उमरगा, दि.२५ मार्च -
उमरगा तालुक्यातील कवठा ग्राम पंचायतीच्या हद्दीत धार्मिक व सामाजिक कार्याचा सुंदर संगम पाहायला मिळणार असून, आमदार निधीतून मंजूर 'त्रिशिव हनुमान मंदिर' सभागृहाच्या बांधकामाचा भूमीपूजन समारंभ गुरुवार दि. २६ रोजी दुपारी १ वाजता आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात शिलाई मशीन वाटप व नवनिर्वाचित सदस्यांचा नागरी सत्कारही करण्यात येणार आहे.

### शिलाई मशीन वाटपासह नागरी सत्कार सोहळा...

या सोहळ्याचे उद्घाटन उमरगा-लोहारा विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रविण स्वामी यांच्या हस्ते होणार असून, अध्यक्षस्थानी माजी राज्यमंत्री तथा भाजप (लातूर ग्रामीण) जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमात सहअध्यक्ष शेत पानंद रस्ते समिती शरण पाटील, जि.प. सदस्य शहाजी पाटील, पंचायत समिती उमरगा सभापती ॲड. आकांक्षा चौगुले, जि.प. सदस्य रफिक तांबोळी व योगेश राठोड यांच्यासह विविध मान्यवरांचा सत्कार करण्यात येणार आहे.

यावेळी विशेष अतिथी म्हणून माजी जि.प. उपाध्यक्ष केशव (बाबा) पाटील, जनता बँकेचे चेअरमन, वसंतराव नागदे, भाऊसाहेब बि.सा.का. समुद्राळचे चेअरमन सुरेश बिराजदार तसेच श्रमजीवी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष विनायकराव पाटील हे उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.

कवठा ग्रामस्थांनी धार्मिक कार्याबरोबरच सामाजिक बांधिलकी जपत महिलांना स्वावलंबी करण्यासाठी शिलाई मशीन वाटपाचा उपक्रम हाती घेतला आहे. तसेच नव्याने निवडून आलेल्या सदस्यांचा सत्कार करून विकासकामांच्या अपेक्षा व्यक्त करण्यात येणार आहेत.

या कार्यक्रमाचे आयोजन सरपंच महादेव कांबळे, उपसरपंच विकास पाटील, चेअरमन संजय सोनवणे, सचिव बाबू सावंत, कोषाध्यक्ष डॉ. रविंद्र सोनवणे तसेच ग्रामस्थ, भजनी मंडळ व युवक मंडळ, कवठा यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## इंस्टाग्राम स्टेटसच्या कारणावरुन मारहाण

तभा वृत्तसेवा
भूम, दि.२५ मार्च -
इंस्टाग्रामवर स्टेटस ठेवण्याच्या कारणावरून भुम येथील बाजार तळ परिसरात एका व्यक्तीसह त्यांच्या नातेवाईकांना मारहाण केल्याची घटना घडली असून या प्रकरणी ९ जणांविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी गौस बाबु शेख, साहील गौस शेख, सोहेल गौस शेख, साकीब गौस शेख, जफर सिकंदर पठाण, रेहना समद शेख, तबसुम गौस शेख, हालीमा बाबु शेख व समीना सोहेल शेख (सर्व रा. भुम, ता. भुम, जि. धाराशिव) यांनी दि.२४ मार्च २०२६ रोजी सकाळी सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास बाजार तळ भुम येथे फिर्यादी एजाज ईसाक फकीर (वय ४०, रा. शेंडगे गल्ली, भुम) तसेच त्यांचा भाऊ फिरोज, पुतण्या मोईन फकीर, भाचे साहील फकीर, सुमेर सय्यद व नदीम मुलानी यांना इंस्टाग्राम स्टेटसच्या कारणावरून शिवीगाळ करत मारहाण केली.

या मारहाणीत आरोपींनी लाथाबुक्यांसह काठी, दगड व लोखंडी सळईचा वापर करून संबंधितांना जखमी केले.

## पं.स.च्या योजना जास्तीत जास्त लाभार्थ्यांपर्यंत पोहचवा

### सभापती ॲड. आकांक्षा चौगुले यांच्या प्रशासनास सूचना...

तभा वृत्तसेवा
उमरगा, दि.२५ मार्च -
स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांनंतर उमरगा पंचायत समितीची पहिली सर्वसाधारण सभा मंगळवार दि.२४ मार्च रोजी नवनिर्वाचित सभापती ॲड. आकांक्षाताई चौगुले यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी गटविकास अधिकारी प्रशांतसिंह मरोड व सर्व सदस्य तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत सर्व प्रशासकीय विभागांकडून त्यांच्या योजनांची माहिती व कार्यपद्धतीचा आढावा सादर करण्यात आला. यावेळी सभापती ॲड. चौगुले यांनी घरकुल लाभार्थ्यांची होल्ड असलेली बँक खाती तात्काळ सुरू करणे, गोठा व विहिरीच्या कामांची थकीत बिले अदा करणे, नागरिकांची कामे वेळेत पूर्ण करणे तसेच क्षत लसीकरणाबाबत व्यापक जनजागृती करण्याच्या सूचना प्रशासनास दिल्या.



मागील काळात पंचायत समितीत भ्रष्टाचाराच्या चर्चांवर भाष्य करत, कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी लाभार्थ्यांकडून लाच किंवा पैसे मागताना आढळल्यास कडक कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

तसेच विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून त्या गरजूंपर्यंत पोहोचवाव्यात, यासाठी प्रशासन व ग्रामपंचायतींनी समन्वयाने काम करावे, असेही त्यांनी नमूद केले.

या बैठकीस तालुका आरोग्य अधिकारी डॉ. उमाकांत बिराजदार, गटशिक्षण अधिकारी अमोल राजपूत, उपअभियंता जि.प. बांधकाम दिलीप बिराजदार, तालुका कृषी अधिकारी ज्ञानोबा रीतापुरे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

## तानाजीराव सावंत यांच्या वाढदिवसानिमित्त परंड्यात कुस्ती स्पर्धा; १७० लढतींनी रंगणार आखाडा



तभा वृत्तसेवा
परंडा, दि.२५ मार्च -
महाराष्ट्राची परंपरा जपणारा अस्सल मातीतील कुस्ती हा खेळ पुन्हा एकदा परंडा नगरीत रंगणार असून, माजी आरोग्यमंत्री तथा आमदार प्रा.डॉ. तानाजीराव सावंत यांच्या वाढदिवसानिमित्त दि.२८ मार्च रोजी परंडा पंचायत समितीच्या प्रांगणात भव्य कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. युवासेना तालुका प्रमुख राहुल डोके यांच्या पुढाकारातून हा कुस्ती महोत्सव पार पडणार आहे.

या पार्श्वभूमीवर कुस्ती मैदानाची तयारी अंतिम टप्प्यात आली असून, आयोजक राहुल डोके यांच्या मार्गदर्शनाखाली व पै. दिलीप (नाना) मोरजकर यांच्या नेतृत्वाखाली आखाडा, प्रेक्षकांसाठी आसनव्यवस्था व स्टेज उभारणीची कामे पूर्णत्वाकडे आली आहेत.

दि.२४ मार्च रोजी शिवसेना तालुका प्रमुख आण्णासाहेब जाधव यांनी कुस्ती मैदानाला भेट देऊन पाहणी केली. यावेळी पै. दिलीप (नाना) मोरजकर, पै. हरि घोगरे, पै. सतीश मिस्कीन, पै. हर्षद जगदाळे, पै. सागर मोरे, विनोद शिंदे, पंडित जगदाळे, धर्मा जगदाळे, नंदकुमार कुंभार, अशोक गरड व गुलाब शिंदे आदी उपस्थित होते.

### महिला मल्लांचाही थरार...

या स्पर्धेत महिला मल्लांचाही थरार पाहायला मिळणार असून पहिली महिला महाराष्ट्र केसरी प्रतिक्षा बागडी आणि हरियाणा केसरी भटेरी लखवान यांच्यातील निकाली कुस्ती विशेष आकर्षण ठरणार आहे. या कुस्ती स्पर्धेत सुमारे १७० निकाली कुस्त्या होणार असून, परंडा परिसरातील कुस्तीप्रेमींमध्ये या स्पर्धेबाबत मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे.

### नामांकित मल्लांच्या दमदार लढती...

या भव्य मैदानात अनेक नामांकित मल्लांच्या निकाली कुस्त्या होणार असून डबल महाराष्ट्र केसरी हर्षद सदगीर विरुद्ध पंजाबच्या साहील कोहली, पै. माऊली कोकाटे विरुद्ध प्रकाश बनकर, हमीद दिलावर (इराण) विरुद्ध रविराज चव्हाण, माऊली जमदाडे विरुद्ध गणेश जगताप, हनुमंत पुरी विरुद्ध बाळू अपराध, बाळू बोडके विरुद्ध सुशांत तांबोळकर, देवा थापा (नेपाळ) विरुद्ध गडू हरिद्वार, विजय मांडवे विरुद्ध शुभम कोळेकर, प्रशांत जगताप विरुद्ध विक्रम घोरपडे, प्रमोद सुळ विरुद्ध शाहरुख खान अशा रंगतदार लढती होणार आहेत.

## तुळजाभवानी मंदिरातील व्हीआयपी पास वाटपप्रकरणी चौकशीचे आदेश

तभा वृत्तसेवा
तुळजापूर, दि.२५ मार्च -
येथील माहिती अधिकार कार्यकर्ते जयकुमार नागनाथ पांढरे यांनी श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानातील महत्त्वाचे व अतिमहत्त्वाचे (व्हीआयपी) पास नियमबाह्य पद्धतीने वाटप करण्यात आल्याबाबत तक्रार अर्ज सादर केला होता. या तक्रारीची दखल घेत प्रशासनाने चौकशीचे आदेश दिले आहेत.



तक्रारीनुसार, मंदिर संस्थानातील व्हीआयपी दर्शन व्यवस्थेच्या नोंदवहीत गेल्या ७ महिन्यांत सुमारे ५६ लाख ८३ हजार रुपयांचे पास नियमबाह्य पद्धतीने वाटप करण्यात आल्यामुळे संस्थानचे आर्थिक नुकसान झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत धाराशिवचे विभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी यांनी तहसीलदार तथा व्यवस्थापक, श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान यांना लेखी आदेश देत सखोल चौकशी करून वस्तुस्थितीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

दरम्यान, या तक्रारीच्या अनुषंगाने मंदिर संस्थान प्रशासनाने निष्पक्ष व पारदर्शक चौकशी करून सत्य परिस्थिती समोर आणावी, अशी अपेक्षा तक्रारदार जयकुमार पांढरे यांनी व्यक्त केली आहे.

## येरमाळ्याच्या येडेश्वरी देवी चैत्र पौर्णिमा यात्रेची तयारी अंतिम टप्प्यात

### प्रशासनाची आढावा बैठक संपन्न

तभा वृत्तसेवा
येरमाळा, दि.२५ मार्च -
येरमाळा येथील प्रसिद्ध आराध्य दैवत श्री येडेश्वरी देवीची चैत्र पौर्णिमा यात्रा यावर्षी २ एप्रिल ते ७ एप्रिल दरम्यान होणार असून, त्या पार्श्वभूमीवर मंगळवार (दि. २४) रोजी येडेश्वरी मंदिर सभागृहात जिल्हा प्रशासनाची आढावा बैठक संपन्न झाली.

बैठकीच्या अध्यक्षस्थानी उपविभागीय अधिकारी गणेश शिंदे होते. यावेळी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यावरील अपूर्ण साईड पट्ट्यांची कामे तात्काळ पूर्ण करण्याचे आदेश संबंधित विभागाला देण्यात आले. या



बैठकीस तहसीलदार हेमंत ढोकले, सहाय्यक गटविकास अधिकारी मनीषा सुकाळे, पोलीस निरीक्षक तात्या भालेराव, महामार्ग पोलीस उपनिरीक्षक काकासाहेब रोडके, वैद्यकीय अधिकारी डॉ. सदानंद बिरादार, महावितरणचे उपविभागीय अभियंता जे. एच. लाडे, शाखा अभियंता परमेश्वर कुटे, रोहियो अभियंता संजय विभुते, पशुधन विकास अधिकारी डॉ. जी. बी. पवार, डॉ. महेश मोरे, एसटी स्थानकप्रमुख सुरज पायाळ, अभिजीत धाकतोडे, मंडळ अधिकारी एन. डी. नागटिळक, देवस्थान ट्रस्ट अध्यक्ष बापूसाहेब बेदरे, संजय आगलावे, माजी पंचायत सभापती विकास बारकुल, प्रशासकीय सरपंच प्रिया बारकुल, उपसरपंच गणेश बारकुल तसेच मानकरी, पुजारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

श्री येडेश्वरी देवीची चैत्र पौर्णिमा यात्रा ही राज्यातील मोठ्या यात्रांपैकी एक मानली जाते. यात्रेदरम्यान



भाविकांची मोठी गर्दी होत असल्याने सुरक्षितता, वाहतूक, वीजपुरवठा व आरोग्य सुविधा यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

आरोग्य विभागाकडून मंदिर परिसर, आमराई परिसर व आरोग्य केंद्र येथे स्वतंत्र आरोग्य बूथ उभारण्यात येणार असून १९ वैद्यकीय अधिकारी, १० पर्यवेक्षक, २० आरोग्य सेवक, १० सेविका व १० परिचर अशी अतिरिक्त मनुष्यबळाची मागणी करण्यात आली आहे.

महावितरणकडून यात्रेदरम्यान २४ तास त्रि-फेज वीजपुरवठा सुरू ठेवण्यासोबतच कळंब व येडशी येथून पर्यायी वीजपुरवठ्याची व्यवस्था तयार ठेवण्यात येणार आहे. तसेच डीटीसी दुरुस्तीची कामे पूर्ण करून वीजपुरवठा सुरळीत ठेवण्याचे नियोजन आहे.

परिवहन विभागाकडून यात्रेसाठी विशेष बससेवा उपलब्ध करून देण्यात येणार असून धाराशिव विभागातून २०० तर लातूर व बीड येथून १५० बसेसची मागणी करण्यात आली आहे.

पोलीस प्रशासनाकडून यात्रेसाठी कडक बंदोबस्त ठेवण्यात येणार असून १ उपविभागीय अधिकारी, १५ सहाय्यक पोलीस निरीक्षक, ५० पोलीस उपनिरीक्षक, ४०० पुरुष पोलीस, २०० महिला पोलीस, ३५० होमगार्ड व १५० महिला होमगार्ड अशी मोठी फौज तैनात केली जाणार आहे. अवैध दारू विक्री रोखण्यासाठी स्वतंत्र पथक व दरोडा प्रतिबंधक पथकही नियुक्त करण्यात येणार आहे.

यात्रेचे पावित्र्य जपण्यासाठी ग्रामस्थांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले.

ग्रामस्थ व पत्रकारांच्या सूचनांचा विचार करून सर्व विभागांच्या समन्वयातून यात्रा सुरळीत व निर्विघ्न पार पाडण्यात येईल, असे तहसीलदार हेमंत ढोकले यांनी सांगितले.